Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राष्ट्रसंत
समग्र गद्य वाड्.मय

खंड ६

संपादक
प्रा. रघुनाथ कडवे

श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

९-३

राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय

खंड सहावा

(१९५०-१९५१)

संपादक

प्रा. रघुनाथ कडवे

श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रकाशक
मो. रा. पुनसे,
श्रीगुरुदेव प्रकाशन,
गुरुकुंजआश्रम, जि. अमरावती (महाराष्ट्र).

अर्थसहाय्य
कार्यकारिणी ठराव क्र. ८ दि. २२-१-९५
सौ. सुशीलाताई कडवे

*

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन तिथी :
वं. राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज
३३ वा पुण्यतिथी महोत्सव २००१

*

प्रथमावृत्ती- १०००

*

अक्षर जुळवणी
गुरुदेव मुद्रणालय,
महाल, नागपूर.

किंमत ३० रुपये

*

मुद्रक
रमेश वाकोडीकर,
जयकृष्णा ऑफसेट वर्क्स,
गरोबा मैदान, नागपूर.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

संपादकांचे मनोगत

वं. राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज यांचे समग्र गद्य वाङ्.मय प्रकाशन सहाव्या खंडाकडे वाटचाल करीत असतांना अतिशय आनंद होत आहे. ही वाटचाल सतत २५ व्या खंडापर्यंत सुरु ठेवण्याचा आमचा दृढ संकल्प आहे. मागील पाच खंडातील वं. राष्ट्रसंतांचे लेखनातून त्यांच्या जीवनाचे आणि विचारांचे अनेक पैलू वाचकांसमोर आले आहेत आणि अभ्यासकांसाठी नवे दालन उघडले गेले आहे असा अभिप्राय अनेक विद्वान व्यक्तींनी व्यक्त केलेला आहेत.

वं. राष्ट्रसंतांचे विचार हे प्रगतीशील व विज्ञाननिष्ठ वाचकाला नवीनच सृष्टीत घेवू जात आहेत याचे प्रत्यंतर प्रस्तुत खंडातील अदृश्य रुपांतील देवतांचे दृष्टांत हा लेख वाचताना येईल. तद्वतच अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना राष्ट्रीय संपत्ती व कामगार यांचे विषयी प्रगतीशील विचार वाचायला मिळतील. भगवद् गीतेवरील लेख तर भगवान श्रीकृष्णाच्या जीवन संगीताची भूमिका विस्तृतपणे समजावून देईल यात शंकाच नाही. १९५० साली भारतीय लोकशाहीप्रधान घटना आपल्या देशात अमलात आणली गेली, त्यावेळी गांधी तत्वज्ञानाला विशेष महत्व होते, त्याचेही विश्लेषण प्रस्तुत खंडात वाचायला मिळेल. वं. राष्ट्रसंताचे विचार वाचत असतांना स्थूल सृष्टीतून वाचक सूक्ष्मसृष्टीत जात आहे असे वाटायला लागेल. या पार्श्वभूमीवर हा सहावा खंड वाचकांना नवा विचार देवून जात आहे असे आम्हास वाटते. हा खंड तयार करताना अनेक संस्थांनी आम्हाला मदत केली त्यात लोकमान्य वाचनालय, आर्वीचा सिंहाचा वाटा आहे. तेथील पदाधिकारी व कर्मचारी यांनी प्रस्तुत खंडातील दहा लेखाच्या झेरॉक्स प्रती आम्हास काढून दिल्या याबद्दल त्यांचे सविनय आभार, राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्.मय प्रकाशनात सहकार्य करणाऱ्या सर्व मित्रांचे व सहकाऱ्यांचे आभार !

– प्रा. रघुनाथ कडवे

दि. २-१०-२००१

राहाटे कॉलनी, नागपूर.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राष्ट्रसंतांचे निवेदन

मला माझ्या प्रवासात दिसून आले की, अत्यंत धर्मभोळे लोक वाटेल तसे वागून सुद्धा त्याला 'भक्ती'च समजत: आणि आचारविचाराचा प्रश्न आला की, "आम्ही संसारी आहोत, तेव्हा आमचं खोटं बोलल्याशिवाय कसं चालायचं? महाराज! हा संसार आहे. आपल्या परमार्थात मात्र आपण सांगता ते सर्व चालतं. अशी धर्माला संमत नसलेली वाणी मोठ्या उत्साहाने मुखातून काढीत. ती ऐकून मला अत्यंत दु:ख होई. 'आपण आपल्यापरीने समाजाची सेवा करू; पण त्यांच्यात जर प्रपंच आणि परमार्थ हे दोन भिन्न असल्याची भावना आहे, तर त्या परमार्थाचा आपल्या लोकांना फायदा तरी काय?' असं मला वाटू लागलं व अजूनही वाटतं.

याकरितां वर्तमानपत्रांतून जर लेख द्यावेत तर जागा फार गुंतेल आणि त्यांनाही कागदाची टंचाई. बरे, प्रत्येक भजनात सांगावे तर भजनाचे भाव रात्रभरच टिकावयाचे. संग्रही राहण्याकरिता त्या स्थायीक स्वरूपाचे लेखच असावे लागतात. हे सर्व प्रश्न माझ्यापुढे रहावयाचे. बरे, आपण स्वतंत्रपणे तसा प्रयत्न करावा तर तोच कदाचित संसार होऊन बसेल अशा भीतीने ती कल्पना आतापर्यंत दबूनच होती.

पण जेव्हा पक्षोपक्षांच्या भयाण भेदभावना समाजाला वाटेल त्या दिशेने लाटेसरशा नेतांना अधिकच दिसू लागल्या, महत्वाच्या तत्वापेक्षा जेव्हा संप्रदायालाच महत्व येऊ लागले; आणि "आमचा धंदा म्हणून-ही परंपरा वेडगळ जरी असली तरी-आहे तसेच कायम ठेवावयाचे; सर्व लोक एका भावनेत आणणे म्हणजे आमच्या संतांच्या-आमच्या वाडवडिलांच्या-आमच्या जातिपक्षांच्या-परंपरेचा कितीतरी नाश होईल." म्हणून 'हात फुटो पण पारंबी न सुटो' या म्हणण्याप्रमाणे लोकांचा सारखा ओघ चाललेला जेव्हा जेंव्हा दिसला, तेव्हा तेव्हा मनाला अत्यंत दु:ख वाटले. तसेच एकाच्या रुढीकरिता, एकाच्या ध्येयाकरिता, एकाच्या परंपरेकरिता होत असलेला अखिल समाजाचा नाश डोळ्याने पाहणे हे जर माझ्यासारख्या अडाणी माणसाला आवडत नाही. तर समाजातील मोठेमोठे विद्वान कसे पाहू शकतात याचेच मला आश्चर्य वाटले.

प्रिय सज्जनांनो! धर्म का कुणाचा धंदा असतो? भक्ती का कोणाचीं आमदानी असते? वा जाती का कोणाला मोक्षपदाला नेते? मुळीच नाही. तसली खुळी समज करून घेऊन समाजाची हानी करणे वा करविणे हे आमच्या सारख्याकडून पाहवत नाही. आणि म्हणूनच संतांनी घालून दिलेल्या मार्गाचे व ऋषी लोकांनी सांगितलेल्या तत्वांचे पुनरुज्जीवन करणे आज आवश्यक वाटते. "झाडू संतांचे मारग। आडरानी भरले जग ॥" एवढाच याचा अर्थ.

वास्तविक धर्म खरा किंवा खोटा नसतो. धर्माची तत्वे अमर असतात. ती कोणत्याही काळात बदलत नसतात. पण प्रसंगानी मनुष्याचे मन भांबावून किंवा लोभास्तव वाटेल त्या मार्गाने जाते आणि त्याचे चालक लोक त्यांच्याकडे कानाडोळा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

करीत राहतात. त्यामुळे शेवटी अशी पाळी येते की, भक्ती म्हणजे फक्त फुले वाहणे, घंटा वाजविणे, वाटेल तेवढे पाणी देवावर टाकून प्रत्येकाने आपापल्या मनाने ओरडणे आणि व्यवहारात जराही दुरुस्ती न करता खुशाल पाप करणे, तसेच प्रसंगी जर कोणी बोलला तर ''हा संसार आहे महाराज!'' म्हणून बाजूला होणे, एवढ्यापर्यंत जेव्हा पाळी येत असते, तेव्हा लोकांना संतमहंतांनी निर्लोभपणाने सत्य मार्ग दाखविणे म्हणजेच धर्माची ग्लानी काढणे होय.

प्रिय सज्जनांनो! कोणत्याही जीवाला ग्लानी येणे म्हणजे मरणे नव्हे. त्याला जर योग्य मात्रा भेटली तर तो रोगी दुरुस्त होऊ शकतो. त्याचप्रमाणे आमच्या समाजात जेव्हा खऱ्या तत्वाला जाणण्याची लोकबुद्धी मूर्च्छित होते किंवा पतन पावते, तेव्हा संतमहंत, त्यागी पुरुष यांच्या रूपाने परमात्म्याच्या विभूति प्रकट होऊन, जनबुद्धीस चेतना देऊन तत्वांच्या खऱ्या स्वरूपास उजाळा देत असतात. हीच गोष्ट गीतेमध्येही भगवान श्रीकृष्णानी सांगितलेली आहे.

तेव्हा आजच्या, आमच्या धर्म मानणाऱ्या समाजाची उगीच भूल होऊन त्याचा उन्नतिमार्ग आंधळ्याप्रमाणे 'इधर ना उधर' असा होऊ नये म्हणून, माझी या विश्वातील सर्व सज्जनांना सविनय विनंती आहे की, त्यांनी आपापल्या संप्रदायातील लोकांना व्यापलेला रूढींचा काळोख काढून त्यांना आध्यात्मकरणात आपल्या संसार व परमार्थाची अभेदरूप जोड बसविण्याचा मार्ग निर्लोभपणाने सांगावा. तसेच याच दृष्टीने लेखरूपाने जनताजनार्दनाची सेवा करावी. एवढीच माझी त्या थोर संतमहंतांना व विद्वत्‌रत्नांना नम्र प्रार्थना आहे आणि एवढ्याच करिता हा श्रीगुरुदेव-मासिकांचा उपक्रम अत्यंत महागाईच्या वेळी वाटेल तसा प्रयत्न करून सुरु केला आहे.

(श्रीगुरुदेव, एपिल १९४३ अंक१) —तुकड्यादास

– ऋणनिर्देश –

राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय संपादित व प्रकाशित करण्यासाठी अ.भा. श्रीगुरुदेव सेवामंडळाचे सर्वाधिकारी श्री रणदिवे, उपसर्वाधिकारी श्री राऊत, सरचिटणीस श्री बोथे, प्रकाशक श्री पुनसे, ग्रामगीताचार्य श्री बेलूरकर, वर्ध्याचे प्राचार्य देशमुख, चिमूरचे प्रा. पिसे, अकोटचे श्री सत्यपाल, नागपूरचे श्री वानखेडे, यवतमाळचे डॉ. जयस्वाल, अंतोऱ्याचे तुळशीरामजी इंगळे, मूलच्या वत्सलाबाई गोविंदवार, नागपूरचे श्री खवसे, प्राचार्य व्ही.सी.कुमारन्, बाळकृष्ण हांडे आदी थोर सेवकांनी प्रोत्साहीत केले व सहयोग दिला या सर्वांचा मी ऋणी आहे.

– संपादक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अनुक्रमणिका

१. योगेश्वराच्या जीवन-संगीताची भूमिका.

२. पूज्य महात्मा गांधीजींचे विश्वविद्यालय.

३. आत्मानुभवाची गुरुकिल्ली.

४. राष्ट्रीय संपत्ती व कामगार वर्ग.

५. ही भारताची प्रगती की अधोगती?

६. ही आपसातील झुंज म्हणजे राष्ट्राचा सर्वनाश ?

७. अदृश्य रूपांतील देवतांचे दृष्टांत.

८. अधिकारांचा दुरुपयोग करू नका ?

९. हे आसुरी बलिदान केव्हा थांबविणार ?

१०. राष्ट्रधर्माच्या दीपांतील तेल झिरकतं तरी कुठून ?

११. शहाण्यांनो! काळाची पावले ओळखून वागा !

१२. सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गियापरी.

१३. गांधी-भक्तांनो, क्रांतीचे पाय मागे खेचू नका !

१४. ही संतसंमेलने राष्ट्रहितासाठी आहेत काय?

१५. तो परमात्मा दशांगुले उरला !

१६. हे बघा आमच्या जीवन-विकासाचे प्रदर्शन !!

१७. जगात क्रांती घडविण्याची गुरुकिल्ली-प्रचार !!!

१८. रामराज्य निर्माण करण्याचा सोपा मार्ग !

१९. स्नेहसंमेलन व सीमोल्लंघन हाच विजयाचा मार्ग !

२०. समाधिमंदिराच्या गाभाऱ्यांत.

२१. श्रीगुरु आडकोजी महाराज व प्रार्थना दिन.

---OOO---

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१. योगेश्वराच्या जीवन-संगीताची भूमिका

(भगवान श्रीकृष्णाने गीता ही अक्षताफुलांनी पूजा करण्याकरिता सांगितलेली नाही किंवा स्वर्गाच्या आशेने वेदांत घोकत बसण्यासाठी सांगितलेली नाही तर गीता ही कर्तव्यशूर होऊन जीवन उन्नत करण्यासाठी अर्जुनाला रणांगणावर सांगितलेली आहे. वं. महाराजांनी प्रस्तुत लेखात गीतेचे प्रयोजन व भूमिका स्पष्टपणे मांडलेली आहे. - संपादक)

सेवामय जीवन हाच गीतेचा पूजापाठ

माझ्या मित्रांनो ! योगेश्वराच्या या गीतेची भूमिका केवळ भाविकतेची नाही. श्रीकृष्णाची गीता ही देवपाटात पूजनासाठी नाही; तिचा जन्म कर्तव्याच्या कणखर रणमैदानावर झाला आहे. गीतेची पूजा ही अक्षताफुलांनी होऊं शकत नाही; कारण सत्यासाठी शिरकमले वाहण्याच्या प्रसंगातून'जी जन्मास आली आहे. स्वर्गाच्या आशेने मुर्दाड जीवन जगून अन्याय सहन करीत वेदांताच्या घोषणा कराव्यात हे गीतेला मान्य होणे शक्य नाही; विश्वच स्वर्गीय सौंदर्याने नेटविण्याचे कर्तव्य करण्याचा संदेश देण्यासाठी ती अवतरलेली आहे. भाबड्या लोकांनी दिलेल्या दानदक्षिणेवर व मिष्टान्नाच्या नैवद्यावर गलेलठ्ठ बनून चौरंगावर बसून ब्रह्मनिरूपण करणाऱ्या जाड्या पंडिताच्या[१] मुखातून ती बाहेर पडली नाही; तर समाजाच्या खालच्या थरातील भोळ्या मुलात मिसळून, रानावनात गायी चारून, समाजावरील संकटाचा नि:पात करून, कुशलतेने बासरीवर फिरणाऱ्या कलावान बोटांनी प्रसंगी प्रखर चक्र धरून, अग्रपूजेचा सन्मान घेणाऱ्या मस्तकावर आश्रमातील मोळ्या वाहून, चातुर्याने युद्धाच्या धुमश्चक्रीत रथ हाकणाऱ्या हातांनी अवश्य तेव्हा यज्ञमंडपांतील खडे व खरकटे सावडून किंबहुना घोड्यांचा खरारा करून सेवामय व कर्तव्यशूर जीवनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या गोपालाच्या मुखातून ती प्रगट झाली आहे. डोलस[२] परिश्रमांतूनच जिवंत ज्ञान जन्मास येते याचे हे प्रात्यक्षिकच आहे आणि सेवाबुद्धीचे परिश्रम करण्याचा संदेश देण्यासाठीच ती अवतरली आहे. श्रीकृष्णाचा हा आदर्श व गीतेचा हा आदेश जीवनात उतरविणे हाच खरा गीतेचा पाठ ठरणार आहे. मोठेपणाच्या व पवित्रतेच्या पोकळ अहंकाराने समाजापासून दूर जाणाऱ्या, स्वर्गाच्या आशेने उंच-उंच भराऱ्या मारणाऱ्या पांढऱ्या शुष्क ढगाऐवजी, समाजाला जीवन वाहून देऊन शांत करण्यासाठी खाली येणाऱ्या काळ्या जलपूर्ण ढगातच गीतेसारख्या उज्ज्वल ज्ञानाचा वात चमकत असते हे निर्विवाद सत्य आहे.

गीतेचा उगम ग्रंथज्ञानात नाही

श्रीकृष्णाचे ज्ञान हे नुसते ग्रंथांचे ज्ञान नाही. शेकडो ग्रंथ वाचून बुद्धीला

---

१. मोठ्या विद्वानाच्या   २. स्पष्ट, सक्रीय

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

फाटे फोडून घेतल्यानेच जीवन सुखमय होऊशकेल ही आशा व्यर्थ आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सुचविले आहे. संदर्भासाठी शेकडो ग्रंथ गीतेने जमेस धरले असले तरी वास्तविक गीता ही जीवनाचे स्वतंत्र तत्वज्ञान आहे. सेवामय जीवनात शेकडो संघर्षांतून व आघातांतून उदयास आलेला तो अमर प्रकाश आहे. समाजाच्या जीवनाचा व त्याच्या उन्नतीचा पुरेपुर विचार करून त्याला अनुसरुनच कृष्णाने ज्ञानगीता सांगितली आहे. समाजाला विसरून कृष्णाने जर पुस्तकांनाच महत्व दिले असते, विद्वानांची ठराविक विचारसरणीच जर शिरोधार्थ मानली[१] असती तर गीतेचे स्वरूपच बदलून गेले असते; ती सध्याच्या स्वरूपात दिसून आली नसती. अर्जुन तर आपल्या ग्रंथाभ्यासी बुद्धिकौशल्याने व परंपराप्राप्त विचारांनी म्हणतच होता की, ''वर्णसंकर, पितरांच्या पिंडदानांत अडथळा, जीवहत्या, गुरुजनसंहार इत्यादी पापांपासून वाचणे हीच खरी बुद्धिमानी व हाच खरा धर्म ! आणि त्याचा एकमात्र उपाय या अघोर रणापासून परावृत्त होऊन सर्वसंगपरित्याग करून भक्ती करीत राहणे हाच शास्त्रानुसार ठरतो.'' पण श्रीकृष्णाने या रूढ धर्मविचाराला धुडकावून लावले व त्या क्रांतिकारक विचारानांच 'गीता' हे नांव मिळाले, श्रीकृष्णाऐवजी तिथे कोणी दुसरा साधु असता तर धनुष्याबरोबरच राज्यलोभ सोडून शरण आलेल्या त्या वीर अर्जुनाचे गोडवे गात मोठ्या खुशीने चटकन म्हणाला असता की-''ठीक है बच्चा! तू जो कहता है वही धर्ममान्य है, अपने पूर्वजोंके येही विचार थे! जिस सत्य में हिंसा न हो वही ठीक सत्य है' ऐसा शास्त्रोंमे भी कहा हुआ है। गुरुहत्या और ब्रह्महत्या तो सबसे बढकर पातक है! ''अहिंसा परमो धर्मः'' इससे श्रेष्ठ दूसरा धर्म नही है। दुसरी बात तो यह है कि 'वैराग्य का उदय जबही दिलमे हो, फौरन सर्वसंग परित्याग कर संन्यास लेना चाहिये' ऐसा उपनिषदोनेभी कहा है जो सबसे पवित्र ग्रंथ कहे जाते है। और फिर भक्तिसे श्रेष्ठ दुसरी बातही क्या हो सकती है? नरदेह क्षणभंगूर[२] और तुच्छ है। इसका हाथ-दोहाथ की कुटिमें गुजारा कर लेनाही बस हैं, इसके लिये राजपाट लेना और ये लडाईझगडे करना निरी मूर्खता है। इस हिंसामय रणको छोडकर हरिनाम में रँग जा! क्षात्रधर्म छोड देनेसे कोई पापभी यदि लगे तो हरिनाम से सब नष्ट हो जायगा। बस् 'सब हरि भज' यही मेरा सन्देश है!'' अर्थात हा संदेश अर्जुनाला तेव्हाच पटला असता आणि अठरा अध्यायांची माथापच्च करण्याची काही गरजच उरली नसती !

जीवनसंग्रामातील यशस्वी जीवनकला

परंतु श्रीकृष्णाला ही गोष्ट उचित वाटली नाही. त्याने जाणले की, अर्जुनाचा हा सारा युक्तीवाद व ग्रंथवाद मोहाची देणगी आहे-भ्रामक आसक्तीची ही बडबड आहे! मोहवश होऊन, किंकर्तव्यमूढ होऊन कर्मत्याग व भक्ती

---

१. उचलून धरली   २. थोड्या समयाचा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

केल्याने उद्धार होऊ शकत नाही. कटुकर्तव्याला भिऊन मागे फिरणे हा पुरुषार्थ नव्हे. केवळ हिंसा-अहिंसाच कार्याची कसोटी बनू शकत नाही, त्यात उद्देश (हेतू) व परिणाम यांचा विचार असायलाच पाहिजे. क्षत्रियधर्म हा विश्वास सत्याचे रक्षण करण्यासाठीच नियोजित केला गेला आहे. दुष्टांचा अपरिहार्य[१] स्थितीत संहार करणे ही हिंसा होऊ शकत नाही, कारण त्यांत विश्वहिताचाच उद्देश असतो व संभाव्य हिंसा वाचवण्याचाच तो उपाय ठरतो. यासाठी व्यक्तिगत स्वार्थासाठी नव्हे तर निष्काम भावनेने, विश्वहिताच्या व सत्यप्रस्थापनेच्या दृष्टीने लढणे हेच धर्मकार्य आहे. जगाला नंदनवन बनवण्यासाठी वीरत्वाने संघटीत होऊन राहणे आणि आपले प्रत्येक कर्म हे जगत्कल्याणाच्या हेतूने लोकसेवेत वाहणे यांतच खरी भक्ती होऊ शकते. वेदांत हा विषय व्यवहाराचा नाशक नसून तो व्यवहारात खरी जीवनदृष्टी देणारा, केवळ सत्य तत्वासाठी कसे जगावे व कसे वागावे हे शिकविणारा विषय आहे. वेदांत म्हणजे खरी जीवनकला! कोणताही कर्मबंध न लागू देता कर्म कसे करावे व कर्मानेच कर्मातीत होऊन आत्मानंद कसा लुटावा हे दर्शविणारे होकायंत्र म्हणजे वेदांत! हाच सिद्धांत दृष्टीपुढे ठेवून श्रीकृष्णाने अर्जुनाला जीवनसंग्रामांत प्रवृत्त केले! समाजहिताची दूरदृष्टीच त्यांत भगवंतानी जागृत केली आणि आपल्या सेवामय जीवनाचे कोडे उलगडून दाखविले. याप्रमाणे 'योगेश्वराचे जीवनसंगीत' म्हणून या गीतेकडे पाहता येईल व तसे स्वतःचे जीवन बनविण्यातच गीतेचे खरे अध्ययन केले असे म्हणता येईल.

अन्यायी लोकांनी जनतेला पिळावे आणि भोळ्या जनतेने धर्माच्या नावाखाली अन्याय सहन करण्याचा दुबळेपणा अंगीकारावा ही स्थिती अत्यंत वाईट होय. असा प्रसंग जेव्हा जेव्हा येतो तेव्हा तेव्हा गीता ही त्यातून वाट काढण्यास पूर्ण सहायक होऊ शकते, कारण ते क्रांतिकारक असे अमर तत्वज्ञान आहे. अन्याय करणारा बाप असो की गुरु, त्याला शासन करणे हाच धर्म गीतेने शिकवला आहे. सामोपचाराचे सर्व प्रयत्न थकल्यावर करावे लागणारे 'भारतीय युद्ध' हे पाप समजून मागे हटणे उचित नव्हे. परंतु हे परिवर्तन स्वतःसाठी-स्वतःच्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक सुखासाठी-जो करील त्याला ते बंधनास कारण होईल आणि समाजहिताच्या दृष्टीने करील तो अलिप्त राहील, हाच गीतेचा आदेश आहे. सेवेसाठी-केवळ सत्यस्थापनेसाठी-केले जाणारे कर्म हाच खरा यज्ञ, खरा धर्म व खरी भक्ती होय यांत संदेह नाही.

(श्रीगुरुदेव, नोव्हेंबर १९४९ पृ. क्र. २-३) ✣ ✣ ✣

---

१. दुसरा उपाय नसतांना

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

२. पूज्य महात्मा गांधीजींचे विश्वविद्यालय

(पूज्य महात्मा गांधीजींनी आपल्या जीवनात प्रयोग करुन दाखवून जगाला एक सुरक्षित दिशा दाखविली आणि अहिंसाशस्त्रानं महान साम्राज्यशक्तीस थरारून सोडलं, इतिहासाला एक वेगळीच कलाटणी दिली. त्यांच्या मार्गाने जर आपण गेलो तर जागतिक युद्ध निश्चितपणे थांबवता येतील असे वं. महाराजांनी अतिशय प्रभावी शब्दात प्रस्तुत लेखात विवेचन केले आहे. गांधीजींचा मार्ग दर्शवित असतांना इतरांना विरोध नाही परंतु आजच्या वातावरणाशी समरस होण्याची शक्ती गांधी विचारसरणीत आहे म्हणून हा आग्रह वं.महाराज धरीत आहे- संपादक)

हाच जागतिक युद्धे थांबविण्याचा यशस्वी मार्ग !

मित्रा ! जगात शांतता नांदावी आणि सर्वांनी परस्परांशी आपुलकीनं वागून आपली व आपल्या राष्ट्राची प्रगति करण्याचा प्रयत्न करावा, हे रम्य सुखस्वप्न आजपर्यंत सर्व महात्म्यांनी आपल्या दृष्टीपुढं ठेवलं आणि त्याला प्रत्यक्षात आणण्याचा सतत प्रयत्न केला, ही गोष्ट तुला साऱ्या संतमहापुरुषांचा इतिहास ओरडून सांगेल. हे उघड सर्वांना कळत असता देखील लोक त्याच महापुरुषांच्या नावांवर दुही माजवीत आहेत, आपल्या स्वार्थासाठी वेगवेगळे गट पाडीत आहेत व त्यांच्या नावांचा दुरुपयोग करून इतरांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ही केवढी आश्चर्याची आणि दुःखाची गोष्टं आहे! ''मुखमें रामनाम और बगलमें छुरी'' या प्रमाणं ''मुखांत शांतिपाठ व हातांत ॲटमबॉम'' अशी सध्या जगाची प्रवृत्ती बनली आहे; त्यामुळेच त्या महापुरुषाचं सुखस्वप्न प्रत्यक्षात उतरतांना दिसत नाही. सारं जग वारंवार अंतर्बाह्य[१] युद्धाच्या आगीत होरपळत आहे.

युद्धाचा सिद्धांत अटल आहे काय?

तू म्हणतोस-''काय हो! सर्व काही बदलू शकतं मग जगांतील युद्धाचा सिद्धांतच कां बदलत नाही? देशादेशातील ही युद्ध बंद कां होत नाहीत?'' अरे बाबा! त्याला देखील उपाय आहेत, 'देशादेशांतील ही युद्ध बंद व्हावीत' असं जितक्या अधिक लोकांना मनापासून वाटू लागेल तितक्या अधिक प्रमाणात युद्धाची प्रवृत्ती मंदावत जाईल हे लक्षात ठेव. सध्या तर सर्वच राष्ट्र युद्ध टाळण्याची भाषा वापरताहेत पण दुसरीकडे पाहावं तर सर्वांचीच युद्धसामुग्री,

---

१. देशात आणि देशाबाहेर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सैन्य व नवेनवे शोध वाढविण्याची तयारी चालू आहे. विधायक दृष्टीनं राष्ट्र सुसंस्कार व बळकट करण्याऐवजी या अमानुषतेच्या मार्गावरच राष्ट्रांची जास्तीत जास्त संपत्ति सतत खर्ची पडत आहे. याचाच अर्थ असा आहे की युद्धाचा वीट[१] अजून या लोकांना आलेला नाही. सामान्य जनता या प्रवृत्तीला कंटाळली आहे पण थोरामोठ्यांना जगाच्या या ओघातून फुटून निघवत नाही. महात्मा गांधी हाच एक महापुरुष अलिकडच्या काळांत या युद्धप्रवाहांतून कसं बाहेर पडावं याचा यशस्वी मार्ग दाखवून देणारा झाला आहे. "अक्रोधेन जयेत्क्रोध:" या सिद्धांतानुसार अहिंसात्मक मार्गांनी मोठ्यात मोठी हिंसक शक्ती कशी जिंकावी, याचा त्यांनी आपल्या जीवनांत प्रयोग करून दाखवून जगाला एक सुरक्षित दिशा दर्शविली आहे आणि आपल्या अहिंसाशस्त्रानं कलाटणी दिली आहे. पूज्य महात्माजींच्या या ध्येयधोरणानुसार आजच्या जगांतील मोठमोठ्या नेत्यांनी जर पाऊल टाकलं तर सारं जग सुखशांतीचा अनुभव घेऊ लागेल हे लक्षांत ठेवा-

मित्रा ! युद्ध हा स्वार्थी व विकारी भावनांचा स्फोट आहे. मनुष्याच्या क्रोधाच्या मुळांशी जसा अतृप्त लोभ असतो तसाच राष्ट्रांच्या पुढाऱ्यांच्या मनांतील महालोभ या युद्धांच्या पाठींशी आहे. दुसऱ्या देशातील लोकांच्या सुखदु:खांचा मानवतेनं विचार न करण्याच्या प्रवृत्तीचा क्षोभ झाला की स्वार्थबुद्धि अन्याय्य मार्गांनी बोकाळू लागते आणि तिचे दुष्परिणाम माणुसकीसहित स्वत:ला व दुसऱ्यालाही नष्ट करण्याकडे होत असतात. राष्ट्राराष्ट्रांत युद्ध जुंपण्याच्या मुळाशी कोणातरी राष्ट्राच्या चालकांना कमी-अधिक स्वार्थ वा गुन्हा असतो आणि त्याची कटु[२] फळं मात्र जनतेला 'हाय हाय' करीत भोगावी लागतात. ही प्रवृत्ती बदलण्याचे मुख्य साधन मानवतेची संस्कृती वाढवणं हेच असू शकतं व त्याप्रमाणं मानवता, बंधुता, समता आदी भावनांचा विकास करणारे महापुरुषही जगाच्या पाठीवर वेळोवेळी येतच असतात. पण साऱ्या विश्वात वजन मिळवून त्याला सरळ मार्गावर आणण्यासाठी त्यांना मिळणारा वेळ हा अपूरा असतो. सामान्य जनतेची बुद्धिमत्ता ही आपले परंपरागत संस्कार बाजूस सारून त्यांची विचारप्रणाली ग्रहण करण्यास तितकी समर्थ नसते आणि स्वार्थी धेंडांना त्यांची ही विचारसरणी स्वत:च्या अहिताची वाटल्यामुळं ते त्यांचा छळ व विरोध. आणि जनतेची दिशाभूल करण्यांतच वेळ घालवीत असतात; असंच म्हणावं लागतं. महापुरुषांच्या या अपूर्ण प्रयत्नांला त्याच दिशेनं चालना देऊन जर त्यापुढच्या पुढाऱ्यांनी कार्य केलं तर जगाचं रूप पालटायला मुळीच वेळ लागणार नाही हे लक्षात ठेव.

---

१. कंटाळा २. अत्यंत वाईट

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जगाला स्वर्गतुल्य करता येईल !

मित्रा ! सद्भावनांची वाढ, स्वार्थबुद्धीची योग्य मर्यादा व विचारशक्तीचा विकास या शिवाय जगातील युद्ध बंद करण्याचा दुसरा मार्गच असू शकत नाही. अनपढ लोकांत उठल्यासुटल्या निकराची भांडणं होतात; त्या मानानं सुशिक्षित लोकांत भांडणांचं प्रमाण कमी असतं. हेच सुशिक्षित जर आपल्या बुद्धीला मानव्यतेची दीक्षा देतील तर देशात सहसा झगडेच होणार नाहीत. प्रत्येक राष्ट्र जर याप्रमाणं मानवता आणि सहकारीवृत्ती, बंधुत्व आणि सेवाबुद्धी यांनी रंगून जाईल तर जगात युद्ध होण्याचं कारणच उरणार नाही. जगाला सहृदय आणि समजूतदार करणं हाच जागतिक युद्ध नष्ट करण्याचा यशस्वी मार्ग आहे व त्या दृष्टीनच सगळी राष्ट्र-प्रामाणिकपणानं लोकांना शिक्षण देण्यांत जर योग्य खर्च करू लागतील तर युद्धांसाठी केल्या जाणाऱ्या खर्चाहून अधिक खर्च येईल असं मला वाटत नाही. उलट मानवसमाजाची सारखी प्रगती होऊ लागेल आणि सर्वांगीण विकासाच्या अनेक योजना यशस्वी करून दाखविता येतील; सर्वत्र आबादी नांदू लागेल.

गांधीविचारशाळा व विश्वशांतिसाधना

या शिक्षणाची शाळा म्हणजे पूज्य महात्मा गांधीजींच्या विचारसरणीची शाळा होय. पण दुदैवानं त्यांनी चालविलेल्या संस्थांत देखील असेच अनेक लोक दिसून येतात की सगळा जन्म त्यांच्या सहवासात घालवूनही त्यांची बुद्धी मात्र त्यांत रंगलेली नाही. त्यामुळं त्यांच्या संस्थांतही त्याच भानगडी दिसतील, ज्या अन्य संस्थांत व राष्ट्रात दिसून येतात. याचा अर्थ असा मात्र होत नाही की गांधीजींची विचारधाराच याला जबाबदार आहे म्हणून. हा तर ज्यांच्या त्यांच्या कमकुवत विचारांचा व असंस्कारी स्वभावांचा तमाशा[१] आहे आणि त्यावरून एवढाच बोध घेता येण्यासारखा आहे की जगाच्या चालू विचारप्रवाहांतून सुरक्षितपणे बाजूस होऊन जगाचा विचारप्रवाहच शांतिपथाकडे वळविण्याची खटपट करणं हे सोप काम नाही. थोडेसे लोक त्या दिशेनं प्रयत्न करू लागले तर उलट जगाच्या संस्कारप्रवाहाचा पगडा त्यांच्यावर बसणंही काही अशक्य नाही. त्यासाठी संघटितपणानंच ही लाट उठवून द्यायला पाहिजे.

दोन प्रतिस्पर्धी जेव्हा परस्परांचं ध्येयधोरण व सुखदु:ख लक्षात घेऊन मानव्यदर्शन करतात तेव्हा त्यांचा झगडा सहजतेनं व समाधानानं मिटतो. हाच नियम राष्ट्रांनाही लागू आहे. विश्वव्यापी बुद्धीचं व आत्मवत् प्रेमाचं शिक्षण दिलं

१.गोंधळ

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तरच राष्ट्रांचे तीव्र मतभेद नाहीसे होतील आणि युद्ध खरोखर बंद पडतील. सध्या युद्धबंदीचा जो प्रयत्न चालू आहे तो म्हणजे, एकानं शिरजोर होऊन 'बळी तो कान पिळी' या न्यायानं दुसऱ्याला दाबून टाकण्याचा क्षणभंगूर प्रयोग होय. उत्क्रांतीच्या सिद्धांतानुसार आजचे दलित राष्ट्र उद्या वर येणारच आणि युद्ध बंद होण्याऐवजी त्याला रंग चढत जाणारंच हे उघड आहे. कायमच्या युद्धबंदीच्याऐवजी युद्धाच्या तयारीला पुनः पुन्हा आव्हान देण्याचा व आपल्याच शोधांनी आपला नाश करून घेण्याचा हा प्रकार आहे. जग मानवतेचं शिक्षण घेऊन व आपल्या महत्वाकांक्षेला मर्यादा घालून मानवी शोधांनी मानवसमाजाला नवनवी सुखं मिळवून देण्याच्या बुद्धीचा जर विकास करील तरच युद्ध बंद पडून सर्वांना सुखानं नांदता येईल. जगाची मर्यादित सुखं आपणासच मिळावीत या महत्वाकांक्षेन सर्वांना व स्वतःलाही 'त्राही त्राही' करून सोडणं हा मूर्खपणा आहे. त्याऐवजी त्याच आपल्या शोधांनी अधिक सुखं निर्माण करून सर्वांबरोबर गुण्यागोविंदान[१] त्यांचा उपभोग घेणं हेच खरं शहाणपण होय आणि याच्या वाढीमुळंच युद्धबंदी यशस्वी होणार आहे, समजलास ?

गांधीवादच श्रेष्ठ कां?

मित्रा! तुझा हा प्रश्न रास्तच[२] आहे की-" काय हो! तुम्ही म्हणतां याला गांधीजीचीच शाळा पाहिजे. गांधीजीपूर्वी याची शाळा नव्हती असं तुम्हांला म्हणायचं आहे काय? रामानं, कृष्णानं, गौतमबुद्धानं, येशूखिस्तानं, भगवान महावीरानं किंवा मोठमोठ्या संतांनी असे विचार जगापुढे मांडले नव्हते की काय? केवढाले प्रभावी देव न् ऋषि जगाच्या पाठीवर प्रेमशांतीच्या गंगा वाहवून गेले; काय त्यांनी असं सांगितलंच नसेल म्हणता? मग जेव्हा- तेव्हा गांधीजीच्या शाळेचंच नांव तुम्ही कां काढतां? काशीविश्वविद्यालयासारख्या मोठमोठ्या शाळांनं अन् संस्कृत वेदशाळांचं नांव तुम्ही कां घेत नाही?"

मित्रा ! गांधीजीची शाळा म्हणत असतांना इतर शाळांना विरोध मला त्यांत करावयाचा आहे असा अर्थ चुकूनही काढू नकोस. माझ्या वरील विचारसरणीला पोषक असणाऱ्या जितक्या शाळा, जितके ग्रंथ आणि ज्या विचारप्रणाली तुला आढळतील त्या सर्वांचा समावेश 'गांधीविचारशाळा' या एका शब्दांतच मी सन्मानपूर्वक केला आहे असं तू खात्रीनं समज. असं असतां मग मी गांधीविचारशाळा हाच शब्द कां वापरावा, असं तुझं म्हणणं आहे. हे म्हणणं असं आहे की एखाद्यानं फार पुरातन काळचं टपोर बी जपून ठेवावं अन् म्हणावं की-'काय हो! जर बीजच पेरावयाचं आहे तर माझ्या जवळचं शंभरवर्षांपूर्वीचं बी तुम्ही कां नाही पेरीत?' त्याला उत्तर हेच आह की अरे बाबा!

---

१. प्रेमाने २. योग्यच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्या बियाचंच तर हे आजच्या काळातलं अगदी ताजं स्वरूप आहे! त्या पुरातन बीजांतील सर्व आवश्यक द्रव्य यांत आली आहेत; उलट यात जितकी अधिक शक्ती आज विद्यमान आहे तितकी त्यात राहिलेली नाही. अनेक ऋतूंचे आघात सोसून सोसून ते निस्सत्व[१] झालं असणंच अधिक संभवनीय आहे. आजच्या बीजांतच अधिक शक्ती असणार हे उघड आहे.

- मित्रा ! मागील अवतारी महापुरुषांच्या व ऋषींच्या सर्वपूज्य विचारांचे जे स्वरूप तेच गांधीतत्वज्ञानाचं स्वरूप आहे; किंबहुना डाग लागलेलं सोनं गाळून शुद्ध करावं त्याप्रमाणं मागील देवऋषिमुनींच्या शुद्ध मतांना लागलेल्या संप्रदायभिन्नता, जातीयता, त्या त्या काळची प्रासंगिक व्यवस्था यांच्या कलंकाना दूर सारून त्यांतील शुद्ध स्वरूपाचा समयास उचित[२] असा आविष्कार गांधी तत्व ज्ञानांत उतरला आहे. म्हणूनच मी म्हणतो की पूज्य गांधीजीच्या विचारसरणीचंच शिक्षण भारतालाच नव्हे तर जगांतील सर्व राष्ट्राना पाहिजे आहे आणि असं करण्यातच भारताचं कल्याण व विश्वशांतीची ध्येयपूर्ति आहे.

गांधीविचाराचा 'संप्रदाय' बनवूं नका !

कदाचित् आपल्या वाढत्या गरजा व धावता जागतिक व्यवहार त्यांचा त्यांच्या विचारांशी मेळ बसवत असता कालगतीनं ही स्थिती बदलून एखाद्या नवीन घटनेत व वेगळ्या युगपुरुषांतही भारताला आपला प्रवाह मिळवून टाकून सहभागी व्हावं लागेल हे अशक्य नाही. गांधीविचारसरणी ही आकुंचित नसल्यामुळे निकटच्या भविष्यकाळांत तिची कास सोडण्याची वस्तुतः आवश्यकता नाही; परंतु आपली मतं अज्ञानवश किंवा विकारवश भरमसाटपणे गांधीविचारांत गोवून 'गांधीबाजी' निर्माण करणाऱ्या काही त्यांच्या भोवतालीन लोकामुळं गांधीविचारांची एक ठराविक पोलादी चौकट झाल्यास तिचा भेद करण्यांत येऊन नवा प्रवाह सुरु होणारच हे निसर्गसिद्ध आहे.'' मागं देखील वेळोवेळी असंच होत आलं आहे.

मित्रा ! मानवसमाजाचा इतिहास तुला हेच सांगेल की समाजाला वेळोवेळी आपलं स्थान सोडून त्या त्या काळच्या जीवंत वृत्तीच्या व जागृत दृष्टीच्या पुरुषामागं जावं लागलं आहे आणि जी जनता तशी गेली तिनंच आपलं कल्याण करून घेतलं आहे. असा आजच्या युगाचा अगदी जवळचा महापुरुष महात्मा गांधीच आहे; अर्थात मागील सर्व थोर थोर ऋषिसंतांचा व देवदेवतांचा अंतर्भाव या महात्म्याच्या विचारमूर्तीत झालेला आहे आणि त्यांची विचारसरणी भारतांतील घराघरांत पोहोचली व राष्ट्रांनी स्वीकारली तरच नवं सुखशांतीच नि उच्च प्रगतीचं युग सर्वत्र सुरु होणार आहे हे निश्चित !

(श्रीगुरुदेव, जानेवारी १९५० पृ. क्र. ४)

१.सत्वहीन २. योग्य

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

३. आत्मानुभवाची गुरुकिल्ली

(वेदांत म्हणजे खरीखुरी जीवनदृष्टी. ही दृष्टी प्राप्त करणारा संकटांनी विचलित किंवा प्रलोभनांनी विमोहित न होता निर्भय व निष्काम वृत्तीने आणि सर्वस्पर्शी स्वतंत्र्य दृष्टीने राष्ट्रसेवेचे बहुमोल कार्य अदम्य उत्साहपूर्वक सहज करू शकतो. जीवनाचे साद्यंत ज्ञान व आत्मसमाधान प्राप्त झाल्यामुळे उणीव किंवा विकृति ही त्यात राहू शकत नाही. अध्यात्मज्ञानाचे हे महत्व लक्षात घेऊनच श्रीमहाराजांचा प्रस्तुत लेख येथे देण्यात येत आहे. - संपादक)

आमुचा स्वदेश

मित्रा ! आपले गाव हेच आपले राज्य आहे. अध्यात्माच्या दृष्टीने हे सत्य आहे, इतकेच नव्हे तर व्यावहारिक अर्थानेही हेच योग्य आहे. आपल्या गावाचा विचार डोळ्याआड करून जो थोरपणाच्या गप्पा मारतो तो शेवटी काहीच प्राप्त करू शकत नाही. राष्ट्राची खरी शक्ती गावात आहे आणि समष्टीतले सत्य तत्वच व्यष्टीत आहे. गावाची सुधारणा हीच राष्ट्राची उन्नती आणि आत्मगावाचा अनुभव हीच ब्रह्मतत्वाची प्राप्ती! ही प्राप्ती कशी होणार हाच महत्वाचा प्रश्न आहे. नुसत्या व्याख्यानबाजीने हा प्रश्न सुटणार नसून त्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्नांची आणि साधनाभ्यासाची आवश्यकता आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

मित्रा ! गाव जरी कळले तरी त्या गावी जाण्यासाठी वाहनाची अर्थात् रथ, घोडे यांची तसेच सारथी व धोपट मार्ग यांची देखील जरूरी लागते. त्याचप्रमाणे मधून मधून कोणकोणती गावे लागतात आणि कसकशा अडचणींना तोंड देण्याचा प्रसंग येतो, यांची सुद्धा माहिती आवश्यकच असते; नाही कां? मला माझ्या प्रिय गावी जावयाचे आहे, एका उच्च स्थितीत पोचावयाचे आहे, असे म्हणून जरी कोणी उल्हासला किंवा उत्कंठित झाला असला तरी तो उल्हास वा विरह योग्य माहितीच्या आणि साधनांच्या अभावी कुठंवर टिकणार आहे, मला सांगा! ज्याअर्थी गावाचा उच्च आदर्श-आत्महिताचा कळस कळला आहे, त्याअर्थी त्याच्या प्राप्तीच्या खुणाखुणा काय आहेत हे नको का बघायलां? ज्यांनी आपल्या गावाचे यथार्थ[१] ज्ञान आपणास दिले असेल त्यांनाच त्याच्या प्राप्तीसाठी काय करावे लागते हे विचारायला नको का? जड गाव असेल तर जड वाहनांची व सूक्ष्म असेल तर सूक्ष्म साधनांचीच जरूरी लागणार हे उघड आहे.

१. वास्तविक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ब्रह्मानंदाची प्राप्ती केव्हा?

मित्रा ! मला तू विचारीत आहेस की-''मी स्वस्वरूप होऊन राहण्याची धारणा करतो पण आनंदकल्लोळांचा एकदम कडेलोट किंवा स्फोट कां होत नसावा की जेणे करून मी देहभानच विसरेन?'' यावर मला हे विचारावेसे वाटते की, तू स्वस्वरूप नाहीस म्हणून ते प्राप्त करू चाहतोस की तुझ्या आड काही पडळ[१] येऊन ते तुला ती वस्तु बघू देत नाही म्हणून धडपडतोस? तू स्वस्वरूप किंवा आत्मरूप नसून तुला ते दुसरीकडून प्राप्त करावयाचे आहे, असे जर तुला कळले असेल तर ते कळणे चूक आहे व तसे सांगणारानेही ऐकीवच सांगितले आहे असे खात्रीने समज. आणि तू मूळात आत्मरूप असून अज्ञानातिमिराने उत्पन्न केलेल्या जीवाभावामुळे जो भेद वाटतो तो भेदभ्रम नाहीसा करणे हेच आपले काम आहे, अशी तुझी धारणा असल्यास ती अगदी योग्य आहे. भ्रमांचे आवरण जीवाशी इतके घनिष्टतेने[२] जडले आहे की त्यामुळे आपले अधिष्ठानरुप मूळ स्वरूप विसरून 'आपण दुसरेच कुणी आहो' असा त्याचा पक्का समज झालेला आहे. अशा प्रकारे जीवभाव, इंद्रियभाव किंवा देहभावादिकांचे जे भ्रमिष्ट आवरण पडले आहे त्याचे निवारण अर्थात् भ्रमनिरास करणे एवढंच वृत्तीचे कर्तव्य आहे. सर्व खटपटी स्वरूप विसरून द्वैतभावांत पडलेल्या वृत्तीसाठी करावयाच्या आहेत, आत्म्याच्या प्राप्तीसाठी नव्हेत; कारण तो प्राप्तच आहे, किंबहुना 'तोच तू' आहेस. अधिष्ठानस्वरूपाचे प्रतिबिंब हा जीव भावांत प्रतिबिंबित झाला आहे, त्या भावाने आपले स्वरूप बदलून निराळीच वृत्ती तयार केली आहे. त्या वृत्तीला अंतर्मुख म्हणजे आत्मविचारी बनवून आपल्या मूळ स्वरूपाचे ज्ञान करून द्यावयाचे आहे. अर्थात् 'मी देह, प्राण, मन, बुद्धी किंवा शून्य आहे' असे ती वृत्ती चुकूनही म्हणणार नाही, अशा साहित्याची, साधनांची व अभ्यासाची जोड तिला करून देणे एवढीच तयारी आवश्यक आहे. सर्व साधनांचा व ज्ञानग्रंथांचा सार याहून निराळा असूच शकत नाही. एकदा याप्रमाणे स्वस्वरूपाचे ज्ञान करून घेऊन वृत्ती अभ्यासाने तदाकार होऊ शकली की मग ''आनंदाच्या डोहीं आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचें॥''[३] अशा अद्वैतानंदाच्या अनुभवांत देहभान विलीन होऊन जायला काहीच अडचण उतरणार नाही.

स्वरूपानुभवाचा सोपा मार्ग

मित्रा ! 'राईआड पर्वत' अशी स्थिती असल्यामुळे भ्रमनिरास हाच आत्मसुखाचा उपाय आहे यात शंका नाही. पण भ्रमाने उत्पन्न केलेल्या

---

१. पडदा   २. घट्टपणे   ३. सार्थ श्रीतुकारामाची गाथा अ. क्र. २३९८

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

द्वैतप्रपंचांतच वृत्ती गढून गेली[१] असल्यामुळे तिचा ओढा आत्मस्वरूपाकडे लागत नाही आणि म्हणूनच ज्ञानापूर्वी अन्य साधनाचीही ज़रूरी लागते. चित्तशुद्धी व मनाची एकाग्रता होऊन तत्वविचाराची आवड उत्पन्न होईल अशीच ती साधने असली पाहिजेत. या साधनांचे संक्षिप्त स्वरूप माझ्या पसंतीप्रमाणे मी सांगतो. प्रथम 'मी दास आहे व सर्व कर्ता-हर्ता प्रभु आहे' असे मनाने दृढ करून एकनिष्ठ भावाने ध्यान भजन करीत राहावे आणि आपले दैनिक आचरण हे सात्त्विक बनवून सर्वांच्या हितासाठी झटू लागावे. नंतर सज्जनांचा सहवास व सद्ग्रंथांचा अभ्यास यांच्या आधारे 'प्रत्येक वस्तूतच तो प्रभु आहे' हा विचार दृढ करून घेऊन आपले शरीराचरण[२] सुद्धा तेवढ्या उदात्त व शुद्ध विचारांना पोषक असे बनवावे; अर्थात् आपल्या प्रत्येक क्रियेला सेवेचे रूप द्यावे, ज्याशी ज्याशी आपला संबंध येईल त्याशी प्रेमळ व निर्मळ वृत्तीने बोलावे; आपल्या वर्तणुकीत असत्याला मुळीच ठाव असू नये. हे सर्व करीत असताना मनाला एकाच सात्त्विक केंद्रावर, ध्यान-मूर्तीवर किंवा विचारचिंतनांत एकाग्र करण्याचा अभ्यास चालू ठेवावा आणि ज्ञानोपदेशाचे मननही करीत असावे. या मार्गाने कायावाचामन शुद्ध होऊन बुद्धी तेजस्वी होईल आणि 'मी कोण? माझे स्वरूप काय?' याचे यथार्थ उत्तर स्वतःजवळच शोधता येऊन त्याचा निश्चय सोपा होऊन जाईल; अर्थात् मग आपोआपच वृत्ती स्वरूपाकार होऊन आनंदसागरात समरस होवून जाईल. जोवर तू स्वतःला 'भक्त' म्हणवूनही 'विभक्त'च राहशील, तदाकार होणार नाहीस, तोंवर सूक्ष्मतिसूक्ष्म देहभावनेचे बीज नाहीसे होऊन ब्रह्मस्वरूपानुभव कसा होणार?

भक्तीमार्गाचे रहस्य

मित्रा ! वास्तविक स्वरूपानुभव घेण्याची सुद्धा जरूरी नाही, कारण तो स्वयंसिद्धच आहे. पण जीवाने 'मी भिन्न कोणीतरी' अशी जी कल्पना उगीच दृढ केली आहे तो भ्रम नाहीसा करणे एवढाच अध्यात्ममार्ग आहे व त्याचे वाहन मी वर सांगितलेच आहे. परमार्थमार्गात वाहनांची उणीव नाही. अनेक साधने विविध ग्रंथांनी सांगितलेली आहेत; पण ती कठीण किंवा व्यवहारदृष्ट्या एकांगी स्वरूपाची असल्यामुळे संतांनी ईश्वरभजनाचा सुगम उपाय सांगून ठेवला आहे. यांत ईश्वरसेवा म्हणून घरसंसार नि राष्ट्रसंसार सुद्धा चालवायला वाव आहे आणि सर्व प्रकारच्या लोकांना तो सहजसाध्य होणारा आहे. ईश्वराचे नाम घ्यायचे व त्याच्या अवतारांने सांगितलेले सृष्टिसेवेचे काम करायचे; इतकेच नव्हे तर

---

१. गुंग झाली २. इंद्रियांची हालचाल

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

''हाका मारी ज्याच्या नावे। त्यांचे गावचि नाही ठावे'' (तुका.) असे न होऊ देता ईश्वराच्या स्वरूपाचा शोध घ्यायचा. ''ध्यानी आठवते ते कोण। ध्यान धरिते ते कोण। दोन्हीमध्ये अनन्य लक्षण। असले पाहिजे'' (समर्थ)[१] याप्रमाणे उपासक व ईश्वर यांची एकरूपता जाणून आनंदानुभव घ्यायचा आणि ''आनंदे भरीन तिनही लोक'' (ज्ञानेश्वर म.) याप्रमाणे तोच आनंद साऱ्या जगाला लुटून द्यायचा; असा हा आदिअंती गोड भक्तिमार्ग आहे. अर्थात् तो निश्चयाने व शुद्ध प्रेमाने मात्र साधता आला पाहिजे म्हणजे देहभान नाहीसा होऊन 'दासोऽहं' च्या जागी 'सोऽहं' मंत्र सिद्ध होईल, अर्थात् प्रथम दास किंवा सेवक भासणार वास्तविक मालक असल्याचा अनुभव येईल; आणि स्वामी रामतीर्थाप्रमाणे स्फूर्तीचे उद्‌गार प्रगट होतील की-''मैं खेलता हूँ होली। दुनिया है गेंदगोली। ख्वा इस तरफ उठादूँ। ख्वा उस तरफ हटा दूँ।।''

अध्यात्म आणि राष्ट्रसेवा

माझ्या मित्रा ! स्वानुभवाच्या या आनंदपदावर आरूढ झाल्यानंतर जगातील कोणत्याही वस्तू तुला आकर्षित किंवा आंदोलित करू शकणार नाहीत आणि त्या भूमिकेवरून तू जे जे कार्य करशील ते सर्वांच्या खऱ्या कल्याणाचेच होईल. पूज्य महात्मा गांधी, भगवान श्रीकृष्ण किंवा रामचंद्र, स्वामी विवेकांनद, गुरुगोविंदसिंह आदि थोर थोर संत यांनी अध्यात्मभूमिकेवरून केलेली कार्येच महत्वाची ठरली आहेत ना? यासाठी आपले आत्मगाव[२] प्राप्त करून घेऊन तू देखील आपल्या गावाला व राष्ट्राला आनंदाने भरून टाकण्यासाठी या नव्या काळात नव्या जोमाने सज्ज झाला पाहिजे, एवढेच मी निश्चयाने सांगू इच्छितो.

(श्रीगुरुदेव, मार्च १९५० पृ. क्र. २-४) ✣ ✣ ✣

- सुविचार -

✣ कर्तव्यवान पुरुषाला आपल्या शुभ कर्तव्याची सुखस्वप्ने आधी प्राप्त होतात आणि नंतर त्या विजयी विचारात तो आपला पाय पुढे फेकून यश मिळवीत असतो.

✣ आपल्या व्यक्तिमत्वामुळे दुसऱ्याची मानहानी करणे म्हणजे थोड्याच दिवसात आपण खाली पडून दुसऱ्याला वर चढलेले पाहणेच होय.

-तुकड्यादास

---

१. समर्थ रामदासस्वामी   २. आत्मस्वरूप

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

४. राष्ट्रीय संपत्ती व कामगारवर्ग

(प्रत्येक मानवास सारख्याच सुखसोयीनिशी जगण्याचा हक्क आहे मग तो श्रमजीवी असो वा बुद्धिजीवी असो. हे सर्वांना लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रातील संपत्ती ही सर्वांची आहे आणि सर्वांकरिता आहे. हे सत्ताधिकारी, धर्मगुरु व लोकनेते यांनी समाजाला समजावून देण्याची नितांत गरज आहे. याची आठवण वं. महाराज प्रस्तुत लेखात सर्वांना करून देत आहे – संपादक)

राष्ट्रात स्वर्गीय आनंद केव्हा ?

माझ्या कामगार व भांडवलदार बंधुभगिनींनो ! राष्ट्रातील प्रत्येक घटकाला आपल्या वैयक्तिक जिंदगीपेक्षा राष्ट्राचे महत्व अधिक वाटले पाहिजे आणि ही गोष्ट त्याने प्रत्यक्ष आचरणाने व डोळस त्यागाने सिद्ध करून दाखविली पाहिजे. राष्ट्रातील सर्व संपत्ती सर्व घटकांच्या मालकीची आहे असे प्रत्येकास निश्चयपूर्वक वाटले पाहिजे; तसेच त्या राष्ट्राच्या संपत्तिसंचयाकरिता सात्विकतेचे प्रभावी प्रयत्न आपापल्या कर्तबगारी व मगदुरीप्रमाणे[१] सर्वांकडून अखंड चालू असले पाहिजेत. जुन्या-नव्याच्या किंवा आपले-परकेपणाच्या वादांत न पडता, परस्परसंबंध जुळविल्याने अधिक सुखसोयी होण्यासारख्या दिसत असल्यास, सामुदायिक शेतीप्रमाणेच राष्ट्रसंघाची कल्पना अधिक विकसितपणे उपयोगात आणून आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था स्थापन केली पाहिजे. सर्वांना आपल्या गरजा स्वावलंबित्वाने व सहकार्याने तसेच आपल्या सुबुद्धीच्या व कष्टांच्या आधारावर भागवता आल्या पाहिजेत आणि 'दुसरा एवढ्या उच्च पदाचा अधिकारी कां?' हे द्वेषबुद्धीने नव्हे तर संशोधक वृत्तीने ओळखून, आपल्या अधिकाराची व त्यागाची कक्षा ध्यानांत घेऊन तदनुरुप स्थितीत समाधान मानता आले पाहिजे तसेच दुसऱ्यावर कुरघोडी[२] करण्याच्या कारवायाऐवजी आपली उन्नत्ती करण्याचे सात्त्विकतेचे प्रयत्न सदैव करता आले पाहिजेत. आपल्यापेक्षा पुढे असलेल्या मोठ्या माणसाशी वागतांना जो सहानुभूतीचा गोडवा किंवा सहाय्याची अपेक्षा आपल्या वागणुकीत दिसून येईल, त्यांचीच खैरात आपणांकडून कमी असणाऱ्या बाबतीत करून आपणाला सर्वांची उन्नत्ती साधता आली पाहिजे. असा प्रकार ज्या राष्ट्रांत चालतो ते राष्ट्र जगाच्या अग्रस्थानी विराजमान झाल्याशिवाय राहात नाही आणि अशा राष्ट्रालाच मी स्वर्गतुल्य समजतो.

---

१. कष्टाप्रमाणे २. मात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धनवान आणि धर्मगुरु

संपत्ति कुठेही असो, ती राष्ट्राची आहे असे समजून जर लोक तिचा योग्य विनियोग करतील तर विरोधाचे वारे वाहूच शकणार नाही. द्रव्यसंचय कितीही ठिकाणी विभागला गेला असला तरी धनिकांना सामाजिक व राष्ट्रीय भावनेची पायमल्ली करून[१] वैयक्तिक शान-शौकिनी करण्याला मुळीच वाव असू नये; तो गुन्हाच समजला गेला पाहिजे. तसेच कष्टाळू लोकांना कष्ट करण्याकरिता ताकद मिळावी व स्वतःची योग्य उन्नत्ती करता यावी म्हणून त्यांना आवश्यक असणारा धनसंग्रह त्यांचेजवळ राहील असा मोबदला त्यांना दिला गेलाच पाहिजे. मात्र त्यांच्या हातूनही पैशांचा उपयोग व्यसनी चोचले पुरविण्याकडे किंवा अंधश्रद्धेच्या अनिष्ट रुढ्या जगवण्याकडे होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे व तो व्यय[२] देखील राष्ट्रीय गुन्हाच ठरला गेला पाहिजे. राष्ट्रातील प्रत्येक कलावंताला किंवा कामगाराला काय वेतन द्यावे-असे म्हणण्याऐवजी कमाईचे हक्क काय असावेत हे मिळकतीच्या हिस्सेरशीसह राष्ट्रसमितीने ठरविले पाहिजे तसेच राष्ट्राला कोणत्या धर्मतत्वांची गरज आहे हे तत्वदृष्ट्या समजावून त्याच रीतीने सामाजिक जीवन सुरु करण्याचे योजता आले पाहिजे. यासाठी किती गुणांनी व किती त्यागाने अलंकृत आणि किती विद्येत निष्णात असलेले धर्मनिष्ठ पुरुष 'धर्मगुरु' समजले जावेत, याची 'डिग्री' देखील राष्ट्राने ठरविलेलीच असली पाहिजे. त्याशिवाय कोणालाही धर्माच्या नांवावर जगण्याचा व राष्ट्रविघातक निभ्रामक कल्पना पुढील पिढींत रुजविण्याचा हक्क असू नये, असे ठरवून अमलांत आणता आले पाहिजे; म्हणजे राष्ट्राला आदर्शवत् बनविण्याला मुळीच प्रयास पडणार नाहीत आणि राष्ट्रीय संपत्तिचाही अपव्यय होणार नाही. वास्तविक आंधळ्यापांगळ्यांपासून तो पशुपक्ष्यांपर्यत व साध्या मजुरापासून तो विधिमंडळाच्या सदस्यापर्यंत सर्वांचाच हक्क राष्ट्राच्या संपत्तीवर असणे हा राष्ट्रीयतेचा पुरातन सिद्धांत आहे; हे नव्याने सांगण्याचे धाडस आज करावे लागते ही मानवतेच्या अधःपतनाची परिसीमाच[३] आहे.

वेतनांतील विषमता व विलासप्रवृत्ति

मित्रांनो ! आपण मला विचारतां की, ''मानव या नात्याने प्रत्येकास सारख्याच सुखसोयीनिशी जगण्याचा हक्क आहे; म्हणून श्रमजीवी व बुद्धिजीवी या दोघांनाही तसेच अधिकारी व खालचा वर्ग यांना सुद्धा सारख्याच नियमांनी

---

१. पायाखाली तुडवून २. खर्च ३. शेवटचे टोक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वेतन कां देण्यांत येऊ नये? राष्ट्राचा पैसा जर कष्ट करणाऱ्या सर्वांच्याच मालकीचा आहे तर सर्वांत सारखा कां वाटला जाऊ नये? आज त्यांच्या जीवनांत जो भयंकर फरक दिसतो त्यावर आपले काय मत आहे?''

या बाबतीत मला हे सांगावयाचे आहे की आपल्या कंमाईच्या प्रमाणावर व महत्वावरच आपले हिस्से ठरवावे लागत असतात आणि आपल्या कष्टांच्या नि बुद्धिमत्तेच्या द्वारेच त्याला किंमत आलेली असते. याला अनुसरूनच राष्ट्राचे आणि निसर्गाचेही मौलिक नियम आहेत. राष्ट्रांत पैशांचा अतोनात पूर आला असला तरी वाटेल तसा पैसा उधळण्याचा राजाला देखील हक्क नाही, मग प्रजेतील घटकांना तो कसा असणार? कारण राष्ट्राची अंतीम धारणा भौतिक सुखात गर्क राहण्याची किंवा विषयवासनेचे भूत बनून आत्मस्वातंत्र्याचा ऱ्हास करून घेण्याची कदापि ठरू शकत नाही. ही गोष्ट लक्षांत ठेवूनच राष्ट्र बनविण्याचा तात्त्विक साहित्याचा आणि संतांच्या व नेत्यांच्या सक्रीय शिकवणुकीचा प्रयत्न चालू असतो. त्या धारणीत[१] जेव्हा फरक पडतो तेव्हा रावणासारख्या महाबलाढ्य असामान्य शक्ती व संपत्तिवान राजांची व त्यांच्या राज्यांची देखील काय गति[२] होते, याचे दाखले थोरांनी दीपस्तंभासारखे आपणासमोर उजळून ठेवले आहेत व सध्याच्या जगांतील रणमैदानावरही ती चित्रे आपण पाहतच आहोत. म्हणूनच सर्वांवर तात्त्विक नियंत्रण असणे जरूरीचे असते आणि हे नियंत्रण जेव्हा राष्ट्राचे सत्ताधिकारी, धर्मगुरु व लोकनेते नि लोकशिक्षक शिथिल करतात तेव्हा सर्वांनाच व्यक्तिगत लाभांचा[३] लोभ सुटून राष्ट्रांत गोंधळ माजतो व आजच्या सारखी स्थिती निर्माण होते. अर्थात् अशा वेळी वेगवेगळी प्रतिक्रिया होऊन आणि संघर्ष माजून त्यांत सर्वांचेच अनहित होण्याचा संभव असतो.

कामगारांच्या उत्कर्षातच राष्ट्राचा विकास

राष्ट्रीयतेचे कायदे हेच अशा वेळी सर्वांना उच्चतम मार्गावर नेण्याच्या दृष्टीने आवश्यक असतात; आणि हे कायदेही त्याच लोकांच्या हाती सुरक्षित राहू शकतात, जे लोक प्रजेच्या संस्कृतीत वाढलेले, प्रजेच्या जीवनाशी समरस झालेले, त्याच देशांतले व त्याच कायद्यांच्या चौकटीत स्वतः बसणारे असतात. अशाच लोकांच्या कडून सर्वांच्या सुखाचे कायदे होऊ शकतात व म्हणून तेथील आबालवृद्ध नरनारीच आत्यंतिक सुखाचे धनी होऊन राहतात. अर्थात् यासाठी

---

१. विचारात-आचारात २. अवस्था ३. फायद्यांच्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

देशाला संपूर्ण स्वतंत्र्य व प्रजासत्ताक राजवट आवश्यक आहे. ज्या देशांत यांचा अभाव असेल त्यांत धर्म, न्याय, भक्ती किंबहुना साधी माणुसकी देखील राहणे शक्य नाही, मग उच्च राष्ट्रीयता कुठली? आणि हे श्रेष्ठ नैतिक नियम बनविणार व राबविणार तरी कोण? सुदैवाने भारतात तो सोन्याचा दिवस सर्वांच्या तपस्येने व त्यागाने केव्हाच उजाडला आहे; परंतु दुर्दैवाने त्यांचे ग्रहण अजून देखील सुटलेले नाही. जनतेच्या दुबळेपणाचा व भोळेपणाचा फायदा घेऊन व्यक्तिस्वार्थ साधण्याकडेच सर्व शक्तीचा उपयोग अनेक जाणते लोक करीत आले आहेत आणि त्यामुळे सामान्य प्रजेच्या जीवनांतील दुःख अजून थोडेसुद्धा कमी झालेले दिसत नाही. या गोष्टीकडे सर्वांची दृष्टी[१] खेचून घेणे आज अगत्याचे आहे व यामुळेच राष्ट्राची संपत्ति वाढविण्याचा प्रश्न अधिक चांगल्याप्रकारे सुटणार आहे.

व्यवहाराचे अमर अधिष्ठान

सज्जनांनो ! इहलोकीचे कायदे पारमार्थिक जीवनाच्या उन्नतीसाठी देखील उपयोगी ठरावेत असा अध्यात्माचा दृष्टिकोन आहे आणि त्याच दृष्टीने प्रत्येकाच्या संसाराला व राष्ट्राच्या संसाराला पूर्वीच्या काळी योग्य वळण लावणारे नियम ऋषिमहात्म्यांनी आखले होते. कालमानात बदल झाला आणि जीवनाला वेगळेच स्वरूप आले ही गोष्ट लक्षात घेऊन आज वेगळ्या प्रकारचे नियम अमलांत आणणे जरूरीचे आहे; पण त्यात पूर्व ऋषिसंतांचा तात्त्विक दृष्टिकोन मात्र आपण अवश्य उपयोगात आणायला पाहिजे. 'भाकरीशिवाय माणूस जगत नाही' हे जितके खरे' तितकेच 'केवळ भाकरीनेच माणूस जगत नाही' हे देखील खरे आहे. सद्भावना नीतिमत्ता, बंधुता, सामुदायिकता, न्यायसमता आणि आध्यात्मिकता या अभेद्य भूमीवरच आजच्या व्यवहाराची मांडणी आपण करू शकलो पाहिजे, तरच जगाचे जळते[२] जीवन शांत होणार नाही. सर्वांच्या जीवनाच्या गरजा भागवून त्यांचा विकास होत राहील अशी प्रत्येकाच्या मिळकतीची तरतूद करून देणे व सर्वांच्या शक्तीचा योग्य राष्ट्रोन्नतीच्या कामी उपयोग करून घेणे हे सत्ताधीशयांचे कार्य असते आणि तशा व्यवस्थेतच समाधान मानणे हे प्रत्येक घटकांची कर्तव्य ठरते. असे घडून आले म्हणजे राष्ट्रांत असंतोष व ओढाताण राहूच शकत नाही. एवढे मात्र खरे की बुद्धी व कर्तबगारी यांच्या पात्रतेनुसारच अधिकारभेद हा कोणत्याही समाजात राहतो आणि तसा तो असेल तर बाधक न होता साधकच होतो. जाति, वर्ग किंवा संपत्ति वगैरेवर आधारलेली विषमता हीच राष्ट्राचा विनाश करणारी असते. चारित्र्य, सुबुद्धता, मानवता व सांघिकता इत्यादी गोष्टी जगात अमर राहण्यासाठी व आपल्या आधारे समाजास

१. लक्ष २. दुःखी, त्रासदायक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

टिकाऊ व सामर्थ्यवान बनविण्यासाठी जन्मास आल्या असून त्यांना सोडून वागणारांना भीति ही नेहमीच राहणार आहे, मग ती व्यक्तिगत व्यवहारांत असो वा राष्ट्राच्या कारभारात असो. या अविनाश जीवनतत्वांत जेव्हा फरक दिसून येईल तेव्हा राष्ट्रपतनास गेले आहे असे समजून सर्व थोरांनी त्याला उन्नत करण्यासाठी प्राणाहुति दिली पाहिजे; सर्वांनी त्यागपूर्वक काम केले पाहिजे; असे माझे निश्चित मत आहे.

(श्रीगुरुदेव, एप्रिल १९५० पृ. क्र. २-४) ✢✢✢

५. ही भारताची प्रगती की अधोगती?

(देशासमोर सतत अनेक बिकट प्रश्न असतात आणि आपसात मतभेदही असतात म्हणून बिकट प्रश्न विशिष्ट ध्येय, विशिष्ट दिशा लक्षात घेवून सोडविले पाहिजे. राष्ट्रसंतांच्या मते मतभेद हे जीवंतपणाचे लक्षण असले तरी सर्वांच्या कल्याणासाठी आपण सर्वांनी ऐक्य साधले पाहिजे. वैयक्तिक स्वार्थ झुगारून देवून प्रत्येक स्त्रीपुरुषांनी तत्वनिष्ठ चारित्र्यवान झाले पाहिजे असे आवाहन राष्ट्रसंतांनी पुढील लेखात केले आहे. - संपादक)

आजच्या मतभेदांत उद्याच्या जगाचा संकेत

माझ्या प्रिय भारता! ही गोष्ट कुणाला कळो अथवा न कळो, पण तू मधल्या काळापेक्षा हल्ली प्रगतिपथावरूनच चालत आहेस हे विचारांती कोणासही कबूल करावेच लागेल, हवेच्या लाटा क्षणोक्षणी जशा वेगवान अथवा मंद होत असतात, तशाच जनमनाच्या लाटा[१] देखील वारंवार बदलत असतात. जेव्हा व्यक्तिगत स्वार्थ व अहंकाराची लाट, लपून छपून का होईना, लोकसागराच्या तळाशी खळबळून वाहू लागते, तेव्हा 'मतामतांचा गलबला' बेसुमार वाढू लागतो. अनेक पक्षी एखाद्या झाडावर बसलेले असता एखाद्याने त्यावर दगड फेकला म्हणजे तेथे जसा भयंकर किलबिलाट होतो, तसाच जनमनाच्या स्वार्थी ओढाताणीमुळे विचित्र गोंगाट होत असतो आणि त्यातून अखेर काय निष्पन्न[२] होईल ते कळेनासे होते. पण या स्पर्धेच्या निमित्ताने लोकांची पावले-चुकीच्या मार्गाने पडून का होईना पण-बळकट नि वेगवान बनलेली असतात. त्यांच्या बुद्धिशक्तीचा स्वतंत्र पद्धतीने विकास होत असतो; इतकेच की त्याच्या पाठीशी राष्ट्रीय धारणा किंवा नैतिक भूमिका यांची उणीव असते व म्हणूनच ती प्रगती,

---

१. मनोविचार २. फलप्राप्ती

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रगती न बनता अधोगती बनते. अर्थात् या गोष्टीची प्रतिक्रिया होऊन अखेर ठोकरा[१] खाव्या लागल्या म्हणजे समष्टिसुखाच्या भावनेची लाट पुन्हा उसळी घेते आणि तेव्हा मात्र समाज तेवढाच प्रगतिपथावर चालत असलेला दिसून येतो. स्वतःच्या पत्नीवर अलोट प्रेम करणारे तुलसीदास वृत्ती पालटतांच रामचंद्रावर तितक्याच उत्कटतेने प्रेम करून राष्ट्रगुरु व्हावेत, तद्वतच समाजाच्या ध्येयांत परिवर्तन होताच त्याची वेगवेगळ्या खटाटोपात खर्च होणारी बुद्धी व शक्तीची वाढ प्रगतीच्या रूपात झळकू लागते. आमची ही भारतीय जनता अशा अनेक प्रसंगातून पार पडून आज ज्या स्थितीत आली आहे ती देखील प्रगतीची पाऊलवाटच होय, असे मी म्हणू शकतो.

अनेक लहान लहान गावांच्या रूपात वसलेला, अनेक पंथपक्षांनी असंघटित केलेला, आकुंचित जातिजातींच्या परिणामास पोहोचलेला, व्यक्तिस्वार्थाने घराघरात तुकडे होऊन पडलेला, गुलामगिरी व गुंडगिरी यांनी मेटाकुटीस आलेला, धर्माधर्मीच्या वेडगळ कल्पनांनी व सांप्रदायिक बुवाबाजींनी गजबजलेला आणि 'बळी तो कान पिळी' या न्यायाने ज्याने त्याने पिळवटून काढलेला हा देश पाहिल्यावर, आज आम्हीच काय पण कुणीही 'तो प्रगत आहे' असे म्हणण्याची हिंमत करणार नाही. पण हे त्याचे बाह्य रूप झाले. त्याच्या अंतरंगात या सर्व घातुक गोष्टीचा धुव्वा उडविणारी शक्ती धुमसत आहे आणि आज ना उद्या ती विजयी होऊन त्याचे रूप पालटून टाकल्या शिवाय राहणार नाही हे निर्विवाद सत्य आहे. या भीषण परिस्थितीच्या अतिरेकांतूनच महत्वाचे अनुभव प्रगट होऊन ते समाजाला आमूलाग्र बदलून टाकतील आणि स्वार्थाच्या पायी खर्च होणारी संपूर्ण शक्ती राष्ट्राच्या विकासाचे रूप घेईल.

क्षुब्ध सागरांत प्रगतीचा संथ प्रवाह

प्रिय मित्रांनो ! या देशाला लाभलेली नररत्ने[२] इतक्या विपुलतेने कोणत्याही देशाला लाभली नसतील. उत्सुक आध्यात्मिक वृत्तीचे, भूतदयेने भरलेल्या ज्ञानाचे, दुसऱ्याच्या सुखासाठी व सेवेसाठी लंगोटी घालून फकीराप्रमाणे राहण्यांतही आपले जीवन सुखमय समजणारे असे कितीतरी महापुरुष या देशांत झाले असून, त्यांच्या पुण्याईनेच हा देश वेळोवेळी प्रगतिपथावर आरूढ झाला आहे. पूज्य महात्मा गांधीजींनी तर त्या सर्वांच्या कार्यमंदिरावर कळस लावून ठेवला आहे; पण प्रगतीचा मार्ग येथेच संपला असे मात्र नाही, हा देश यापुढेही

१. टक्केटोणपे   २. महापुरुष

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

किती उच्च गतीला जाईल याची कल्पना सध्याच्या चालू मतमतांतरामुळे व पक्षापक्षांच्या कल्होळामुळे[1] कदाचित कोणाला येऊ शकणार नाही; पणं त्यातच वास्तविक तिचे स्वरूप लपलेले आहे. कारण जिवंत बुद्धीच्या माणसांतच ही मताभिन्नतेची शक्ती असते आणि त्या शक्तीच्या प्रमाणांतच अखेर विकासही होतो.

आज ज्या अटीतटीच्या प्रश्नांना लोक बाजूस ढकलू पाहतात किंवा दाबून टाकू इच्छितात ते सर्व प्रश्न म्हणजे उद्याच्या भारताची रूपरेखा अथवा भावी जगाचे सूक्ष्म रूपच होय. सर्वांना सुखी करण्याचा ईश्वरी संकेत ध्यानांत घेऊन चालू जीवनांतील बिकट प्रश्न त्या दिशेने सर्वांनी सोडविले पाहिजेत. मतभेद हे जिवंतपणाचे लक्षण असले तरी सर्वांच्या कल्याणासाठी म्हणून प्रसंगी सर्वांचे ऐक्यही झालेच पाहिजे. आज त्याच एका गोष्टीची सर्वांत जास्त उणीव व गरज आहे आणि तेवढे होताच आजचा भारतवर्ष प्रगतीच्या वाटेवर कुठल्या कुठे जाऊन पोहोचणार आहे. या देशांतील प्रत्येक पुरुष आज जेवढ्या वेगाने सर्वांहून पुढे जाता येईल तेवढ्या वेगाने जाण्याची इच्छा करीत आहे. त्यांत दुसऱ्याला मागे लोटण्याची प्रवृत्तिच तेवढी चुकीची लागणार आहे; आणि अनुभवाने मात्र मग सर्वच एका स्थितीवर येऊन शहाणे होतील नि ऐक्य घडवून प्रगती करून घेतील यांत शंका नाही.

वैयक्तिक स्वार्थ झुगाराल तरच जगाल !

मला सांगावयाचे एवढेच आहे की, पथ[2] हा कधीच मुक्काम होऊ शकत नाही. तो ज्या दिवशी मुक्काम बनेल त्या दिवशी कार्यच खुंटून जाईल; पण निकट भविष्यांत भारतात तरी ते शक्य नाही. या देशाला अजून सुखाची दिल्ली दूर आहे. ती गाठणे या देशाच्या जनमनाच्या विकासांवरच अवलंबून आहे. व्यक्तिने कितीही प्रगती केली तरी ती तकलादी ठरणार नाही; त्यासाठी साऱ्या राष्ट्राच्या प्रगतीचे ध्येय दृष्टीपुढे ठेवूनच सर्वांनी एका दिशेने पावले टाकली पाहिजेत. साऱ्या देशाचे पाऊल झपाट्याने पुढे पडावे म्हणून देशांतील प्रत्येक स्त्रीपुरुष सुशिक्षित, वीरश्रीयुक्त, तत्त्वनिष्ठ, चारित्र्यवान, देशाला देवाप्रमाणे मानणारा व राष्ट्राच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना प्राणांची ओवाळणी घालूनही मदत करणारा असा बनला पाहिजे; बनविला पाहिजे. घराघरांत निर्व्यसनी आरोग्य नांदले पाहिजे; स्वार्थलोलुप माणसे डोळ्यांनीही दिसता कामा नयेत अशी प्रवृत्तीच जनमनांत घुसविली पाहिजे.

---

१. गोंधळामुळे २. मार्ग

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

चालू परिस्थितीत[१] सर्वांनी आपल्या कल्याणांचा विचार करून, राष्ट्राला प्रगत करण्यासाठी ऐक्य साधण्याचा व वरील गोष्टीची जोड सध्याच्या प्रगतिपथाला देण्याचा जर इमाने इतबारे प्रयत्न केला ना, तर भारतांत रामराज्याचे चौघडे क्षणांत वाजू लागतील. इथले रहिवासी देव म्हणून पूजले जातील आणि ते दुर्जनविरोधकांना काळासारखे व सत्यतेने वागणारांना मातापित्यासारखे दिसतील. ती जबाबदारी टाळून प्रत्येकजण जर स्वत:पुरते पाहू लागेल आणि काळाची पावले न ओळखता वागेल तर निसर्ग गचांडी देऊनही त्याला अखेर रस्त्यावर आणल्याशिवाय राहणार नाही, हे पक्के ध्यानांत ठेवावे, भारतवर्ष आपल्या प्रगतीच्या आड येणाऱ्या मोठमोठ्या व्यक्तीनाच नव्हे तर शक्तींना देखील पायरी बनवून आपला 'रोलर' पुढेच ढकलीत राहील, असा त्याच्या कणकणांच्या आंतून आवाज घुमत आहे. 'बदला अथवा मरा' हाच निसर्गाचा कायदा[२] आहे !

तो सुवर्णादिन.....

माझ्या मित्रांनो ! भारत सर्वांच्या सहकार्याने व परिश्रमामुळे उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान होऊन जगाच्या गुरुस्थानी शोभत आहे, असे दृश्य ज्या दिवशी दिसेल अशा सुवर्णदिवसाची आम्ही वाट पाहात आहोत, त्या मार्गाने चालत आहोत आणि कुणी भेटले तर त्यांना नम्रपणे तेच करायचा सुचवीत आहोत. श्रीगुरु ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या भरतवाक्यांत म्हटल्याप्रमाणे-[३]

''जे खळांची व्यंकटी सांडो।
तयां सत्कर्मी रति वाढो।
भूतां परस्परे जडो।
मैत्र जीवाचे ॥१॥
किंबहुना सर्व सुखी।
पूर्ण होवोनि तिही लोकी।
भजि जो आदिपुरुषीं।
अखंडित ॥२॥''

असा आमचा भारतदेश शुद्ध, सर्वोन्नत व सुखी होवो हीच ईश्वराजवळ आमची सदैव मागणी आहे !

(श्रीगुरुदेव, मे १९५० पृ. क्र. ४-५)

१.सध्याच्या काळात २. नियम ३. ज्ञानेश्वरी अ. १८ ओवी १७९४

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

६. ही आपसातील झुंज म्हणजे राष्ट्राचा सर्वनाश !

(सत्ता आणि सेवा यांचे अधिष्ठानावर ऐक्य घडवून आणण्यातच आज सर्वांचे हित आहे. त्यासाठी विध्वंसक मार्ग न स्वीकारता विधायक मार्गाच्या आणि कार्याच्या दिशेने पाऊल टाकणे अत्यावश्यक आहे.तद्वतच झगडा सत्तेचा असतो, सेवेचा असूच शकत नाही याची जाणीव देवून वं. महाराजांनी आपसातील झगडे मिटविण्याचा हितोपदेश प्रस्तुत लेखात केलेला आहे –संपादक)

दोन हत्तींच्या टक्करीत जनतेचा चक्काचूर !

माझ्या मित्रांनो ! अधिकारालालसा अणि व्यक्तीव्यक्तीचे व गटागटांचे स्वार्थ यांनीच आजपर्यंत भारताचा सत्यानाश झाला आहे, हे केव्हाही विसरू नका. जाणते लोक मागासलेल्या जनतेची सेवा व उन्नत्ती करण्याऐवजी फुकटची मानप्रतिष्ठा मिळविण्यासाठीच जर धडपड व ओढाताण करू लागतील तर त्यांचे ते महापाप राष्ट्राला खड्ड्यात घातल्याशिवाय राहणार नाही. मस्तवाल[१] हत्ती आपसात खूप झुंजतात, पण त्यामुळे जंगलांतील झाडाझुडपांचा नि गरीब जीवांचा चुराडा होतो; याला जबाबदार कोण? वास्तविक दोघांनीही एक व्हावे- स्वार्थासाठी नव्हे तर सेवेसाठी-यांतच सर्वांचे कल्याण आहे. काँग्रेस सरकार व जनतेतील अनेक लहानथोर पक्ष यांनी एकाच दिशेने राष्ट्रनिर्मितीचे कार्य करण्याकडे जर आपली शक्ती खर्ची घातली तर ते काय करू शकणार नाहीत!

राष्ट्र तुमचे सर्वांचे आहे; त्याची उन्नती व सुरक्षा हेच सर्वांचे समान ध्येय आहे आणि राष्ट्रोन्नतीच्या शेकडो गोष्टी आपणा सर्वांची वाट पाहत आहेत. मग त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपसांत अशी कुतर ओढ[२] करण्यांत शहाणपणा कसला? जबरदस्तीचा पाहुणा बनून का लोक तुम्हाला पुढारी समजणार आहेत? तुम्हाला समाजाचे खरे नेतृत्व हवे असेल, तर त्यासाठी सत्तेची लालसा सोडून सेवेचाच मार्ग चोखाळला पाहिजे.

पुढाऱ्यांचे पतंग आणि भूगर्भातील ज्वाला

मित्रांनो ! आपत्तींच्या मेघांनी भरून आलेल्या भारताच्या आकाशात आपापले रंगीबेरंगी पतंग उडवून काटछाट करण्यांतच जर मग्न राहाल तर तुम्हाला खात्रीने पश्चाताप करावा लागेल ! सत्ता आणि सेवा यांचे सत्याच्या अधिष्ठानावर ऐक्य घडवून आणण्यांतच आज सर्वांचे हित आहे हे लक्षांत ठेवा

---

१. माजलेला २. ओढाताण

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आणि सामान्य जनांचे प्रामाणिक सेवक बनून त्यांच्या हृदयासिंहासनावर गौरवाने विराजमान व्हा !

आज आपण पाहात आहोत की घरांघरांत पाट्यां पडल्या आहेत; एकेका संस्थेत अनेक गट नि पक्ष निर्माण झाले आहेत. प्रत्येक पुढारी आपल्या भोवती घरकुल करून त्यात राजासारखा डामडौलाने नांदण्याचा विचार करीत असल्याचे दिसत आहे. अनेकजन जनतेची कळकळ दाखवितात, पण ती दाखविण्यापुरतीच दिसून येते. लोकांच्या जीवनांत जी आग पसरली आहे, दारिद्र्याचे भयानक दृश्य जे पदोपंदी दिसत आहे आणि निरपराधी जनतेला जे कष्ट सोसावे लागत आहेत, त्यांच्या निवारणासाठी कोणीही पुढे पाऊल घ्यायला तयार नसून जो तो पुढारी बनून सिंहासनावर बसण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी आपसांत विरोध, कृष्णकारस्थाने, उलटी सुलटी इलेक्शनबाजी किंबहुना मारामाऱ्या करण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली आहे. वास्तविक हा मार्ग अत्यंत धोक्याचा असून, राष्ट्रात अशीच यादवी बंद करून राष्ट्राच्या हृदयांत पेट घेत असलेल्या अग्निज्वाला शांत करण्याकडे जर सर्वजन आपला मोर्चा वळवतील तरच त्यांना व सर्वांना सुखाने वैभव-भोगतां येईल, ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे.

विध्वंसक नको, विधायक बना !

मित्रांनो ! राष्ट्राची उन्नत्ती करण्याचा अधिकार आणि कर्तव्याची जबाबदारी राष्ट्रध्यक्षाइतकीच राष्ट्राच्या प्रत्येक घटकाकडे आहे. तऱ्हेतऱ्हेचे 'वाद' घालून किंवा गटांचे राजकारण लढवून राष्ट्रांचे एक पाऊल देखील पुढे पडणार नाही. आपल्या अस्ताव्यस्त[१] झालेल्या बुद्धीला एकत्र आणा, राष्ट्राच्या वर्तमान परिस्थितीचा पूर्णपणे विचार करा आणि सर्व नेते, पुढारी व पक्षाधिपति किंवा कार्यकर्ते मिळून त्यावर विधायक उपाययोजना प्रामाणिकपणे निश्चित करून, राष्ट्राला उज्ज्वल स्वरूप देण्याच्या कार्यास लागा. आपसांत लढण्याची किंवा परस्परांना खाली ओढण्याची प्रवृती हे महान पातक[२] आहे. आपली शक्ती या कामी खर्च करण्याऐवजी सध्याच्या बिकट जीवनासंग्रामांत जनतेला कसे सुखी व समृद्ध बनविता येईल या बाबतीत नवनवीन शोध आणि सुधारणा करण्यात आपले तेज पाडून दाखवा, एकेक तालुका, जिल्हा किंवा गाव घेऊन त्यालाच आपले कार्यक्षेत्र बनवून, तेथे रामराज्याची कल्पना आपल्या विधायक कार्यक्रमांनी मूर्त करून दाखवा; म्हणजे काही ओढाताण न करताही तुम्ही

१. विस्कळीत २. पाप

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सहजच जनतेचे पुढारी व्हाल. बनवाबनवी न करताही लोक तुम्हाला आपले नेते ठरवून सन्मान देतील आणि तुमचे ते सेवेने प्राप्त झालेले पुढारीपण हिरावून घेण्याची ताकद सत्तेच्या अंगी देखील राहणार नाही.

झगडा सत्तेचा असतो, सेवेचा असूच शकत नाही. सत्तेसाठी तुम्ही कितीही धडपडले तरी तो मार्ग शाश्वत आणि निर्वेध नाही; पण सेवेने तुम्ही पुढे आले तर तुमचे श्रेष्ठत्व कायम राहणार आहे. ते काढून घेण्यासाठी दुसऱ्याला तुमच्यापेक्षाही श्रेष्ठ सेवाच करावी लागेल; आणि अशा सन्मार्गात उत्पन्न झालेल्या स्पर्धेपासून राष्ट्राचे कल्याणच होईल. पूज्य महात्माजींची सेवेची सत्ता ही जगांतील अनेक राजेरजवाड्यांच्या व साम्राज्यशाहीच्या सत्तेहून देखील सामर्थ्यवान व टिकाऊ होती, ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. अशा सेवेच्या सत्तेत राज्य चालविण्याचीच नव्हे तर जगात उलथापालथ[१] करण्यांची महान क्रांती घडवून आणण्याची देखील ताकद असते. सेवाप्रिय व सुबुद्ध प्रजा राजसत्तेशिवाय देखील राज्य चांगल्या प्रकारे चालवू शकते आणि आपसांत सावळागोंधळ व स्वार्थासाठी चढाओढ करणारी प्रजा ही स्वतःचा प्राण वाचविण्यासाठी देखील असमर्थ ठरून आपल्या शक्तींनीच आपला सत्यानाश करून घेते.

मित्रांनो ! आपल्या तात्कालिक[२] व क्षुद्र स्वार्थासाठी प्रजेत गोंधळ माजवून एक अनिष्ट परंपरा उत्पन्न करण्याचे पाप माथी लावून घेऊ नका; हातात असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करून स्वार्थ साधण्यात गुंग होऊ नका आणि थोरामोठ्यांच्या नावांवर आपले पुढारीपण मिरवून जनतेच्या डोळ्यात धूळ फेकणारा आता स्वतःच आंधळा होणार आहे. आणि सत्तांधतेने लोकांवर डोळे काढणारा परिणामी लोकांना आपले डोळे फोडण्यासाठी प्रवृत्त करणार आहे. जनतेला डोळस बनवून सर्वांच्या सेवेच्या मार्गाने जाणाराच यापुढे स्वतःचे व जगाचेही भले करील.

पुढारीपणाचा सुदृढ पाया

जाणते लोक मागासलेल्या लोकांची उन्नत्ती करण्याची आपली जबाबदारी विसरून त्यांच्या जीवावर चैन करण्याच्या मागे लागत आले.हेच पाप आज भारताला पदोपदी नडत आहे; त्याचा सर्व क्षेत्रांत अधःपतन करण्यास कारण झाले आहे. लोकांची खरीखुरी उन्नत्ती व त्यांच्या हक्कांची नि·कर्तव्याची जागृत्ती केल्याशिवाय भारताचे पाऊल कशानेही पुढे पडणार नाही. यासाठी

---

१. क्रांतीकारी बदल २. तात्पुरत्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सर्वांनी प्रामाणिकपणे लोकशिक्षणाचे व लोकसेवेचे आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. जनतेला सध्याच्या भयानक गर्तेतून वर काढून सुखी जीवनाचा आस्वाद देण्याला जे जे कोणी कारणीभूत[१] होतील त्यांचे नांव सर्वांच्या हृदयात कायमचे कोरले जाईल. त्याला कॅनव्हासिंग[२] करण्याचे, कारस्थाने व आपसांतील झुंज करून पुढे येण्याचे कारणच पडणार नाही.

सेवा हाच राष्ट्राचा व पुढारीपणाचा पाया आहे. हा मूळ झरा सोडून तुम्ही उगीच दुसऱ्यांना अडथळे करण्याची व गावोगावी गोंधळ माजविण्याची व्यर्थ खटपट कां करिता? आपल्या याच शक्तीने जगाची सेवा करा आणि सर्वांचे प्रेमी होऊन बसा. खाली दबलेल्यांना आपल्या सेवेने वर उठवा आणि स्वार्थी राजकारणपटूंना आपल्या तेजस्वी सेवेने राष्ट्रीयतेची जाणीव देऊन वठणीवर[३] आणा. या मार्गानेच तुमच्यासह राष्ट्रांचे शाश्वत कल्याण होणार आहे हे पूर्ण लक्षात ठेवा!

(श्रीगुरुदेव, जून १९५० पृ. क्र. ४-५)

स्फुट लेखन-

शील व चारित्र्य हीच साक्षरतेची कसोटी

सुशिक्षित आणि अशिक्षितपणा ठरवितांना नुसतीच शैक्षणिक लायकी लक्षांत घेऊन भागणार नाही. तर बरोबरच विद्यार्थ्यांचे शील आणि चारित्र्य यांच्याकडेही पहावे लागेल. स्वार्थी आणि आपमतलबी मनुष्य कितीही शिकलेला असतला तरी तो अशिक्षितच होय आणि दुसऱ्याच्या सुखाकरिता झिजणारा, तळमळणारा अज्ञानी इसम देशील खऱ्या अर्थाने सुशिक्षित होय. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशबांधवांना कसा मिळेल यासाठी सदैव झटण्यातच त्यांच्या शिक्षणाचे काही चीज होऊ शकेल. खेडूतांमध्ये नवचैतन्य कसे निर्माण होईल याचीच सदैव चिंता बाळगून खेडूतांना त्यांच्या शक्तीची जाणीव करून दिली पाहिजे. आज इंग्रज आपल्या देशातून गेले आणि आपण स्वराज्य उपभोगू लागलो आहोत. अशा प्रसंगी आपणावरील जबाबदारीचे यथार्थ ज्ञान तुम्ही बहुजन-समाजाला दिले पाहिजे.''

-तुकड्यादास

१. निमित्त २. प्रचार, प्रसिद्धी ३. ताळ्यावर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

७. अदृश्य रूपातील देवतांचे दृष्टांत

(अदृश्य रूपाने देवतांचे दृष्टांत साधकाला होत असतात असा सर्वसामान्य समज आहे म्हणूनच वं. राष्ट्रसंतांनी प्रस्तुत लेखात दृष्टांताचे स्वरूप, दृष्टांताचे अधिकारी, स्थूलसृष्टी व सूक्ष्मसृष्टी, अंतरीचा प्रतिध्वनी याविषयी सविस्तर विवेचन करून आर्त साधकाला मार्गदर्शन केले आहे. – संपादक)

देव देवता दैवते भूते । मिथ्या म्हणों नये त्यांते ।
आपुलाल्या सामर्थ्ये ते । पृथ्वीमध्ये फिरती ॥
अवघेचि न्याल अभावे । तरि हे बहुतांस आहे ठावें ।
आपुलाल्या अनुभवे । विश्वलोक जाणती ॥

– समर्थ रामदास

दृष्टांताचे अधिकारी व मार्ग

मनुष्याच्या आचाराविचारांतून त्याची मानसिक स्थिती जसजशी विकसित व अंतरंग होत जाते, जसतसा तो निरनिराळ्या सूक्ष्म सृष्टींशी समरस होत जात असतो. देवतासृष्टी ही देखील सूक्ष्म सृष्टीमधील अशीच एक कक्षा[१] आहे आणि त्या कक्षेचे अधिकारी तेच लोक असतात की जे भावनेच्या एका उच्च व सूक्ष्म पातळीशी तादात्म्य पावलेले असतात. त्यांना जेव्हा सत्य स्फूर्तीचे नि:संशय असे स्फुरण होऊ लागते तेव्हा ते एका सृष्टीशीच समरस झालेले असतात व त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यात येणारे वातावरण त्यांच्या सहज प्रक्रियेतून उद्‌भवत असूनही ‘‘देवतेनेच मला तसा दृष्टांत दिला’’ असे ते समजूं लागतात आणि सांगूही लागतात. वास्तविक पाहता तसे म्हणण्याचे काही कारण नाही, कारण हा दृष्टांत म्हणजे त्यांच्या एका विशिष्ट पातळीवर गेलेल्या भावनेचा स्वाभाविक प्रतिध्वनि असतो. परंतु स्थूल सृष्टी एवढीच वास्तविक सृष्टी आहे आणि तेवढीच आपल्या आटोक्यात आहे अशी त्यांची समजूत असल्यामुळे, सूक्ष्म सृष्टीशी जडलेला संबंध हा आपल्या कक्षेतला नसून ती देवतांची कृपा आहे असे त्यास वाटत असते.

स्थूलसृष्टीपेक्षा श्रेष्ठ सूक्ष्मसृष्टी

ही गोष्ट प्रत्येकाने ध्यानात ठेवायला हवी की स्थूल सृष्टीइतकीच किंबहुना तिच्याहूनही अधिक विस्तृत व अधिक सामर्थ्यवान अशी सूक्ष्मसृष्टी

१.विभाग

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

[illegible] सर्वत्र पसरली आहे. क्रमक्रमाने पृथ्वीपेक्षा आप, त्याहून तेज, त्याहून वायु व त्या सर्वांहून आकाश जसे विरल[१] विरल होत गेले आहे तसेच त्या सर्वांहून भावनाशक्तीचे स्वरूप सूक्ष्म आहे. वरील प्रत्येक महाभूत क्रमशः एकापेक्षा एक सूक्ष्म तसेच अधिकाधिक व्यापक असून एकाहून एक विशेष सामर्थ्यवानही आहे. या सर्व स्थूल सृष्टीपेक्षा सूक्ष्म सृष्टी सुद्धा अशीच व्यापक व सामर्थ्यवान आहे; परंतु तिचे साधारण स्थितीत आकलन होत नाही त्यामुळे ती नाहीच असा लोकांचा समज झालेला आहे आणि जे कोणी भावनेच्या सूक्ष्मत्वामुळे कळत अथवा नकळत त्या सृष्टीत प्रवेश करितात, त्यांना काही विशेष गोष्टींचा अनुभव स्वाभाविकपणे आल्यास ते त्यांना दैवी चमत्काराच्या किंवा आकस्मिक योगायोगाच्या कोटीत ढकलत असतात. वस्तुतः मनुष्याचा सूक्ष्म सृष्टीशी अखंड संबंध आहे; परंतु तो त्याच्या जड चंचल बनलेल्या बहिर्मुख भावनेमुळे त्याला कळत नाही व फळतही नाही. भावनेच्या सागरात जो जितका खोल जाईल तितके शिंपल्याऐवजी मोती व हिरे त्याच्या हाती लागतील, हे नैसर्गिक आहे. स्थूल सृष्टीत घडणाऱ्या घडामोडीचे मूळ सूक्ष्मसृष्टीत असून आधी सूक्ष्म सृष्टीत आकारास आलेल्या गोष्टीच स्थूल स्वरूपात येत असतात. तेव्हा जो कोणी त्या सूक्ष्म सृष्टीशी समरस होईल त्याला काही अद्‌भूत असे सत्य संकेत प्राप्त होणे साहजिकच आहे; मग त्याला तो नाव कोणतेही देवो.

दृष्टांत स्वप्न आणि कल्पना

जागृतीत मार्गाने चालणाऱ्या माणसाला कोणीही भेटणे किंवा कोणाचे तरी आवाज ऐकू येणे जितके स्वाभाविक, तितकेच सूक्ष्म सृष्टीशी समरस झालेल्यांना त्यांच्या त्यांच्या पातळीप्रमाणे दैवी संदेश मिळणे किंवा भवितव्याचे दर्शन घडणे साहजिक व सत्य आहे; त्यात अस्वाभाविक असे काय आहे? परंतु जागृतीत आल्यावर स्वप्नातील मनुष्याचे भाषण सांगणे- तो आपल्याशी बोलल्याचे घोषित करणे हे जसे अज्ञपणाचे आहे, तसेच सूक्ष्म सृष्टींशी एकरूप होऊन घेतलेल्या कानोशाला[२] 'देवतांचे दृष्टांत' असा शिक्का मारणे असमंजसपणाचे म्हटले जाईल. दृष्टांत हा वास्तविक मनाच्या सूक्ष्मावस्थेचा, भावनातादात्म्याचा प्रकार आहे. जसे, म्हणतात ना की ''मला ही गोष्ट घडण्यापूर्वीच असं वाटत होतं की तसं होणारच बघा. अन् अगदी तसंच की हो झालं!'' मनुष्याच्या सूक्ष्म मनाला बरेचदा असा आधीच कयास होऊन चुकतो हे खरे आहे; पण तो तसा ठामपणे आधी सांगू कां शकला नाही? याचे कारण, त्याने त्या विषयाचा अनुभव [illegible]; त्याच्या चंचल व बहिर्मुखतेमुळे गोंधळलेल्या मनाला नेमकी

१. [illegible] २. [illegible] आवाजाला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्पष्टपणे ती गोष्ट निवडता आलेली नसते. आणि म्हणूनच तो कार्य घडल्यावर आपले सूक्ष्म विचार प्रगट करीत असतो. कोणतीही उच्च अवस्था प्राप्त होण्यासाठी मनुष्याला अभ्यासपूर्वक तिच्या संपूर्ण पायऱ्या चढून जाव्या लागतात; तेव्हाच तिचे यथार्थ[१] आकलन होते.

दृष्टांतविषयक समजुतीची छाननी

मला प्रश्न विचारणाऱ्या माझ्या मित्रांनी म्हटलेले आहे की- ''आपण 'विश्वशांतियोग' या आपल्या पुस्तकांतील एका लेखात दृष्टांताची व्याख्या 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' एवढीच केलेली आहे आणि कित्येक अन्य सद्ग्रंथांत तर असे लिहिले आहे की संतमहात्मे किंवा देवता सूक्ष्मरूपाने वास करितात आणि साधकांना प्रसंगी स्वप्नांत किंवा ध्यानावस्थेत ते मार्गदर्शनही करितात. परंतु आपले म्हणणे तसे कां दिसत नाही?'' या बाबत मी उलट असे विचारू इच्छितो की, सूक्ष्मरूपाने फिरणाऱ्या देवतांना पाहणारा किंवा त्यांचा आदेश ऐकणारा माणूस हा सूक्ष्मरूपच असावा लागतो की स्थूलशरीरी असला तरी चालेल? तो जडरूप किंवा बहिरंग अवस्थेचा असला तरी चालेल, असे जर कुणाचे म्हणणे असेल तर, साधारण अवस्थेत देखील प्रत्येक माणसांशी सामान्य लोकाप्रमाणे देवतांना व सूक्ष्म संतऋषींना भेटण्यास व बोलण्यास काहीच अडचण असू नये. पण तसा अनुभव येतो का? सूक्ष्मरूपांतील देवतांशी संभाषण करणारा पुरुष एकाच काळी सूक्ष्म देवता व स्थूल मनुष्यसमाज यांना पाहू शकणे शक्य आहे काय? वास्तविक, जेव्हा तो सूक्ष्म सृष्टीत असेल तेव्हा तो बहिरंग होऊंच शकणार नाही; कारण वृत्तीची द्वारे अनेक असली तरी वृत्ती एकच असते व ती एका वेळी दोन वेगवेगळ्या सृष्टीत म्हणजे स्थितीत वावरू शकणार नाही. अर्थात् सूक्ष्म वृत्तीचा-अंतर्मुख-माणूसच त्या देवतांचा उपदेश ऐकण्यास पात्र आहे असे जर म्हणावयाचे तर, जो ज्या गावचा माणूस भेटणे म्हणजे 'दैवी दृष्टांत होणे' असे कसे म्हणता येईल? ती तर त्याचीच स्वतःची अवस्था झाली? असे जर आहे तर मग आपण मला असे कसे सुचविता की सूक्ष्म रूपाने देवता फिरत असतात आणि त्या कुणालाही दृष्टांत देतात. कुणाशीही बोलतात?

माझ्या मित्रांनो! तसे जर कदाचित् खरे मानले तर त्यांचे अचूक भाषण-भावी कार्याच्या रूपरेषेसंबंधी निश्चित मार्गदर्शन-ते आज कोणत्या माणसाजवळ करीत आहेत? आणि जर तसे करीत असतील तर प्रत्येकाचे प्रयोग आज असे कां फसले जातात? हिंदु, इस्लाम, खिस्ती इत्यादी सर्वांचेच धर्म ईश्वरप्रणीत समजले जात असूनही त्यांच्यात जसा भेद व विरोधाचा गोंधळ सुरु

---

१. सत्य, वास्तविक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आपल्या सभोवती सर्वत्र पसरली आहे. क्रमक्रमाने पृथ्वीपेक्षा आप, त्याहून तेज, त्याहून वायु व त्या सर्वांहून आकाश जसे विरल[१] विरल होत गेले आहे तसेच त्या सर्वांहून भावनाशक्तीचे स्वरूप सूक्ष्म आहे. वरील प्रत्येक महाभूत क्रमशः एकापेक्षा एक सूक्ष्म तसेच अधिकाधिक व्यापक असून एकाहून एक विशेष सामर्थ्यवानही आहे. या सर्व स्थूल सृष्टीपेक्षा सूक्ष्म सृष्टी सुद्धा अशीच व्यापक व सामर्थ्यवान आहे; परंतु तिचे साधारण स्थितीत आकलन होत नाही त्यामुळे ती नाहीच असा लोकांचा समज झालेला आहे आणि जे कोणी भावनेच्या सूक्ष्मत्वामुळे कळत अथवा नकळत त्या सृष्टीत प्रवेश करितात, त्यांना काही विशेष गोष्टींचा अनुभव स्वाभाविकपणे आल्यास ते त्यांना दैवी चमत्काराच्या किंवा आकस्मिक योगायोगाच्या कोटीत ढकलत असतात. वस्तुतः मनुष्याचा सूक्ष्म सृष्टीशी अखंड संबंध आहे; परंतु तो त्याच्या जड चंचल बनलेल्या बहिर्मुख भावनेमुळे त्याला कळत नाही व फळतही नाही. भावनेच्या सागरात जो जितका खोल जाईल तितके शिंपल्याऐवजी मोती व हिरे त्याच्या हाती लागतील, हे नैसर्गिक आहे. स्थूल सृष्टीत घडणाऱ्या घडामोडीचे मूळ सूक्ष्मसृष्टीत असून आधी सूक्ष्म सृष्टीत आकारास आलेल्या गोष्टीच स्थूल स्वरूपात येत असतात. तेव्हा जो कोणी त्या सूक्ष्म सृष्टीशी समरस होईल त्याला काही अद्‌भूत असे सत्य संकेत प्राप्त होणे साहजिकच आहे; मग त्याला तो नाव कोणतेही देवो.

दृष्टांत स्वप्न आणि कल्पना

जागृतीत मार्गाने चालणाऱ्या माणसाला कोणीही भेटणे किंवा कोणाचे तरी आवाज ऐकू येणे जितके स्वाभाविक, तितकेच सूक्ष्म सृष्टीशी समरस झालेल्यांना त्यांच्या त्यांच्या पातळीप्रमाणे दैवी संदेश मिळणे किंवा भवितव्याचे दर्शन घडणे साहजिक व सत्य आहे; त्यात अस्वाभाविक असे काय आहे? परंतु जागृतीत आल्यावर स्वप्नातील मनुष्याचे भाषण सांगणे- तो आपल्याशी बोलल्याचे घोषित करणे हे जसे अज्ञपणाचे आहे, तसेच सूक्ष्म सृष्टींशी एकरूप होऊन घेतलेल्या कानोशाला[२] 'देवतांचे दृष्टांत' असा शिक्का मारणे असमंजसपणाचे म्हटले जाईल. दृष्टांत हा वास्तविक मनाच्या सूक्ष्मावस्थेचा, भावनातादात्म्याचा प्रकार आहे. जसे, म्हणतात ना की ''मला ही गोष्ट घडण्यापूर्वीच असं वाटत होतं की तसं होणारच बघा. अन् अगदी तसंच की हो झालं!'' मनुष्याच्या सूक्ष्म मनाला बरेचदा असा आधीच कयास होऊन चुकतो हे खरे आहे; पण तो तसा ठामपणे आधी सांगू कां शकला नाही? याचे कारण, त्याने त्या विषयाचा अनुभव दृढ केलेला नसतो; त्याच्या चंचल व बहिर्मुखतेमुळे गोंधळलेल्या मनाला नेमकी

१. पातळ पातळ २. ऐकलेल्या आवाजाला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्पष्टपणे ती गोष्ट निवडता आलेली नसते. आणि म्हणूनच तो कार्य घडल्यावर आपले सूक्ष्म विचार प्रगट करीत असतो. कोणतीही उच्च अवस्था प्राप्त होण्यासाठी मनुष्याला अभ्यासपूर्वक तिच्या संपूर्ण पायऱ्या चढून जाव्या लागतात; तेव्हाच तिचे यथार्थ[१] आकलन होते.

दृष्टांतविषयक समजुतीची छाननी

मला प्रश्न विचारणाऱ्या माझ्या मित्रांनी म्हटलेले आहे की- ''आपण 'विश्वशांतियोग' या आपल्या पुस्तकांतील एका लेखात दृष्टांताची व्याख्या 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' एवढीच केलेली आहे आणि कित्येक अन्य सद्ग्रंथांत तर असे लिहिले आहे की संतमहात्मे किंवा देवता सूक्ष्मरूपाने वास करितात आणि साधकांना प्रसंगी स्वप्नांत किंवा ध्यानावस्थेत ते मार्गदर्शनही करितात. परंतु आपले म्हणणे तसे कां दिसत नाही?'' या बाबत मी उलट असे विचारू इच्छितो की, सूक्ष्मरूपाने फिरणाऱ्या देवतांना पाहणारा किंवा त्यांचा आदेश ऐकणारा माणूस हा सूक्ष्मरूपच असावा लागतो की स्थूलशरीरी असला तरी चालेल? तो जडरूप किंवा बहिरंग अवस्थेचा असला तरी चालेल, असे जर कुणाचे म्हणणे असेल तर, साधारण अवस्थेत देखील प्रत्येक माणसांशी सामान्य लोकाप्रमाणे देवतांना व सूक्ष्म संतऋषींना भेटण्यास व बोलण्यास काहीच अडचण असू नये. पण तसा अनुभव येतो का? सूक्ष्मरूपांतील देवतांशी संभाषण करणारा पुरुष एकाच काली सूक्ष्म देवता व स्थूल मनुष्यसमाज यांना पाहू शकणे शक्य आहे काय? वास्तविक, जेव्हा तो सूक्ष्म सृष्टीत असेल तेव्हा तो बहिरंग होऊंच शकणार नाही; कारण वृत्तीची द्वारे अनेक असली तरी वृत्ती एकच असते व ती एका वेळी दोन वेगवेगळ्या सृष्टीत म्हणजे स्थितीत वावरू शकणार नाही. अर्थात् सूक्ष्म वृत्तीचा-अंतर्मुख-माणूसच त्या देवतांचा उपदेश ऐकण्यास पात्र आहे असे जर म्हणावयाचे तर, जो ज्या गावचा माणूस भेटणे म्हणजे 'दैवी दृष्टांत होणे' असे कसे म्हणता येईल? ती तर त्याचीच स्वतःची अवस्था झाली? असे जर आहे तर मग आपण मला असे कसे सुचविता की सूक्ष्म रूपाने देवता फिरत असतात आणि त्या कुणालाही दृष्टांत देतात. कुणाशीही बोलतात?

माझ्या मित्रांनो! तसे जर कदाचित् खरे मानले तर त्यांचे अचूक भाषण-भावी कार्याच्या रूपरेषेसंबंधी निश्चित मार्गदर्शन-ते आज कोणत्या माणसाजवळ करीत आहेत? आणि जर तसे करीत असतील तर प्रत्येकाचे प्रयोग आज असे कां फसले जातात? हिंदु, इस्लाम, खिस्ती इत्यादी सर्वांचेच धर्म ईश्वरप्रणीत समजले जात असूनही त्यांच्यात जसा भेद व विरोधाचा गोंधळ सुरु

---

१. सत्य, वास्तविक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आहे, तसे या विविध देवतांच्या अनेक दृष्टांतवाद्यामध्ये मतविरोधाचे विचित्र वारे[१] कां? याला देवताच कारण झालेल्या आहेत किंवा असा दुःखभोग अजून लोकांना मिळावा असाच त्यांचा मानस आहे, असे जर मानावयाचे तर, मग असून-नसून त्यांचा फायदा काय आणि त्यांना देवता तरी कां म्हणावयाचे? मग त्या सूक्ष्म असोत की प्रगट असोत अथवा मुळीच नसोत! असे नाही का वाटणार कुणाला?

दृष्टांताची शास्त्रीय मीमांसा

माझ्या विचाराने दृष्टांताचा अर्थ वेगळा आहे. आपल्या सूक्ष्म विचाराचा प्रतिध्वनी एकाग्र किंवा निर्विकल्प स्थितीत स्वप्नवत् प्रगट होणे; अथवा आपण ज्यावर आपली दृढ श्रद्धा ठेवतो त्याच्या अर्थात् त्या भावमूर्तीच्या द्वारे आपणास सूक्ष्मसृष्टीतील घडामोडीचा आभास आपल्या तादात्म्य पावलेल्या वृत्तिसामर्थ्यामुळेच प्राप्त होणे; यालाच माझ्या मते दृष्टांत म्हणतात. आणि कोणताही सुविचार जेव्हा आत्मेंद्रियांशी पूर्णपणे समरस होतो तेव्हा त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो- त्या सुविचाराचे लक्ष्य[२] यथार्थपणे हस्तगत होते-त्याला साक्षात्कार म्हणतात; मग तो ब्रह्मस्थितीचा असो, ध्येयमूर्तीचा असो, जपतपांनी होणारा असो की मंत्रतंत्रांनी होणारा असो! सर्व दृष्टातांना स्वतःचे भावच कारणीभूत झालेले दिसून येतात. भावना जसजशी दृढ व प्रगत होत जाते तसतशी ती सूक्ष्मेंद्रियांत प्रवेश करिते व त्या इंद्रियांतील सुप्त अशा अगत्य शक्तींना जागृत करिते आणि त्यामुळे त्या सूक्ष्मेंद्रियांना सूक्ष्म सृष्टींतील रचना दिसू लागून तशा भावना त्या महापुरुषाचा हृदयांत स्फूर्त होऊ लागतात. कृत्रिम संकल्पविकल्प मावळताच सूक्ष्म सृष्टीचे स्पंद-हालचालीच्या सूक्ष्म लहरी त्या निर्मळ मनात आपोआप स्फुरूलागतात व तशा तऱ्हेची जाणीव प्रगट होते. यापेक्षा मला तरी दृष्टांतात अधिक काही असावे असे वाटले नाही.

परंतु ज्यांना याहून दृष्टांतात निराळा असा अनुभव आला असेल त्यांना एक तर त्या चित्रपटामागील तत्व जाणून घेण्याचे कौशल्य नसेल किंवा शास्त्राच्या रूढ परिभाषेची गौरवात्मकता कायम ठेवावयाची असेल; अथवा लोक त्याशिवाय देवाकडे किंवा उपासनामार्गाकडे धाव घेणार नाहीत असे भय तरी वाटत असेल, म्हणूनच ते दृष्टांताच्या थोरवीचा मार्ग कायम ठेवीत असावेत. परंतु या नसत्या थोरवीमुळे देवदेवतांच्या व त्यांनी दृष्टांत दिल्याच्या नावावर आतापर्यंत अनेकांनी आपल्या मनास मानेल तसे पंथ चालविले, अनेकांना लुबाडले आणि देवांच्या नांवावर भक्तांमध्ये न मिटणारे तंटे वाढवून ठेवले हे विसरून चालणार नाही.

१. वेगवेगळे विचार प्रवाह २. ध्येय

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दृष्टांतांच्या नांवावर सामान्य जनतेत माजलेला गोंधळ पाहूनच अखेर संतांना म्हणावे लागले की-''तोचि लुच्चामाजी भला। म्हणे देव मी देखिला ॥''

आतला आवाज व प्रार्थनेचे सामर्थ्य

पूज्य महात्मा गांधी ज्याला 'आतला आवाज' म्हणत त्याचा अर्थ शुद्ध अंतःकरणात उमटलेले सूक्ष्म सृष्टीचे प्रतिबिंब निर्विकार[१] व प्रशांत हृदयांत पडलेले विशाल हिरण्यागर्भातील ठोके असाच होतो. दृष्टांताचे देखील हेच सरळ सोपे स्वरूप आहे. प्रार्थनेच्या किंवा ध्यानाच्या योगाने वृत्ती बाह्य जगातून मोकळी करून व कृत्रिम संकल्पविकल्पांचे पडदे दूर सारून स्थिर करून ठेवली, म्हणजे तिचा संबंध जगांत व्यापक असलेल्या महान सामर्थ्यशाली तत्वाशी जोडला जातो. ज्या तत्वांतून ही दिसणारी सृष्टी जन्मास आली त्या तत्वांत अजूनही अनंत सृष्ट्या तयार करण्याचे सामर्थ्य आहे व तेच सामर्थ्य आपल्या स्थिर वृत्तीत त्या वेळी संचरू लागते. घागर रिकामी करून जर आपण भरलेल्या सागराच्या आत स्थिराविली तर सभोवतालचे पाणी तिच्यात वेगाने प्रवेश करू लागते, तशीच स्थिती स्थिरावलेल्या वृत्तीची देखील होते. अशा तन्मयतेच्या सामर्थ्याने संशोधक नवे शोध लावतात, महापुरुष नवे आदेश देतात, बाबरासारखे नव्या जोमाने लढून विजय मिळवितात, छत्रपति शिवाजीसारखे पुरुष भवितव्याचा अचूक संकेत प्राप्त करून घेतात आणि सामान्य जीव आपल्या दुःखसंकटांवर विजय मिळवून प्रगत होत जातात. पण हे दृष्टांताचे सामर्थ्य देवता जगांत भ्रमण करून लोकांना देतात हे म्हणणे मात्र मला मानवत नाही. त्यांतील तत्व मला मान्य आहे आणि ते हेच आहे की, जो ज्या देवदेवतेवर निष्ठा ठेवतो त्या निष्ठायुक्त भावनेमुळे तो त्या देवदेवतेच्या नावाने आपल्या वृत्तीचा प्रवाह सूक्ष्म तत्वसागराशी जोडून टाकतो- आपल्या वृत्तीचे कनेक्शन विश्वव्यापक अशा चैतन्यमय विद्युत्केंद्राशी निगडित करून टाकतो- आणि प्रतिध्वनि रूपाने त्यांतील सामर्थ्य त्याच्या हृदयात संचरू लागते.

सर्व देवतांचा ध्वनी आत्मदेव देतो !

त्याच्या अधिकाराचेच ते फळ असते; पण जेव्हा तो असा अधिकारी होतो तेव्हा त्याला आपल्या अधिकाराची जाणीव नसते, त्यामुळे तो देवतांच्या संकल्पित मूर्तीवर तसा आरोप करतो. वास्तविक तो त्यावेळी प्रत्यक्ष असतो आणि देवता अप्रत्यक्ष ! ज्यावेळी तो सृष्टिमधील ध्वनी ग्रहण करण्यास अधिकारी

---

१. विकाररहित, निर्मळ

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

झालेला नसतो त्यावेळी देवता त्याला दृष्टांत थोड्याच देऊ शकतात? याचा अर्थ हाच की तसे दृष्टांत करून घेण्याला तोच पात्र किंवा समर्थ झालेला नसतो. मग दृष्टांताचा सरळ अर्थ काय? हाच ना की-'मनी वसे ते स्वप्नी दिसे'? कोणत्याही देवाच्यां उपासनेचे निमित्त करून आपले मन तादात्म्य पावो, परंतु एकाच ईश्वरतत्वाकडून त्याचे प्रत्युत्तर मिळते आणि ते ईश्वरतत्व ''ईश्वरःसर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति''[१] या प्रमाणे आपल्या हृदयीच असते. त्याला अनुलक्षूनच भगवान श्रीकृष्णाने म्हटले आहे की-

''श्रद्धेने ज्या स्वरूपास जे भजूं इच्छिती जसे।
त्यांची तीचि तशी श्रद्धा स्थिर मी करितो स्वयें॥
मग मागितले भोग पावती मीचि निर्मिले !!''

(श्रीगुरुदेव, जुलै १९५० पृ. क्र. २-५)

संदेश-

ज्ञानदिपावली

माझ्या मित्रांनो !

पक्षोपपक्षांच्या भावनेत न वाहता निरपेक्ष देशसेवक होऊन भारतवर्षात आज आपण घराघरातून ज्ञानदीप उजळून स्वातंत्र्यलक्ष्मीचे खरे पूजन केले पाहिजे.

आजच्या सुमुहूर्तावर, मिळविलेले स्वातंत्र्य टिकविण्याचे व्रत आपण हजारोंनी मिळून घेतले पाहिजे व तशी परमेश्वराला प्रार्थना केली पाहिजे.

पूज्य महात्मा गांधीजींना स्मरून आज आपण, स्वराज्यानंतर सुराज्याचे कार्य काय आहे ते अंतःकरणपूर्वक समजून घेतले पाहिजे.

तो परमकृपाळू ईश्वर आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्य रक्षणाकरिता आपणा सर्वांना बलवान व ज्ञानवान करो, हीच आजच्या शुभदिनी माझी प्रार्थना आहे.

- तुकड्यादास

१. भगवद्गीता अ. १८ श्लोक ६१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

८. अधिकारांचा दुरुपयोग करू नका !

(मालक आणि मजूर यावरच अर्थव्यवस्था उभी आहे. मालक कमी खर्चात अधिक कमाई करू इच्छित असल्यामुळे मजूरावर अर्धपोटी राहण्याची पाळी येते. मग मजूर प्रामाणिकपणे काम न करता कामचुकारपणा करतो त्यामुळे दोघांचे, पर्यायाने देशाचे नुकसान होते. याबाबतची वास्तविकता दर्शवून वं. महाराज अधिकारांचा दुरुपयोग करू नका असा आग्रहाने हितोपदेश करतात- -संपादक)

मजुरांची मनोवृत्ती

मनुष्याच्या मनात एकदा का एखाद्या गोष्टीने शिरकाव केला की मग तो त्या गोष्टीकरिता वेडा होतो आणि त्याला अनुरुप असेच आपले अंगप्रत्यंग बनवीत जातो. हा नियम गरीब-श्रीमंत, सत्ताधीश-सेवक वगैरे सर्वांना सारखाच लागू आहे. आपण हे ऐकत व पाहत आलो आहोत की काहीही काम न करता, कष्ट न घेता, युक्तीने वा सक्तीने अज्ञ समाजाची शक्ती कवडीमोलाने विकत घेऊन त्यावर चैनीने जगण्याची प्रवृत्ती ज़्यावेळी श्रीमंत समाजात शिरली, त्यावेळी त्या अनुचित[१] वर्तनाचा इतका अतिरेक होत गेला की आज समाजात भयंकर विषमता वाढून परिश्रम करणाऱ्यांना जगणे देखील मुष्किल होऊन गेले आहे. आणि नशीब व देवाची अवकृपा घोकणाऱ्या भाबड्या समाजाला व विषमतेचे खरे रहस्य ज्या दिवशी कळून येऊ लागले त्या दिवसापासून त्यांच्या मनांत या ऐतखाऊ समाजासंबंधी अशी तेढ वाढायला लागली की जिचा परिणाम आता पदोपदी जाणवू लागलेला आहे.

मी खेड्यांतील व शहरांतील पुष्कळ कामगारांना बघतो, मग त्यांच्या मनात आजकाल ही गोष्ट प्रामुख्याने शिरलेली दिसते की, ज्यांच्या जवळ म्हणून पैसा आहे त्यांच्या जवळ तो हरामानेच आलेला आहे- हरामाशिवाय कुठेही पैसा असणेच शक्य नाही; मग त्यांचा पैसा आपण तरी इमानाने काम करून कां घ्यावा? आपणही तो हरामानेच का घेऊं नये? या दृढ समजाचा त्यांच्या कामावर देखील परिणाम झालेला दिसतो. मजूर घरून निघतो केव्हा, कामावर पोहोचतो कधी व तेथे थांबतो किती हे जरी घड्याळाचे काटे अगदी तंतोतंत दर्शवीत असले व त्यांत चूक नसली, तरी काम करतांना त्यांत गति,[२] उत्साह, जीवभाव मात्र दिसून येत नाही. ते आळशी आहेत, मुत्सद्दी आहेत, कामचुकार आहेत कीं

---

१. वाईट २. वेग

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बीमार आहेत, याची बारकाईने पाहाणी करतांना मला आश्चर्य वाटू लागते. अर्थात् शरीराला जर असाच स्वभाव पडत गेला तर त्यांच्या अंगची कामाची तडफ व धमक अल्पावकाशांत[1] त्यांना कायमची सोडून गेलीच म्हणून समजा.

मुनीम, मुखत्यार व मालक

इकडे काम घेणारांची मधल्या मुनिमांची देखील वृत्ती त्याच प्रकारची बनलेली असल्यामुळे तिला कोणताही ताळमेळ नसतो. फक्त मालकांच्या डोळ्यासमोर 'देखावा' दाखविला की झाले ! वरिष्ठांशी शब्दांत गोड बोलले व हांजी-हांजी करून त्यांची मर्जी संपादन केली की आटोपले ! मग अन्य वेळी मजूर व मुनीम हे दोघेही आपली गट्टी[2] जमवितात आणि 'तेच मजूर व तेच काम पाहणारे' असे स्वरूप त्यास, पाप्त होऊन, ती एक पैसा लुबाडणारी टोळीच बनून जाते किंवा असेही होते की मुनीम आपणाला 'कमिशन' देणाऱ्या मजुरांनाच हाताशी घेतात आणि अशा रीतीने त्यांच्या घासांतला घास काढून गब्बर बनत जातात. त्यांचे संबंध एवढे चांगले असतात की मालकांना मजूरांचे व मजूरांना मालकांचे दर्शन घडण्याचा प्रसंगच बहुधा येत नाही. ''मी सर्व काही पाहून घेतो'' म्हणून तो दिवाणजीच इकडे आपले राज्य स्थापन करून सावळागोंधळ चालू ठेवतो.

या सर्व घडामोडीत मालक फक्त एवढेच पाहात असतो की माझे पैसे कमी कसे खर्च होतील आणि त्याहून मुख्य म्हणजे माझी दगदग कमी होऊन माझ्या चैनीपुरते पैसे आरामशीरपणे मला कसे मिळतील. मालक उत्साही व दक्ष असला तर तो मुनीमांवर विसंबून राहणार नाही; परंतु मजुरांच्या जीवनाचा मात्र तिळमात्रही विचार करण्याचे त्याला काही कारण वाटत नसते. त्याला आपला पैसाच काय तो दिसतो. त्या पैशाच्या पाठीमागे मजुरांच्या घरी फाके[3] पडत असले तरी त्याचेशी आपला काय संबंध, असे रोख तत्वज्ञान तो खुशाल बडबडत असतो. आपल्या आयुष्याचा अमोल वेळ मनसोक्त चैनीत घालविण्याऐवजी 'भिकारड्या' समाजाच्या जीवनाची चिंता वाहण्यांत खर्च करणे त्याला मुळीच आवडत नसते व परवडतही नसते.

राष्ट्राच्या विनाशाचे महाकारण

शेतीवाडीच्या कामापासून तो मोठमोठ्या कारखान्यांच्या किंबहुना सरकारी कारभारांतील योजनांच्या कामापर्यंत सर्व ठिकाणी हाच प्रकार आज सर्रास दिसून येतो. जिथे तिथे स्वार्थाचे वेड संचरून सर्वांच्या वागणुकीला व

---

१. थोड्याच अवधीत २. स्वार्थीमैत्री ३. उपास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मनोवृत्तीला आज अशा अभद्र[१] ग्रहांनी झपाटले असल्याचे पावलोपावली निदर्शनास येते. अर्थात् मालक, मुनीम व मजूर यांच्या या मनोवृत्तीमुळे व बिघडलेल्या परस्पर संबंधामुळे कामांची योजना अपुरी ठरते व विकृत बनते आणि त्याचा परिणाम राष्ट्राच्या दृष्टीने महत्वाच्या ठरणाऱ्या मोठमोठ्या योजनांवर होऊन राष्ट्रीय संपत्तीचा भयंकर ऱ्हास व नाश होतो. अगदी साधे उदाहरण म्हणून आपण शेतीचाच प्रश्न घेऊ.

शेतीच्या बाबतीत मालक, मुनीम व मजूर यांचेकडून जर असाच प्रकार होत असला तर, शेतीचे उत्पन्न साहजिकच कमी होणार आणि त्यामुळे जेवढे लोक त्या शेतीवर जगवावयाचे ते जगवले जाणार नाहीत. अर्थात् त्यासाठी परदेशांतून धान्य बोलावण्याचा प्रसंग येऊन देशाचा खजिना रिकामा करावा लागणार, ''अधिक धान्य पिकवा'' या सारख्या मोहिमा काढून त्या मोहिमांसाठीच भरमसाट खर्च करावा लागणार, गायींची आधीच कमी असलेली कुरणे[२] काढून त्यांची शेते बनवावी लागणार व ती पैसा आणि शिफारस पाहून पुन्हा त्याच चैनी लोकांकडून द्यावी लागणार, जंगले अशा रीतीने कमी होऊ लागून पावसांवर त्याचा वाईट परिणाम होऊ नये म्हणून 'जंगले वाढविण्याची' खर्चिक मोहीम उभारावी लागणार आणि ओळखीच्या लोकांच्या 'तकावी'[३] वाटावी लागणार, कुरणाभावी व खडगुतीच्या उणीवेमुळे गायी कसाबाघरी जाणार आणि गायी-बैल कमी होत असलेले पाहून शेतीसाठी परदेशी यंत्रे बोलवावी लागणार !

या साऱ्या उलटसुलट धडपडीत मंत्रिमालकांना व त्यांच्या सर्व काम करणाऱ्यांना भरमसाट खर्च करावा लागणार आणि अशा रीतीने सरकारी खजिना संपुष्टांत आलेला पाहून, ती उणीव कशीतरी भरून काढावी म्हणून सरकार अनेक प्रकारच्या करांच्या व महागाईच्या रुपाने मरतुकड्या शेतकरी-मजूरांनाच निरुपायाने पिळून काढणार? नि धान्य पाहून त्यावर नियंत्रण बसवून धान्याची अपुरी वाटप पद्धती सरकारला सुरु करावी लागणार, बाजारात कमी भावाने द्यावे लागते म्हणून व्यापारी आडून भरमसाट भाव घेऊन गरीबांना वस्तु पुरविणार आणि कुडवाची खंडी बनविणाच्या इर्षेने त्या मालांत वाटेल तो खराब माल मिळविणार ! अन्नाप्रमाणेच वस्त्रे आणि अन्य सर्वच जीवनोपयोगी वस्तू दुर्मिळ व महाग होऊन त्यांत अखेर गरीब किसान-मजुरांचेच भूकबळी पडणार ! निकस व अपुरे अन्न मिळाल्याने प्रजा सारखी दुबळी, रोगी व भिकारी-बेकार बनत जाणार आणि ह्या पोटांतील अग्नीच्या ज्वाला पेट घेत कदाचित् अराजकतेकडे धाव घेऊन राष्ट्रात अनर्थ उत्पन्न करणार ! या एवढ्या मोठ्या राष्ट्रविनाशाचे मूळ

---

१. अतिवाईट   २. गायरान   ३. कर्जाचा एक प्रकार

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पाहू गेल्यास ते मालक-मुनिमांच्या अधिकारांच्या दुरुपयोगांत व त्यामुळे निर्माण झालेल्या कामगारांच्या चुकार मनोवृत्तीतच सापडणार नाही का?

जिथे तिथे अधिकारांचा दुरुपयोग !

ही मनोवृत्ती तरी कशी निर्माण होते? मालक म्हणतो, मी न सांगता नोकराने आयते काम करुन द्यावे; नोकर म्हणतो, मी घरी बसला असलो तरी मजुरांनी बरोबर काम करावे आणि मजूर म्हणतो, या ऐतखाऊ माजरू लोकांचे काम मन लावून करण्याची मला काय गरज? कारण, यांचा पैसा हरामाचा आहे; नियत[१] फुकटांत चैन भोगण्याची आहे. राष्ट्राची शेती सांभाळणाऱ्या मोठमोठ्या कारभाऱ्यांना व अधिकाऱ्यांना पैसा, चैन आणि आपले जीवन इतके 'प्यारे' झाले आहे की त्यापुढे त्यांना खरोखरचे नेटाचे काम ही वस्तु 'शत्रु' झालेली आहे. स्वतः न झटता व दुसऱ्याला न शिकविता पैसे उधळून कुणाकडून तरी काम करून घेण्याच्या प्रवृत्तीमुळे राष्ट्राचे जीवन 'बारभाईकी खेती आणि तिनका न लागे हाती' असे बनत जाणे साहजिक आहे. एकीकडे सक्तीने उपाशीपोटी काम करुनही लोकांना दोन पैसे मिळू नयेत आणि दुसरीकडे केवळ बेजबाबदार हेळसांडीमुळे लाखो रुपये 'चुकणाऱ्या योजना' पायी बरबाद[२] केले जावेत, अशा अव्यवस्थितपणाचे लोण वरून[३] खाली येत येत ते विषासारखे सर्वांच्या अंगी भिनले तर त्यास जबाबदार कोण?

सत्यशोधनाच्या दृष्टीने या बाबत मजुरांना जेव्हा त्यांच्या चुकारपणाचा जबाब विचारावा, तेव्हा ते म्हणतात- 'दिवाणजीच आम्हांला बरोबर समजावून देत नाहीत' व दिवाणजी म्हणतो-'मला त्याची कल्पना मालकांनीच समजावून दिलेली नाहीं.' शेरे पाहावे तर आपल्या मर्जीतले लोक सोडून बाकी प्रत्येकाच्याच रिपोर्टावर खालपासून वरपर्यंत वाईट पडलेले दिसून येतात आणि प्रवृत्ती पाहावी तर प्रत्येकाचीच दुसऱ्याला दोष देऊन मोकळे होण्याची असते. चूक दुरुस्त करुन व स्वतः समजावून देऊन काळजीने काम करवून घ्यावे व मग त्यावर आपले विचार लिहावेत, ही प्रथा बहुधा कोठेच आढळत नाही. कसे तरी आपले लोक भराभर योजावेत, त्यांना चैन करता येईल व चरता येईल अशी कामे द्यावी आणि सर्वांनी मिळून आपला 'लुबाडू गट' मजबूत करून ठेवावा, हा जणु आजकालचा धर्म झाला आहे ! अर्थात् यामुळे भयंकर घोटाळे माजून राष्ट्राचा नाश होणार हे उघड आहे. पण अशा गटबाजी वाढविणाऱ्या स्वार्थशूर मुनीमांना लोकांनी तरी कां नेमावे, कां निवडावे आणि मग कुरकुरत कां बसावे? आपल्या अधिकारांचा

---

१. नीति २. अपव्यय ३. ज्येष्ठ लोकांकडून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

योग्य उपयोग करून योग्य लोकांनाच का नेमू नये? आणि कुणालाही नेमले तरी त्यांचे कडून योग्य काम जागरुकपणे कां करुन घेऊ नये? तसे जर झाले तर मग मालकावर भिकारी होण्याची पाळी तरी कशाला येईल? आपण जर न्यायनीतीने व कर्तव्यदक्षतेने आपली मालकी चालवू तर दिवाणजींना घोटाळा माजविता येणार नाही; नोकरात गटबाजी व खाऊपणा वाढणार नाही आणि गरीब मजूरांवर अन्याय होणार नाहीत. प्रत्येक जण अशा रीतीने जर आपापल्या कामात दक्ष राहिला तर सारे राष्ट्र आनंदाने नांदू लागेल.

हे राष्ट्रसेवक की राष्ट्रघातकी ?

वरील विवेचनातून, अधिकारांचा दुरुपयोग केल्याने काही व्यक्तींना कसे नुकसान सोसावे लागते किंवा परस्परासंबंधी त्यांच्या भावना कशा कडू रूप धारण करतात एवढेच मला सांगावयाचे नव्हते तर साऱ्या राष्ट्राच्या जीवनावर त्यांचा कसा दुष्परिणाम होतो हे गणिती पद्धतीने मला दाखववयाचे होते. एका शेतात, एका गावांत, एका कारखान्यात किंवा एका योजनेत अथवा मोहिमेत चुकारपणा अथवा हेळसांड झाल्याने एका ठिकाणीच धनधान्याची तूट व द्रव्याची हानी होणार असली तरी, ती उणीव भरून काढण्यासाठी साऱ्या गावांना-सर्व राष्ट्रालाच झटावे लागणार किंवा झीज सोसावी लागणार हे उघड आहे. आधीच हिंदुस्थानच्या दृष्टीने येथील धनधान्य अपुरे आहे असे म्हटले जाते; अशा स्थितीत हेळसांडीच्या[1] वा चैनीच्या मनोवृत्तीने जर कोणी या राष्ट्रीय संपत्तीला धक्का दिला तर तो आणि त्याला तशी संधी देणारा किंवा प्रवृत्त करणारा प्रत्येक थोर मनुष्य हा महान देशद्रोहीच समजावा लागणार नाही का? आणि अशी एखाद्या ठिकाणची स्थिती क्षणभर क्षम्यही समजता येईल, पण जिथे तिथे हाच प्रकार दिसला तर मग मनुष्यच मनुष्याचा शत्रु बनेल व देशाचा नाश आपोआप होईल, हे कोणी सांगायला थोडेच हवे?

इमानदारी कोणाजवळच नाही, मग ती आपण तरी कां ठेवावी व या जगाच्या उलट्या हवेत इमानदारीचे बक्षिस म्हणून उपासमारीने कां मरावे, हा प्रश्न आज सर्वांच्याच डोक्यांत थैमान घालू लागलेला दिसतो. प्रत्येक जण मिळालेल्या संधीचा, सवलतीचा व सत्तेचा उपयोग याच दिशेने करू लागला तर या स्वतंत्र झालेल्या देशाचे अखेर काय होणार? या प्रश्नाने खऱ्या विचारी व दूरदर्शी[2] लोकांना आज बेचैन करून सोडले आहे, हेही आपणास दिसून येते. आणि ही गोष्ट अगदी खरीच आहे की जर प्रत्येकाच्या डोक्यात असे बेइमानीचे भूत घुसले

---

१. उपेक्षेच्या २. दूरदृष्टी असलेल्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तर या देशाचे कसे होणार? त्यातील प्रत्येक गावाचे कसे होणार अर्थात् प्रत्येक व्यक्तीचे म्हणजे पर्यायाने आपले स्वतःचे कसे होणार? याचा विचार जर आज प्रत्येकाने न केला तर ही भारताची नौका भयंकर वादळांत सापडून कुणीकडे जाऊन पडेल याचा नेम नाही ! अर्थात् त्यात आपापले खिसे भरू लागलेल्या प्रत्येक लहानथोरांचाच सर्वनाश होणार, याचा विचार जनतेने, सरकारने व पुढाऱ्यांनी करावयास नको का?

समाज पार बदलून टाका !

स्वातंत्र्य मिळाल्याबद्दल नुसता उत्सव केल्याने काही लाभ होणार नाही; ते स्वातंत्र्य टिकवून सर्वांना त्याचा उपभोग घेता येईल, अशा प्रकारची पात्रता सर्वांत आणणे हाच आज सर्वांहून महत्वाचा टप्पा आपणा सर्वांस गाठावयाचा आहे व तेव्हाच हे स्वातंत्र्य 'खरे स्वातंत्र्य' ठरणार आहे. परंतु ही गोष्ट आज किती जाणते लोक[१] लोकांना जाणवून देतात व स्वतःत्या दिशेने पावले टाकतात? आजचे भारताचे चित्र पाहता खेदाने असेच म्हणावे लागते की बहुधा प्रत्येकजण अज्ञानामुळे किंवा स्वार्थांधपणामुळे आज आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करू लागला आहे आणि त्याच्या सर्व लहान-मोठ्या कृतीचा परिणाम साऱ्या राष्ट्राला म्हणजेच राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला या-ना-त्या स्वरूपात भोगावा लागत आहे. थोरांच्या राष्ट्रघातकी वागणुकीचे व चुकारपणा नि चैनीवृत्तीचेच लोण अगदी खालच्या कामकरी थरापर्यंत पोहोचून सारे राष्ट्र आज आतून अतिशय विकृत बनले आहे आणि याचा परिणाम अखेर कोणत्या थरावर जाईल हे विचारी माणसांच्या मनांत येताच त्यांच्या अंगावर कांटे उभे राहात आहेत.

हा सर्व प्रकार बंद होऊन पुढची सर्व अनर्थपरंपरा टळावी असे वाटत असेल तर, आज सर्वांनी आपला व्यक्तिगत किंवा गटाचा स्वार्थ बाजूस सारून राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आपले पाऊल टाकले पाहिजे;आपल्या हातातील सत्तेचा, अधिकारांचा व कामांचा उपयोग राष्ट्रदेवाच्या सेवेच्या दृष्टीने प्रामाणिकपणे केला पाहिजे. प्रत्येकाला हे पक्के पटवून देण्यात आले पाहिजे की ही सत्ता, हा सबंध[२] पैसा, हे पुत्र आणि तुम्ही-आम्ही सर्व देशाचे आहोत. श्रीमंत ही राष्ट्राची बँक आहे आणि सत्ताधीश हे राष्ट्राचे व्यवस्थापन-सेवक आहेत. राष्ट्राचे आपापल्या कुवतीप्रमाणे काम करून जीवनाच्या आवश्यकतेप्रमाणे उपजीविकेसाठी वेतन घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राष्ट्राच्या रक्षकांना सुद्धा परिश्रमाशिवाय पैसा मिळता कामा नये. श्रीमंतांना सुद्धा काम करूनच पोट

---

१. पुढारी लोक २. सर्व

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भरता आले पाहिजे. मजूर, मुनीम, मुखत्यार व मालक या सर्वांना इमाने-इतबारे काम करूनच योग्य वेतन घेता आले पाहिजे. अधिकार पैशासाठी, चैनीसाठी किंवा गटबाजी व वशीलेबाजीसाठी अथवा गरीबांना दाबून व पिळून काढण्यासाठी नसून, तर तो सेवाकार्यासाठी आहे. थोरांनी मजुरांची इज्जत सांभाळली पाहिजे व मजुरांनी राष्ट्राची इभ्रत सांभाळली पाहिजे.

सर्वच मजूर व सर्वच हुजूर !

थोडक्यात म्हणजे आम्ही सर्वच राष्ट्राचे मजूर व सर्वच हुजूर[१] झालो पाहिजे. असे झाले म्हणजेच आजच्या विकृत भारतात खरे चैतन्य, खरे स्वातंत्र्यसुख नांदू लागेल आणि घराघरांतून आनंदाच्या गुढ्या उभारल्या जातील, हे सर्व घडवून आणणे राष्ट्राच्या सत्ताधिकाऱ्यांच्या तसेच नेत्यांच्या हातात आहे, हे जरी खरे असले तरी, ते जागरुक नसल्यास त्यांना तशी आठवण करून देऊन व तशाच जागरुक लोकांना पुढे आणून तसे करायला लावणे हा अधिकार[२] जनतेचा आहे. प्रत्येक जाणत्या व्यक्तीचा आहे. लहानात लहान अशा खेड्यांतल्या सामान्य मजुराच्या हातात देखील राष्ट्राचे भवितव्य घडविण्याची शक्ती आहे, ही गोष्ट ध्यानात घेऊन आज प्रत्येकाने इमाने इतबारे आपले काम जीव लावून केले पाहिजे. असे होईल तेव्हाच आमचे स्वातंत्र्य घराघरात पोहोचून सर्व जगांत आपला यशोध्वज फडकवील. ईश्वर सर्वांना आपल्या हक्क व कर्तव्याची जाणीव देऊन आपल्या अधिकारांचा सदुपयोग करण्याची व राष्ट्राची आदर्श मूर्ती घडविण्याची बुद्धी व शक्ती देवो, हीच माझी त्याचे चरणी प्रार्थना आहे !

(श्रीगुरुदेव, ऑगस्ट १९५० पृ. क्र. ४-७) ✤ ✤ ✤

– सुविचार –

✤ आपल्या शरीराने दुरुस्त राहणे म्हणजे अवाढव्य शरीर वाढवून आळशी माणसासारखे सदा पडून राहणे नव्हे, तर काम करण्याची सदैव तत्परता असणे, त्याला लागणारी ताकद अंगात असणे, सदा निरोगी असणे, आपले आहारविहार आपल्याला पाचक शक्तीनुसार भोगता येणे आणि आपली सर्व इंद्रिये सत्कार्याकरिता सुसज्ज असणे यालाच तन्दुरुस्त मनुष्य म्हणावे लागेल.

✤ जी वस्तू पथ्याने अमृत होते तीच वस्तू कुपथ्याने जहराप्रमाणे होत असते. – तुकड्यादास

---

१. मालक २. कर्तव्य

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

९. हे आसुरी बलिदान केव्हा थांबविणार?

(आपल्या देशात देवी-देवतांपुढे बळी देण्याची प्रथा अतिप्राचीन काळापासून रुढ झालेली आहे आणि अजूनही या विज्ञानयुगातही सुरुच आहे. वं. महाराजांना याचे फार दुःख होई. ते परोपरीने लोकांना हे आसुरी बलिदान थांबविण्यासाठी सांगत. प्रस्तुत लेखात त्यांनी अखिल विश्वातील मानवाला इशारा दिला आहे की जे आसुरीवृत्तीने प्राण्यांना बळी देतील त्यांना त्याचे प्रायश्चित भोगावेच लागेल. - संपादक)

''याद ठेवा कधी बळी द्याल जीवां। वंशामध्ये दिवा न राहील!!''

प्रिय मित्रांनो ! आपल्या भारतदेशांत देवी-देवतापुढे प्राण्यांना 'बळी' देण्याची प्रथा तांत्रिक व मांत्रिक युगाने लावली आहे. मनुष्यसमाज ज्या वेळी जंगलाचा आश्रय करून शिकारीवरच प्रामुख्याने जगत होता त्यावेळी निसर्गाच्या शक्तींना देवता मानून त्यांच्यापुढे आधी आपल्या शिकारीचा थोडा तरी भाग अर्पण करण्याचा प्रघात त्यांच्यात सुरु झाला. तेव्हाच अत्यंत रानटी लोकांत मनुष्य बळी देण्याची सुद्धा चाल पडलेली होती दुसऱ्याचे प्राण याप्रमाणे देवतांना अर्पण करण्याचा प्रघात त्यांच्यात सुरु झाला. तेव्हाच अत्यंत रानटी लोकांत मनुष्य बळी देण्याची सुद्धा चाल पडलेली होती. दुसऱ्याचे प्राण याप्रमाणे देवतांना अपर्ण केले. म्हणजे त्या देवता संतुष्ट होऊन मग बाकीच्या समाजाला हात लावीत नाहीत किंबहुना सर्व सुखे देतात, अशी समजूत त्यांच्यात दृढ झालेली होती.

प्राण्यांऐवजी फळ देण्याची प्रथा

मनुष्यसमाजाला ज्यावेळी स्थिर स्वरूप आले; जनावरे पाळून व शेती वगैरे करून सर्वांसह स्वतःला सुखी करण्याची संस्कृती जेव्हा त्यांच्यात रुजली; तेव्हापासून त्यांच्या उपासनेला[१] व आहारविहाराला सुद्धा सात्त्विक वळण प्राप्त झाले. परंतु पूर्वीच्या संवयी एकदम समाजातून नाहीशा होत नसतात, म्हणून त्यांच्या मांसाहाराला आणि बलिदानाच्या प्रथेला क्रमाने आटोक्यात आणण्यासाठी, यज्ञादिकांची कठोर खर्चिक बंधने त्यांच्यावर लादण्यांत आली आणि पुढे पुढे तर मेंढा, रेडा व कोंबडा याऐवजी उडीद, जव, कोहोळा यांचे प्राणी बनवून त्यांचे बलिदान करण्याचा निर्णय महात्म्यांनी दिला. मनुष्याचे डोके, हात इत्यादी ऐवजी महाफळ अर्थात् नारळ व केळी वगैरे देण्याचा प्रघात थोरांनी सुरु केला. इतकेच

१. पूजापातीला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नव्हे तर ''अज्ञानी जीव हाच पशु आहे. हा जीवभाव बळी दिल्याशिवाय-देवाला अर्पण केल्याशिवाय उद्धार होणार नाही'' हे मुख्य भक्तिसूत्र लोकांसमोर मांडून संतमहर्षींनी ते तत्वच आपल्या जीवनांत प्रत्यक्ष उतरुन दाखविले. संत चोखामेळा, महात्मा कबीर इत्यादी महापुरुषांनी कधी पशु बळी दिल्याचे कुणी ऐकले आहे काय?

मनुष्याची बुद्धी याप्रमाणे जेव्हापासून रानटी जीवन मागे सारून नागरिक जीवनाकडे वळली व अंध भावनेचा आश्रय सोडून अध्यात्मप्रवण बनत गेली. तेव्हापासून हा बळी देण्याचा विषय कमी होत गेला. पण ज्यांना त्या मागील रुढ्यांची गोडी लागली होती, ज्यांच्या डोक्यांत दुसऱ्यांचे प्राण देऊन स्वतः सुखी होण्याचा भ्रम पक्का रुजला होता व इंद्रिये त्याच वागणुकीशी संलग्न झाली[१] होती, त्यांचा तो विषय मात्र सुटला नाही-आजपर्यंत सुद्धा सुटू शकला नाही. मधल्या काळांत देविदेवता, काली-कालभैरव वगैरेंच्या तांत्रिक उपासनांना ज्यावेळी विशेष जोर चढला त्यावेळी तर ही अनिष्ट रूढी गावोगावी अधिकच पसरली आणि ती आजपर्यंत चालू आहे.

बलिदानाचा हा अमानुष प्रकार याप्रमाणे रानटी भक्तीचा उरलेला अंश असला तरी, तो अनेक उद्देशांनी समाजात या सुधारलेल्या काळात देखील चालूच आहे ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. अनेक संतमहात्म्यांनी व समाजनेत्यांनी आजपर्यंत जोरदार प्रयत्न केले, परंतु हा प्रकार अजून पूर्णपणे बंद झाला नाही. जिभलीचे भक्त पोटाकरिता, अंधश्रद्धावान् लोक फलप्राप्तीकरिता, घरंदाज म्हणविणारे लोक मानाकरिता नि सांप्रदायिक प्रचारक अर्थात् 'बुवा' 'भगत' व 'जाणते' हे आपल्या उपजीविकेकरिता या अनिष्ट परंपरेला सतत चालवीत आले आहेत. राष्ट्राचा सत्यानाश होत आला तरी ते आपला पवित्रा[२] बदलायला तयार नाहीत.

राक्षसी मार्ग बंद करा

मित्रांनो ! या सर्व लोकांत घुसुन आज त्यांना हे पटवून द्यायला पाहिजे की काळ फार बदलला आहे. या सर्व अनिष्ट व अमानुष रूढ्यांचा पुरा पाठलाग करून त्यांची 'मार्बत' देशाबाहेर हाकून लावणे आता अत्यंत जरूरीचे आहे. समाजाचे शुद्धीकरण झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळूनही काही सुख लाभणार नाही. देवी-देवतांच्या उपासनेचे हे राक्षसी मार्ग आता ताबडतोब बंद झाले पाहिजेत. कालचक्राप्रमाणे व बुद्धिविकासाप्रमाणे मनुष्य, त्यांचे साहित्य व साधन बदललेच

---

१. जोडली गेली २. पाऊल, प्रवाह

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पाहिजे; ही वृत्ती ज्या राष्ट्रात जिवंत राहील तेच राष्ट्र अखंडत्वाने चमकत असते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

आपण म्हणाल की-" बाकीच्या राष्ट्रात लोक मांसाहार करितात, तरी त्यांचे राष्ट्र कां सुखसंपन्न आहे?" यावर मी म्हणेन, मांसाहार करावा की नाही हा विषय स्वतंत्र आहे, तो प्रस्तुत लेखात घेण्याचे कारण नाही. धर्माच्या व देवीदेवतांच्या नावांवर निरपराध जीवांचे बळी देता कामा नये. एवढेच मला येथे सुचवावयाचे आहे. प्राण्यांचे मास भक्षण करता करताच त्यातून पशुतुल्य जडत्व[1] मेंदूत घुसून आज मनुष्य मनुष्याच्याच नरडीचा घोट घेऊं लागला आहे, पशूंच्या बाबतीतील त्यांचे निष्ठूर व क्रूर हृदय आता मानवसंहार बिनदिक्कत करीत आहे आणि त्याचा उपयुक्ततावाद आता साऱ्या जीवनाला फोडून खाऊ लागला आहे. या रानटी व राक्षसी जीवनाकडे वळलेल्या मानवसमाजाच्या हृदयात मानवता, बंधुता, सेवाबुद्धी व कोमलता निर्माण केल्याशिवाय स्मशान होऊ घातलेल्या जगाला नंदनवनाचे स्वरूप येऊ शकणार नाही. त्यासाठी त्याच्या आहारविहारापासून तो श्रद्धा व विचारापर्यंत सर्वातच योग्य परिवर्तन होणे जरूरीचे आहे. "पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति" अर्थात् पवित्र जागी केलेले पाप हे पक्के होते, त्या प्रवृत्तीला मग काही अटकावच राहात नाही, यासाठी कमीत कमी देवाधर्माच्या पवित्र नांवावर तरी प्राणिसंहार करणे यापुढे अजिबात बंद झालेच पाहिजे.

देवता भुकाळलेल्या आहेत काय?

मित्रांनो ! जो पाप करील, गुन्हा करील, त्याला शिक्षा करणे आणि राष्ट्राच्या, न्यायाच्या व मानवतेच्या शत्रूंना बळी देणे हे रास्त[2] आहे. अशा लोकांचे प्राण मृत्यूसुद्धा हसत-हसत जवळ घेईल, हे मला मान्य आहे. पण निरपराध-बेकसूर जीवांचे बळी केवळ आपले पाप झाकावे म्हणून किंवा आपल्या स्वार्थासाठी देणे हा कोठला न्याय? या पापाला देव क्षमा देणे शक्य नाही; आणि म्हणूनच अनेक नैसर्गिक आपत्ति, रोगराई व युद्धादिकांचे निमित्त करून कालशक्ती आज सर्रास मानवांचे बळी घेऊ लागली आहे, असे म्हणायला हरकत नाही. निर्बल व निर्दोष जीवांना विनाकारण देवतांच्या समोर कापतांना तुम्ही देवीदेवतांना समजता तरी कोण? काय देवता इतक्या आंधळ्या आहेत की त्यांना त्या जीवांची दशा[3] दिसत नाही? इतक्या त्या भुकाळल्या आहेत की तुम्ही काहीही खायला दिले तरी तुमच्या पापाकडे त्या डोळेझांक करतात? त्या इतक्या

---

१. कठोरता   २. योग्य   ३. स्थिती

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बुद्धिहीन आहेत की त्यांना समाजांतले खरे पातकी व घातकी ओळखायला येत नाहीत? त्या इतक्या कमजोर आहेत की त्यांना दलालांच्या मध्यस्थिशिवाय कुणाचे प्राण घेतांच येत नाहीत? त्या काय वरून राक्षसिणी आहेत की स्वत: निर्माण केलेल्या आपल्या लेकरांनाच त्या खाऊं इच्छितात? तसे असते तर त्यांनी हे जीव उत्पन्न तरी कशासाठी केले असते?

हेच आमचे कर्तव्य

मित्रांनो ! देवतांना जर आपण असे वरून, बुद्धिहीन, दुबळे व राक्षसी वृत्तीचे समजत असू तर मग त्यांना देवता, जगन्माता, चित्‌शक्ती म्हणणे मूर्खपणाचेच नाही का ठरणार? माझा असा दृढ विश्वास आहे की देवीदेवता मुळीच बळी मागत नाही केवळ आंधळेपणाने व कावऱ्या वृत्तीने आपनचं हे पापकर्म करतो आणि त्याचे प्रायश्चित बळी देणाराला भोगावेच लागते हे केव्हाही विसरू नका. ह्या अंधभावना नि हे अमानुष प्रकार आता बंद करायलाच पाहिजेत. देविदेवतांची पूजा करायची ती सत्य संकल्पाने, मानसिक भावनेने, सात्विक सामुग्रीने आणि सामुदायिक प्रार्थनेने करा. विश्वांत सुखशांती निर्माण करण्याची मागणी एका आवाजाने करून स्वत: देखील त्या मार्गाने कार्य करूं लागा. अशा अनिष्ट रूढ्यापांसून स्वत: मागे परता आणि इतरांना सुद्धा माझी नम्र विनंती सांगून परावृत्त करण्याचा आपापल्या परीने प्रयत्न करा. कोणी मानीत नसले तरी आपले विचार जाहीर करायला मात्र प्रत्येक जाणत्या माणसाने विसरू नये व कचरू नये. प्रत्येक बुद्धिमंताचे हे कर्तव्य आहे.

सोडा ही घातकी वृत्ती

मित्रांनो ! पाप करणे हे जर कायद्याच्या[१] कक्षेत सापडत नसेल तर ते उत्तम आहे, असे म्हणून भागणार नाही. असल्या अमानुष रूढ्यांना सक्तीने व सुविचाराने बंद करण्याकडे सरकार लक्ष देत नाही तोवर आम्हांला काहीच हरकत नाही, अशी दृष्ट समजूत करून घेऊ नका. सोडा ही घातकी रूढी आणि सात्विकतेने देविदेवतांना प्रसन्न करून घेऊन सारे राष्ट्र मानवतेने फुलूं द्या; सुखसमृद्धीने फळूं द्या; प्रत्येकाच्या हृदयांत देवत्व जागे करून सर्वत्र "स्नेहसंमेलनदिन" म्हणून येता दसरा उत्साहाने गर्जू द्या !

(श्रीगुरुदेव, सप्टेंबर १९५० पृ. क्र. ४-५)

१. सरकारी नियमाच्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१०. राष्ट्रधर्माच्या दीपांतील तेल झिरकतं तरी कुठून ?

(राष्ट्राला उन्नत करण्यासाठी राष्ट्रधर्माचे शिक्षण अत्यावश्यक आहे परंतु उच्च विद्या विभूषित लोकांपैकी बहुतांश लोक जबाबदारी घेण्याचा उत्साह दाखवित नाही. जोपर्यंत ते जबाबदारी घेणे शिकणार नाही तोपर्यंत राष्ट्र उन्नत होणार नाही याची जाणवी वं. महाराज पुढील लेखाद्वारे आम्हा सर्वांना करून देत आहे – संपादक)

बेजबाबदार आणि बेइमान

मित्रांनो ! कितीही ग्रंथ पढलो, उच्च विद्यालयात शिकलो, अनेक प्रकारच्या कलाकौशल्यांत पारंगत झालो, तरी जबाबदारी घेण्याचा उत्साह मात्र आपल्यापैकी हजारांत एकाला देखील येत असलेला दिसत नाही. जबाबदारी म्हटली की माणसांना भीति वाटलीच समजा. पुस्तकं वाचायला, आकाशांतील तारे ओळखायला आणि हवेतील सूक्ष्म जंतू मोजायला आपण शिकलो असलो, तरी, जोवर जबाबदारी घेणं आम्ही शिकणार नाही तोवर काय उपयोग? एखाद लहानसान काम जरी कुणाला सांगितल तरी तो त्यात करता येतील तेवढ्या चुका करून ठेवतो; चुकलेली गोष्ट दुरुस्त करून ठेवणारे लोक मात्र फारच क्वचित् नजरेस येतात. आणि खरी गोष्ट अशी आहे की, जे लोक दुसऱ्याना सावरून घेऊन[१] त्यांचं भलं करून देतात व इमानदारीनं त्यांच्याशी वर्तन करितात, त्यांच्यावरच समाजाची धारणा अवलंबून असते.

परंतु आज आम्ही काय पाहतो? एखादी भुलली भटकलेली मुलगी गुंडांच्या तावडीत सापडली असता तिला सोडविण्यासाठी प्राण पणाला लावणारा बहादूर तर दूरच, परंतु तिला साध्या रस्त्यावरून घरी पोहोचविणारा पुरुष मिळण्याची देखील मारामार झाली आहे. कुठं 'चोरावर मोर' होऊन हा पुन्हा भुलवील, असं होऊन गेलं आहे. एखाद्याची रक्कम पोहोचवायची असेल तर आपलं 'कमिशन'[२] घेतल्याशिवाय तो पायच पुढ घालीत नाही. आणि कमिशन दिल्यावर तरी भरवंसा आहे काय की तो म्हणेल तेव्हाच पैसे पटवील म्हणून? छे. तो मध्येच पैसे खर्ची घालील आणि ''म्हणून धोका करून ठेवील, मी घेतले, देईन फुरसतीनं'' म्हणून धोका करून ठेवील, असंच अधिक होऊलागलं आहे. यामुळे कुणाशी कसा व्यवहार करावा हेच आता कळेनासं झालेलं आहे.

---

१. मदत करून २. मोबदला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सुसंस्कार हाच खरा शास्ता !

पूर्वी समाजात धर्म होता म्हणजे ही धारणेची भूमिका कायम होती, पण आज समाजातून ती लोपून गेलेली आहे. एकादशीला फराळ न करणारे भाविक आज कमी नसतील, पण ते त्याही दिवशी लबाडीने दुसऱ्याकडून लाच खाण्यात बहुधा पाप समजणार नाहीत. पूर्वी धर्मवान लोक सर्वाआधी हेच शिकवीत असत की- ''कुणाशीही सत्यतेनं व प्रेमभावनेनं वागलं पाहिजे, आपल्या घराप्रमाणेच इतरांशी व्यवहार ठेवला पाहिजे, आपल्या आई-वडिलांप्रमाणेच सर्वांशी आदरानं वागलं पाहिजे, म्हणजेच देव यश देईल व आपलं बरं करील, असं वागणारांना स्वर्गसुख मिळेल व त्यांची मुलं-बेचाळीस कुळं देखील सुखी होतील. याविरुद्ध वागणारा पापभागी[१] व दुःखभोगी बनेल.'' या शिकवणुकीत 'धर्म' शब्द गुंफून भावनेचा उपयोग करून घेतला असला तरी, वास्तविक समाजाच्या सुव्यवस्थेचंच तत्व तींत पुरेपूर भरलेलं आपणास दिसून येईल.

पण आता त्याप्रमाणे दुसऱ्याशी वागणं तर दूरच राहिलं; मुलगा आपल्या घरीच चोरी-चहाडी करतो व चार भावंडात देखील त्याचं इतकं वाकडं येतं की स्वार्थासाठी त्यांचा नाश झालेला त्याला बरा वाटतो. मुलं थोडीशी हुशार झाली की वडिलांना अशी जाणीव करून देतात की- ''आम्हाला आमचे हिस्से द्या नाहीतर जागेत 'पार्टिशन' करा. नाहीपेक्षा मी कुठंतरी निघून जाईन.'' असं ऐकलं की बाप घाबरलाच म्हणून समजा. मग तो काय करायचं ते त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कळसूत्री बाहुल्यासारखं करू लागतो; परंतु त्यांना स्वावलंबनाचा धडा मात्र केव्हाही न देता ऐतखाऊच करून ठेवतो आणि दुर्दैवानं किंवा दुराचरणानं पुढं धनसंपत्ति गेली की मुलं लागलीच चोरांच्या घोळक्यात सामील होतात अथवा सर्रास काळाबाजार वा कुटिल दलाली करून. आपलं भलेपण जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करितात.

हा कलाकार की कुलांगार?

परवाच अशा एका भल्या माणसाशी माझी गाठ पडली.[२] लहानपणी तो आईबापाच्या लाडानं वाया गेलेला मुलगा अभ्यासाला मुकला आणि वेडगळ मुलांच्या नादानं 'बाहिरख्याली' बनला. पैसे अपुरे म्हणून चोरांच्या सहवासात पडला आणि त्यांनी त्याची अपात्रता पाहून एके प्रसंगी त्याला मारून-पिटून हाकून दिलं. गावांत तो नको-नकोसा झाला; त्याच्याबरोबर त्याच्या बापाची देखील बेकिंमत झाली. बापानं शेवटी कावून जाऊन त्याला म्हटलं- ''अरे कारट्या!

---

१. पापाचा भागीदार २. भेट झाली

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कांही कामधंदा तरी कर. आपल्याबरोबर आमचं देखील मरण केलंस त्वां...'' आणि मग खरोखरच त्या मुलानं धंदा उभारला आणि तो भरपूर पैसे मिळवू लागला.

अर्थातच, त्यानं जो धंदा निवडला तो सुद्धा काही निराळाच[१] होता. दोन वेश्या ठेवून गावोगावी फिरायचं नि व्यभिचारी तमाशे करून पैसे कमवायचे. वडिलाला ते पसंत नव्हतं पण त्याच्या तोंडाला मुलानं लावलेलं चांदीचं कुलूप झुगारून तो असंही म्हणूं शकत नव्हता की- ''अरे कुलांगारा[२] ! शेवटी हाच का धंदा तुला उरला होता ?

आणि त्यानं म्हटले असतं तरी त्या मुलानं वाक्पांडित्य खर्चून ''उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी'' अर्थात् 'उद्योगानंच लक्ष्मी प्रसन्न होते ना? मग ही घ्या माझ्या हातातली महालक्ष्मी-महान् संपत्ति' म्हणून केव्हाच त्याची वाचा बंद केली असती.

योगायोगानं परवां तो मला भेटला आणि नमस्कार करून, दोन्ही हात कानाला लावून व गालावर हळूच थापटा मारून उभा झाला. अत्यंत नम्र दिसला मला तो. मी म्हणालो- ''अरे, पुष्कळ दिवसांनी भेटलास रे मित्रा ! कसं काय चाललं आहे सध्या घरचं?''

तो म्हणाला-''महाराज! आपल्या आशीर्वादानं पुरेपुर खायला मिळतं, नेहमी चार जणात बसायला मिळतं, लोक सुद्धा मोठ्या मानानं चाहतात मला. बस, एवढंच चाहतो नेहमी.''

मी विचारलं-''काय, काही कथाकीर्तनं करतोस की व्याख्यानं देतोस? काही जादूचे खेळबीळ तर करीत नाहीस ना की ज्यामुळे चारचौघांत बसायला मिळून शिवाय रग्गड[३] पैसाही तुझ्या हातात खेळतो?''

तो हसून म्हणाला-''महाराज ! सांगायचं कशाला? एकदा येतोच आपल्या आश्रमात कार्यक्रमासाठी. आपणही खुश होऊन जाल, कारण आपल्याला गाण्यावाजविण्याचा नाद आहेच.''

मी विचारांत पडलो आणि पुन्हा विचारलं-''काय रे, शाहीरी पोवाडे तर नाहीत? कारण त्याला खेड्यापाड्यांतील माणसं मोठ्या आतुरतेने जुळतात. सांग तर खरं काय आहे ते?'' तो म्हणाला-'' आपल्या पायाजवळ लपवायचं कशाला महाराज! दोन रूपवान मुली ठेवल्या आहेत मी. त्यांचा सुंदर नाच

---

१. अगदीच वेगळाच २. कुलनाशका ३. भरपूर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

करवतो. त्या गातात सुद्धा फार उत्तम. त्यासाठी लोक ठेक्यानं त्यांना नेतात नि वेळेवर पैसेही भक्कम देतात, त्यामुळे अत्यंत चैनीत आहोत आम्ही. कशाला मग दुसरा धंदा करा अन् त्यांत मिळणार तरी काय आहे? नोकरी करावी तर लोक शिफारस मागतात. राहिलोही होतो एका ठिकाणी नोकरीला पण चार दिवसाच्या वर काही टिकू शकलो नाही. कारण मी पडलो आजाद गडी, मालकाची ठिसफिस[१] कशी ऐकणार? शिवाय प्रत्येक कामात आपली दलाली ठरलेलीच असायची, त्याशिवाय पुरवणार कसं? नाही का महाराज !''

मी म्हणालो-''हं पुढं?''

तो म्हणाला-''म्हणून मी आता हेच स्वीकारलं आहे स्वतंत्र काम. जनताजनार्दनाची थोडी सेवाही होते अन् आपलंही ठीक चालतं. ईश्वरानं मला खूपच यश दिलं आहे यांत. त्या नाचतात तर छानच, शिवाय चांगल्या चांगल्या श्रीमंतांच्या मुलींना 'डान्स' पण शिकवितात. त्यामुळ लोकप्रियतेला वाणच[२] नाही. कुणीही या-बसा म्हणतात मला, आपल्या पायाच्या प्रतापानं.''

मी विचारलं-''काय रे, किती दिवस पुरेल हे असं !''

तो म्हणाला-'' ह्या जरा वयस्कर झाल्या की मुली आहेतच ना त्यांच्या? त्यांनाही आतापासूनच धडे देऊन तयार करतो आहोत आम्ही. अन्-शिकल्या सवरल्या दुसऱ्या पोरी सुद्धा आता 'कले'च्या नावानं आम्हांला मिळू शकतील महाराज! ते सोडा; पहा तर खरं एकदा तुम्ही, त्यांचा किती उत्तम आवाज आहे तो. मग येऊं का आश्रमांत?''

मी यावर जरा टोचून विचारलं-''हे सांगतांना तुला काही शरमबिरम नाही वाटत रे, की आपण काय अन् कोणाजवळ हे रंगून सांगत आहो म्हणून?''

तो हसून म्हणाला-''आता तर ही सर्वमान्य गोष्ट झाली आहे महाराज! याला कोण काय म्हणणार! कारण, तसं असतं तर मोठमोठ्या कुलीन घराण्यांतल्या बाया सिनेमांत 'रामजोशी' चा तमाशा पुन:पुन्हा पहायला कां गेल्या असत्या? श्रीमंतांच्या अन् वकील बॅरिस्टरांच्या मुली नाच कशाला शिकल्या असत्या नि त्यांनी कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये, परिषदांत, नाटकांत अन् मोठमोठ्या हॉलमध्ये नाचगाण्याचे जाहीर कार्यक्रम कां केले असते? पूर्वी तर देवदेवतासुद्धा नृत्य करीत नि पाहात असत, म्हणूनच मी तुम्हाला तसं म्हणालो. तुम्हाला रुचलं नसेल तर मी नाही आणणार म्हणा. पण माझा म्हातारा सुद्धा मला काही म्हणत नाही; वास्तविक तो सुद्धा माल जपणारा आहे.''

---

१. कठोर बोलणे २. कमीच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मी त्याला उद्वेगानं म्हटलं-''मित्रा! अरे असे पांगळे बाप अन् आंधळे पुत्र या देशांत असा सावळागोंधळ घालीत आहेत म्हणूनच तर देश या अवस्थेला आला आहे गड्या! खरंच सांग, तुझ्या या कार्यक्रमानं ऐकणाऱ्या अन् पाहणाऱ्या मुलामुलींच्या मनावर काय परिणाम होत असतील! अन् ते सर्वजण जर असंच करू लागले तर देशात इमान नि चारित्र्य कसं नांदेल? कोण कोणावर विश्वास ठेवू शकेल? यांतून निपजणारी पुढची पिढी ही देशाच्या नि आपल्या जीवनाच्या दृष्टीनं तरी कितपत जागृत अन् समर्थ निघू शकेल? या दृष्टीन कोणीच विचारपूर्वक नियंत्रण करीत नाही, दूरदृष्टीचा शास्ताच[१] उरलेला दिसत नाही, म्हणून का उघड्या डोळ्यानं आपण या राष्ट्राच्या कोवळ्या बागेला[२] आग लावून द्यायची?''

यावर तो जरा विचारांत पडल्यासारखा दिसला आणि त्यानं नम्र उत्तर दिलं-''मग काय करू सांगा महाराज! तुम्ही म्हणाल तसं वागतो.'' मी म्हणालो-''त्या मुलींचं कुणाशी तरी लग्न लावून देऊन त्यांचं जीवन सुखी कर अन् तूही कुठं नोकरी पहा. किंवा ये माझ्या बरोबर प्रचार करायला, म्हणजे लोक तुला बरं म्हणतील नि नोकरीही देतील. पण असला हा अमानुष मार्ग सोड गड्या!''

त्याच्या डोळ्यात पाणी आलं, तो म्हणाला-''बरं आहे महाराज! घरी जाऊन कळवतो मी तुम्हाला.'' मला थोडासा भरंवसा वाटला; पण बिचारा गेला तो पुन्हा काही माझ्याकडे आला नाही. झाली असतील या गोष्टीला आता सात-आठ वर्षे.

राष्ट्राच्या नौकेला पडलेलं महाछिद्र

मित्रानो ! मला यातून सुचवायचं हे आहे की, लोकांत आज धर्माची वरवरची टरफलं उरलेली दिसत असली तरी राष्ट्राला व मनुष्यजीवनाला आधारभूत असं चारित्र्य सर्वांतून झिरपून गेलं आहे आणि कष्टाशिवायच एकदम पैसा मिळविण्याची चुरस[३] लोकांत उत्पन्न झाली आहे अशा स्थितीत जिथं थोर जबाबदार लोकच योग्य जबाबदारी पाळीत नाहीत तिथं साधारण लोकापैकी कोण कशी जबाबदारी पाळणार? प्रत्येकाची दृष्टी सध्या आपल्या तात्पुरत्या सुखांत केंद्रिभूत झालेली दिसते; तिला राष्ट्राच तर नव्हेच पण स्वतःच्या पुढील जीवनाचं देखील भान राहिलेलं नाही. ही गोष्ट महाभयंकर आहे. आज सगळीकडे सांगकामेपणाचा सुकाळ झाला आहे. ''बुद्धीशिवाय नि नेटाशिवाय काम करता आल्यास करावं, नुकसान झालं तर आम्ही जबाबदार नाही. वाटल्यास विमा काढ तूं आपल्या कंपनीचा की बिघडल्यास विमाकंपनीकडून भरून घेऊ म्हणून !'' असं मोकळ्या मनानं बोलणारे लोक मी लाखोंनी बघत आहे. यामुळे जबाबदारीची खात्री म्हणून लोक शिफारसपत्र मागूं लागले पण त्यांतही आजकाल थोरामोठ्यांचा धंदा[४] सुरु झाला आहे.

---

१. शासकच २. नव्या पिढीला ३. शर्यत ४. कमिशन घेण्याचा धंदा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हे बघा राष्ट्राचे जबाबदार धेंड !

कुणीही अर्जासोबत हातावर हिरवी नोट[१] ठेवली की विचारपूस न करताच शिफारस लिहिली जाते की-''मुलगा फार होतकरू आहे. आपल्या कामात यशस्वी होईल असा विश्वास वाटतो. याच्या कामाचा अवश्य अनुभव घ्यावा अशी आमची शिफारस आहे.''

या धेंडाच्या[२] शिफारसीनं मुलगा ठेवला आणि त्यानं चक्कर देऊन ऐवज लांबवला म्हणजे मालक या 'बड्या' इसमाला लिहितो-''महाशय! तुमची शिफारस घेऊन आलेला मुलगा अत्यंत उनाड नि चोर निघाला.'' त्यावर हे राव लिहितात की-''तसा अनुभव आला असेल तर त्याला सोडून द्या नि पैसे वसूल करा. मी त्याला ठेवाच म्हणून म्हटलं नव्हतं तर अनुभव घ्या असं लिहिलं होतं. मला तो बरा दिसला म्हणून शिरस्त्याप्रमाणे तसं लिहिलं. मी दिलगीर आहे.''

असे बेजबाबदारीचे प्रकार समाजांत सर्रास बोकाळल्यामुळे घातुक वनस्पती-तुपाला अमृताचं महत्व येतं तर खरे मोती शिफारसीच्या अभावी गाळांतच पडले राहून बाजारांत नकली मोत्यांचं फावतं. आपण करीत असलेल्या कृतीचा राष्ट्राच्या जीवनावर कोणता परिणाम होईल याची आज कोणाला काळजीच वाटेनाशी झाली आहे, त्यामुळे हव्या त्या उत्तम पदार्थात हवी ती घातुक वस्तू मिळवून लोक जनतेच्या जीवनांचा सर्वनाश करीत आहेत. जबाबदारी टाकल्याशिवाय तर काम होत नाही आणि जबाबदारी पाळायला तर कोणी तयार नाही; अशा स्थितीत काय करावं हा मोठाच प्रश्न उत्पन्न झाला आहे.

सरकार केव्हा उजेड पाडणार?

माझ्या मित्रांनो! या मार्गानं जाऊन तुम्हाला आपली भावी पिढी नेस्तनाबूत करावयाची नसली तर माझी विनंती ऐका. आपल्या मुलाबाळांत जबाबदारीची धारणा वाढवा; विश्वासघात न करण्याचे व सत्याचरणाचे पाठ त्यांना शिकवा आणि विश्वासपात्रतेची मोहीम सुरु करा. लिहिणे-वाचणे शिकविण्याची जरूरी आज राष्ट्राला आहे. अहो, मुलं आंगठाछाप किंवा ठोंबी असली तरी काहीसं चालेल पण ती कामचुकार, बेजबाबदार किंवा अविश्वासपात्र असता उपयोगी नाही. राष्ट्राची बैठक चारित्र्यावरच कायम राहू शकते, हे विसरू नका. आज जर धर्माचा ऱ्हास झाला असेल तर तो नीतिधर्माचा झाला आहे आणि म्हणूनच राष्ट्रांत दुःखदुर्दशेचा डोंब उसळला आहे. लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना आज

---

१. शंभर रूपये २. स्वार्थांध पुढाऱ्याच्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हे शिक्षण दिलं तरच देशाची धडगत आहे; नाही तर हे सरकार असून काही होत नाही तसंच दुसरं सरकार येऊनही काही उजेड पाडूं शकत नाही हे लक्षांत असू द्या. इंद्रियलोलुप[१] बुद्धिमत्ता देशाच्या नि कुटुंबाच्या सुद्धा कामी पडायची नाही, याच बाबीकडे आधी आपणाला कटाक्षानं लक्ष दिलं पाहिजे. राज्य धर्मानं चालवा की धर्मातीत बनवा पण न्याय, नीति, चारित्र्य, विश्वासपात्रता, परस्पराविषयी खरीखुरी बंधुता ह्या गोष्टी राष्ट्राच्या प्राणासारख्या आहेत हे विसरू नका. नाहीपेक्षा आपल्याच हातांनी आपल्या व राष्ट्राच्या चिंधड्या करून घ्याल हे ध्यानांत असू द्या. एवढंच मला कथाकार-पुराणिक,शिक्षक-वाचक, बुवा-पुढारी, विद्यार्थी-पालक आणि श्रीमंत-सत्ताधारी या सर्वांना निक्षून सांगावयाचं आहे. ईश्वर आम्हां सर्वांकडून हे कार्य करून घेऊन देशांत सुखशांती नांदवो, हीच त्याचे चरणी प्रार्थना !

(श्रीगुरुदेव, ऑक्टोबर १९५० पृ. क्र. ३-६)

स्फुट लेखन-

स्वातंत्र्याचा बीजमंत्र

मित्रांनो, जनतेला मिळालेले स्वराज्य ही खऱ्या सुराज्यमंदिराची केवळ किल्ली आहे. जनतेला स्वराज्य मिळालेले आहे आपल्या न्याय्य इच्छा प्रगट करण्याचे, आपला उचित आवाज उठविण्याचे व आपल्या योग्य कार्यकर्त्यांना निवडून पुढे आणण्याचे! हे स्वातंत्र्यच उद्याच्या 'स्वर्गसम संसारा'चा पाया आहे. याचा योग्य उपयोग करून घेतल्यास साऱ्या राष्ट्रांत सुखशांतीचे व प्रगतीचे उच्च वातावरण निर्माण होणार आहे.

परंतु शेकडो वर्षे गुलामगिरीत घालवल्यामुळे जनता आपल्या या स्वातंत्र्याच्या अधिकारांना पार विसरून गेली आहे; राष्ट्रीयबुद्धी व दूरदृष्टीस पारखी झाली आहे. त्यामुळे तात्कालिक व क्षुल्लक अशा व्यक्तिगत स्वार्थाला बळी पडून ती आपल्या हाताने आत्मनाश करून घेत आहे. तिला आपल्या कर्तव्याची व जबाबदारीची पूर्णपणे जाणीव करून देऊन आपल्या अधिकारांवर आरूढ करून देणे हेच सुराज्याचे बीज आहे. त्याशिवाय स्वराज्याचे वैभव जनतेला अनुभवतांच येणार नाही.

- तुकड्यादास

---

१. विषयी, स्वार्थी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

११. शहाण्यांनो ! काळाची पावले ओळखून वागा !

(स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात सुराज्य लवकरच येईल अशी सर्वांची अपेक्षा होती परंतु थोड्याच काळात खेड्यांची सुधारणा होण्याऐवजी तेथील परिस्थिती दिवसेंदिवस हलाखीची होवू लागली त्यावेळी वं. महाराजांनी नव्या पिढीतील लोकांना काळाची पावले ओळखून मार्ग काढावा असो हितोपदेश केलेला आहे. अमरावती येथील महिला शारदा उद्योगमंदिरात शारदोत्सवा निमित्त केलेले भाषण येथे देत आहोत. – संपादकीय)

माझ्या मातांनो आणि मित्रांनो! माझे भजन हे राष्ट्रसेवेचे साधन आहे. देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी ते नाही, तर जनतेच्या हृदयांतील देवता जागृत करण्यासाठी आहे आणि म्हणूनच माझ्या आवाजाचा वगैरे विचार न करता आपण ते उत्सुकतेने ऐकत आला आहात. परंतु आता केवळ सांगण्या-ऐकण्याचे दिवस राहिले नाहीत, तर प्रत्यक्ष कृती करून दाखविण्यांची ही आणीबाणीची वेळ आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. सारे जग दुःखाने होरपळत असता, घराघरातील लोक उपवासाने तडफडत असता, ब्रह्मज्ञानाची कथाकीर्तने करीत फिरणे ही गोष्ट अत्यंत चुकीची आहे. गावांत कॉलऱ्याची साथ चालू असतांना डॉक्टर जर खोकल्याचे रामबाण औषध देऊ लागला तर त्याला डॉक्टर म्हणावे की जनावर? वेदान्ती पुराणिक आणि बुवाभक्त यांना सुद्धा हीच गोष्ट लागू आहे. परिस्थितीकडे लक्ष न देता सनातन धर्माच्या नांवाखाली यज्ञयाग आदी करायला लावणारे आज देशाचे शत्रु समजले पाहिजेत.

देशाची परिस्थिती आज अत्यंत नाजुक आहे. एकीकडे घराघरांत पक्ष नि पार्ट्या गोंधळ घालीत आहेत तर दुसरीकडे विरोधी लोकांची विमाने आकाशात घिरट्या घालू लागली आहेत. एकीकडे धरणीकंपाने व महापुरुषाने गावे ओस[१] पडत आहेत तर दुसरीकडे पावसाच्या अभावी उभी पिके जळत आहेत. सारा कष्टाळू समाज आज अन्नवस्त्राभावी "त्राहि त्राहि" करू लागला आहे. परंतु तरी देखील श्रीमंत, सुशिक्षित नि पुढारी "अपनी अपनी तानमें, चिडियाँ भी मस्तान है" याप्रमाणे आपापल्या नशेतच चूर[२] आहेत. शेजारी उपवासाने मरत असला तरी कुणाला त्याची पर्वा नाही. काळाबाजार आणि लाचलुचपत यांना तर आज सुमारच राहिला नाही. शिकलेले लोक नोकरीधंद्यांसाठी व श्रीमंत सुखचैनीसाठी खेडी सोडून शहरात येऊन बसले आहेत आणि खेड्यातील

---

१. ओसाड २. गुंग

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शेतीवाडी व कामधंदे ओस पडू लागले आहेत. देशभक्त म्हणविणारे लोक इलेक्शनच्या निमित्ताने खेड्यात घुसून तेथील जनतेला अनुकूल करून घेऊन एकदाचे निवडून आले की मग त्या " आंगठाछाप" जनतेला जरब दाखवणे, लुबाडणे हेच त्यांचे काम होऊन त्यांची दाद घ्यायला कोणीच तयार होत नाही, असा अनुभव येत आहे. अन्य सुशिक्षित लोकांना कारकुनी करण्यांतच ब्रह्मानंद[१] वाटत असल्याने ते खेड्याकडे ढुंकूनही पाहायला तयार नाहीत. त्यामुळे काही ठराविक बुवा, श्रीमंत व देशभक्त हे खेड्यात हवा तो गोंधळ घालीत असले तरी सत्ताधिशांना त्याची दादही नसते.

खेड्यांची ही हालत तेथील कष्टाळू जनतेला भिकारी बनवून किंवा भुकेने उपवासी मारूनच थांबेल असे चुकूनही कोणी समजूं नये. शेतकऱ्यांनी व मजुरांनी जर योग्य माहितीच्या साधनांच्या वा शक्तीच्या अभावी अन्नधान्य उत्पन्न केले नाही तर आज संख्येने फुललेली शहरे घटकेत ओस पडतील, धान्यच नसले तर धनाढ्यांचे पैशांचे हंडे जागच्या जागी थंड होतील, सुशिक्षितांची शानशौकत कवडीमोल ठरेल, बुवांच्या ताना बंद पडतील, आणि देशभक्तांचे डोळे पांढरे होतील. आपापल्या महालात स्वतःला सुरक्षित व भाग्यवान समजणारे काळाबाजारवाले सुखी राहतील असे समजू नका. झोपड्या जळू लागल्या तर बंगल्यावर कौलेसुद्धा राहणार नाहीत असा हा काळ आहे; आणि काळाची पावले दूरदृष्टीने ओळखून माणुसकीने वागण्यातच आपले व सर्व देशाचे कल्याण आहे हे विसरूनका.

बारा महिने मर-मर राबूनही जर पोटभर खायला मिळत नाही की कधी पुरेसे वस्त्र सापडत नाही, दवापाण्याची किंवा निवाऱ्यांची राहण्याची सोय नाही. तर त्या दुःखी जीवांच्या दृष्टीने रामराज्य आणि रावणराज्य यात फरक तो कसा दिसणार? वास्तविक भारताला लाभलेल्या या स्वराज्याला रामराज्य बनवायचे की रावणराज्य ही गोष्ट आपल्यावरच अवलंबून आहे. सुशिक्षित, श्रीमंत, देशभक्त, साधुसंत व सत्ताधिश यांनी मनात आणल्यास आजच ते राष्ट्राचे स्वरूप पालटून टाकू शकतात. परंतु त्यांना जर आपल्या सुस्थितीचा मोह सोडवत नसेल तर, सध्याच्या भयानक जीवनकलहाने पीडलेली असंतुष्ट गरीब जनता, पदोपदी ठोकरा देणारा हा निसर्ग, वाढलेली लोकसंख्या व घटलेले उत्पादन, ही बेसुमार महागाई आणि प्राथमिक गरजांच्या वस्तूंची टंचाई 'गचांडी' देऊन असे जबरीने करायला भाग पाडील, तुम्हीच काय, तुमच्या छायेला सुद्धा आता नवे युग थांबवता येणार नाही.

१. मोठे सुख-आनंद

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

निरनिराळे पक्ष नि पार्ट्या लढविण्यातच जर लोक स्वतःला धन्य समजून शेतकरी-मजूरवर्गाकडे आणि स्वतः मेहनत घेऊन शेतीची सुधारणा करण्याकडे दुर्लक्ष करतील तर त्यांना लौकरच त्याची कडू फळे चाखावी लागतील. हे आता तरी त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. 'आम्ही अमुक जातीचे, धर्माचे किंवा पक्षाचे आहोत' असे समजून समाजधर्म व राष्ट्रीय कर्तव्य यांचा विसर कुणीही पडू देता उपयोगी नाही. सामान्य जनतेला पुरेसे अन्नवस्त्र, औषध, मकान, शिक्षण इत्यादी गोष्टी मिळवून देणे हाच पहिला धर्म व हीच मुख्य राष्ट्रसेवा आहे, हे सूत्र लक्षात घेऊन आज जाणते लोक वागतील तरच त्यांना महत्व उरेल; नाहीतर गल्लोगल्ली त्यांची बेईज्जती होईल असा हा काळ आहे. केवळ सरकारवर निर्भर राहण्यात काही अर्थ नाही. शिकविल्याने जनावर सुद्धा 'सलाम' करू लागते ही गोष्ट लक्षात घेऊन आज आपण जनतेला स्वराज्याचा उपभोग घेण्यास योग्य व भारताची उन्नती करण्यास समर्थ बनविले पाहिजे. प्रत्येक सुशिक्षित व सुज्ञ[१] व्यक्तीचे हे आज आद्य कर्तव्य आहे.

मित्रांनो ! आपल्याला ही गोष्ट मी अनेकदा स्पष्टपणे सांगितली आहे की मी कोणत्याही पंथाचा, धर्माचा, वर्गाचा किंवा पक्षाचा नाही. सत्य हाच माझा पक्ष, मानवता हाच माझा धर्म आणि जनसेवा हाच माझा पंथ आहे. लोकांत सदयता, सामुदायिकता, मानवता, सच्चरित्रता आणि समता वाढीस लागावी या एकाच गोष्टीचा ध्यास करून मी माझ्या शक्तीनुसार सेवाकार्य करीत आलो आहे आणि त्याच निःपक्षपाती दृष्टीने मी आपणाला आज हे स्पष्ट इशारे देत आहे. मी पोथी वाचीत न बसता रोजच्या जीवनाचा ग्रंथ दररोज वाचीत आलो आहे. आणि आज त्यांतील जे प्रकरण माझ्या दृष्टीसमोर आहे ते लक्षात घेऊनच मी तुम्हांला सूचना करीत आहे. लोक मुर्दाड[२] आहेत अशी चुकीची कल्पना उराशी बाळगू नका. जनतेच्या हृदयात आज असंतोषाचा व उद्वेगाचा अग्निघुमसत आहे. आजचा हा जमाना बदलून सर्व समानतेच्या भूमीवर यावेत, यांतच सर्वांचे कल्याण आहे. ही गोष्ट अंजनाप्रमाणे तुमच्या नेत्रांत घुसून तुम्हाला सन्मार्ग दिसावा अशी माझी हार्दिक इच्छा आहे.

तुम्हाला हे माहीतच आहे की माझ्यामागे कसलाही पाशपसारा नाही. आईवडील केव्हाच मरून गेले आहेत, त्यांची मला फिकीर नाही. "रांड नाही पोर नाही, जिवाला घोर नाही" अशी माझी स्थिती आहे. अर्थात् मला सत्य गोष्टी स्पष्टपणे मांडण्यची मुळीच दिक्कत वाटत नाही. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणी कितीही आढेवेढे घेतले, अडथळे आणले, तरी आजची ही हवा

---

१. शहाण्या २. मूर्ख, अडाणी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लौकरच बदलून नवे जग उदयास आल्याशिवाय राहणार नाही. यासाठी सर्वांनी न्यायनीतीची व माणुसकीच्या धर्माची कास धरून जनतेला सुखी करण्यासाठी प्राण पणास लावून झटले पाहिजे. काळाबाजार व अत्याचार निवारण्यासाठी सर्व शहाण्या लोकांनी पुढे झाले पाहिजे आणि थोरामोठ्यांच्या चुका नाहीशा करण्यासाठी व देशाच्या रक्षणासाठी मरायला सज्ज असले पाहिजे. अशा निर्धाराने जितके अधिक लोक पुढे येतील तितक्या वेगाने राष्ट्राचे भाग्य उदयास येईल असा माझा दृढ विश्वास आहे. काळाची पावले ओळखून योग्य मार्ग धरण्याची सद्‌बुद्धि व शक्ती ईश्वर सर्वांना देवो, हीच त्याचे चरणी हार्दिक प्रार्थना !

(श्रीगुरुदेव, नोव्हेंबर १९५० पृ. क्र. ३-६)

स्फुट लेखन- क्रांतीमूर्ती

जगाची उत्पत्ती ज्या मूलतत्वापासून झाली आहे त्या मूलतत्वाला स्पर्श केल्याशिवाय जगांत योग्य व निर्दोष क्रांती[१] करता येत नाही; तसेच "हे मजचिस्तव जाहले। परि म्या नाही केले"[२] अशी निरभिमानता व अलिप्ताही साधत नाही. पूज्य महात्मा गांधीनी याच धारणेने सेवाकार्य केले आहे.

मठमंदिरांत व पर्वतांत बसलेले त्यागी पुरुष जर जनसेवेस लागतील तर आजही अनेक महात्मा गांधी जगात वावरतांना दिसतील. पण विषयलंपट, नशाबाज किंवा कलासक्त लोकांप्रमाणे त्यांना चिंतनाशिवाय दुसरे रुचतच नाही. आर्यसमाजाने संतांच्या या उपरामतेला डिवचून सारा वेदच सेवेकडे वळविला आहे.

जगात चांगले कार्य करणारेही लोक जर त्यांत आपले व्यक्तित्व घुसडून व वाढवूनच करीत गेले तर त्यामुळे मतभेद वाढून पक्ष पडू लागतात आणि राष्ट्राचा नाश होतो. असे होऊ नये म्हणूनच स्वामी रामतीर्थांनी स्वतंत्र संस्था किंवा मठ उभारले नाहीत आणि जे. कृष्णमूर्ति यांनी संस्थेचा त्याग केला नाही.

भिन्नभिन्न पंथपक्ष व धर्मादिकांचे तीव्र अभिमान हे जगांतील महान् विष होय. आपला वेगळा असा रंग जगाला देण्यापेक्षा, माणूस प्रत्येकाची सेवा व सहायता कसा करू शकेल व नीतिमर्यादा सांभाळून स्वावलंबी कसा राहील हेच शिक्षण सर्वांना दिले पाहिजे. यानेच जीवसृष्टी उत्क्रांत अर्थात् विकासवान होते हाच सर्वांचा सार आहे.

–तुकड्यादास

---

१. परिवर्तन २. ज्ञानेश्वरी अ. ४ ओवी ८१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१२. सौंदर्य रमो घरघरात स्वर्गियापरी

(या विश्वातील घराघरात स्वर्गासारखा आनंद मिळाला पाहिजे अर्थात प्रत्येक घरातील स्त्री-पुरुष, मुलं-मुली परस्परपूरक आणि पोषक होवून सुखी व समाधानी व्हावेत हीच वं. महाराजांची इच्छा होती त्यासाठीच पुरुषांनी स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलविला पाहिजे असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे. यासाठी सर्व संस्कार केंद्रे सुधारून, सर्व मुलं-मुली चारित्र्यवान झाली पाहिजेत. सर्वांनी सर्वांशी आदराने व समत्वाने वागावे असा हितोपदेश वं. राष्ट्रसंतजी करीत आहेत - संपादक)

बंधूंनो ! आपल्या कबजात असलेल्या प्रत्येक जीवाच्या हातापायात गुलामगिरीच्या सोनेरी बेड्या टाकून हवी तशी मजा मारण्याच्या जनावरी (पाशवी) वृत्तीचाच जर माणसांत विकास झालेला दिसत असेल तर, मानवजीवन हे खरे मनुष्यत्व पावले असे कोणाला आणि कोणत्या तोंडाने म्हणतां येईल? परंतु स्वतःला 'मानव' ही पदवी लावणारा हा नरपशु मोठमोठ्या जनावरांना तर युक्तीप्रयुक्तीने काबीज करून बसलाच आहे, निसर्गाच्या शक्तीवरही त्याच्या स्वाऱ्या चालूच आहेत, पण आपल्याच तोडीच्या अन्य मानवप्राण्यांना देखील तो गुलाम बनवून पिढीजात त्यांचेवर आपली सत्ता चालविण्याचा प्रयत्न करीत आहे. एक देश दुसऱ्या देशाला गुलाम करू पाहात आहे आणि त्या देशांतीलच एकेक घरांतील मानव आपल्याच घरांतील अन्य मानवप्राण्यावर कुरघोडी करून[१] ऐश्वर्य मिरवीत आला आहे, त्याच्या उपभोगातच आपला भाग्यवानपणा सिद्ध करू पाहात आला आहे.

महिलांचे मातृत्व अमोल आहे !

मनुष्याच्या विकारी जीवनांतील उणीवा आपल्या मदतीने भरून काढण्याकरिता, परस्परांच्या सहकार्याने राष्ट्राची उज्ज्वल परंपरा अबाधित राखण्याकरिता व उभयतांच्या भावना एकरूप होऊन त्याद्वारे संसारसुखाची इतिकर्तव्यता साध्य होण्याकरिता पुरुषाच्या जोडीला देण्यात आलेली व्यक्ती ही नेहमी 'अबला'च राहावी; निसर्गाने सृष्टी चालविण्यासाठी तिच्यावर सोपविलेल्या मातृत्वाच्या महत्वपूर्ण जबाबदारीच्या बदल्यांत तिचा सांभाळ करण्याचे आपले कर्तव्य असतांना, उलट तिच्यावर उपकार केल्याचा आव आणून, तिला गुलाम[२] करून ठेवावे; ही त्याची नेहमीची इच्छा पाहून तर त्याच्या अज्ञानाची कीवंच करावीशी वाटते.

---

१. वर्चस्व ठेवून २. दास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

''आपल्या इतकीच जगाला ज्या स्त्रीदेहधारी मानवाची आवश्यकता आहे त्याला 'पत्नी' म्हणून तो जर आपल्या इतकेच आदराचे स्थान देत नसेल, बरोबरीच्या नात्याने वागवीत नसेल किंवा उन्नतीची संधी देत नसेल तर राष्ट्र सुखी व्हावे, उन्नत व्हावे'' हे शब्द तो निशा घेऊनच बोलत आहे आणि ''निशापाणी न घेता हे बोलतो'' असे ओरडून सांगत आहे यांत शंका नाही. सध्या हा प्रकार तर सर्रास सर्विकडेच[१] सुरु आहे. मनुष्याच्या दृष्टीची मजलच इथवर गेली आहे की, तो जिकडे जिकडे म्हणून बघतो तिकडे तिकडे आपले विषयसुख व स्वार्थसाधन यांना त्याचे झिंगलेले डोळे शोधतात.

स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी कोणती?

मित्रा ! बोल बोल; काय हेच आपल्या जीवनांतलं कर्तव्य आहे असं तुला वाटते? आणि असं वाटत नसेल तर तूं आपल्या पत्नीकडे सध्या तरी कोणत्या भावनेने बघत आहेस? मार्गात कोणतीही आईबाई दिसली तर तुझी मनोवृत्ती कोणत्या स्वरूपाचे दर्शन करू लागते? ''परस्त्रीतें म्हणतां माता। चित्त लाजवितें चित्ता॥''[२] अशी तर तुझी अवस्था होत नाहीना? आणि असा जर तुझा अनुभव असेल तर त्यात काही दुरुस्ती व्हावी असं तुला वाटते की नाही? जोपर्यंत तुझ्या या मनःस्थितीत फरक होणार नाही तोपर्यंत या जगात तू कोणतेही श्रेष्ठ कार्य करू शकणार नाहीस हे लक्षात ठेव.

ऐक; तुला ही शास्त्रदृष्टी माहीत आहे काय की स्वतःच्या पत्नीकडे सुद्धा पत्नीभावनेने सर्वकाळ पाहणे हा गुन्हा आहे म्हणून? अरे तूच कशाला, जनावर सुद्धा ठराविक ऋतुकाळाशिवाय मादीला उपभोगाची वस्तु समजत नाही. आपण मनुष्य या नात्याने त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहो असे जर तुला वाटत असेल तर हे संयमाचे शास्त्र अवगत करून घे आणि ''कोणतीही स्त्री ही नवराष्ट्र निर्माण करण्याची पवित्र देवता आहे आणि तिच्या मनावरील परिणाम भावी संततीत उतरून देशाला तेजस्वी किंवा दुबळे बनवू शकतात'' हे विसरू नकोस.

महिलांच्या आदरांतच राष्ट्राचा उद्धार

स्त्रियांचे लक्ष ज्यावेळी या महत्वाच्या धारणेविरुद्ध जाईल आणि पुरुष तिला 'मनास येईल तशी मजा मारण्याची वस्तु' समजू लागतील तेव्हा सुखशांतीचा मार्ग कोणीही व कधीही निर्माण करू शकणार नाही. कारण, आईवडिलांचे संस्कार आनुवंशिक रोगांप्रमाणे संततीत उतरत असतात, समजलास? एकटा रावण जसा पृथ्वीला हलवू शकतो तसाच एखादा श्रीकृष्ण जगात नवी ज्योत

१.सगळीकडे २. सार्थ श्रीतुकाराम गाथा अभंग क्र. १०२०

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

निर्माण करू शकतो. तेव्हा, "जर शेकडा दहा कुपुत्र निर्माण झाले तर दुनिया कुपात्रतेचे रूप धारण करते." हे वचन खोटे कसे म्हणतां येईल? आणि जर शेकडा नव्वद प्रमाणात अशी संतति निर्माण झाली तर या पापाला प्रलयाशिवाय-हाल हाल होऊन सर्वांनी मरून जाण्याशिवाय-दुसरे प्रायश्चित कुठले नि कोण देणार बाबा? आज आमचा भारत देश त्याच दिशेने जात असलेला दिसत नाही का?

म्हणूनच मी माझी स्पष्ट धारणा प्रगट करू चाहतो की, देशातील नव्या राष्ट्राची जननी 'स्त्री' ही सर्व प्रथम आदरणीय व सुसंस्कृत झाली पाहिजे. नव्हे, तिला पुरुषाने तसे वागणूक प्रतिष्ठेचे स्थान[१] मिळवून दिले पाहिजे. आपण जर तिच्याकडे घृणेच्या दृष्टीने बघू, तिला दुबळे बनवू किंवा केवळ विलासवस्तु बनवून ठेवू तर तेच संस्कार संततीच्या रूपाने आपल्या छातीवर बसल्याखेरीज राहणार नाहीत. अर्थात् त्यांची कटु फळे आपणासच भोगावी लागणार, हे विसरून कसे चालेल बाबा!

आधी सर्व संस्कार केंद्रे सुधारा

जगात कोणतेही राष्ट्र चारित्र्य गमावून उन्नत होऊ शकत नाही. त्याची तशी उन्नती म्हणजे एक महान शापच ठरतो, हे तुला इतिहासावरून दिसून येईल. तेव्हा, स्त्रीसुधारणेच्या नावाखाली आम्ही जर अगत्याचे स्त्रीचारित्र्यच गमावून बसू तर, आपली सुधारणा कोरड्या कोल्हेकुईचेच उग्र[२] रूप धारण करील यांत शंका कसली? तेव्हा चारित्र्यवंतांचा बोध पुरा अनुभवून त्या आधारेच मी विनंती करतो की, देशात सुधारणा करावयाची असल्यास सर्वाआधी मुलांमुलींचे चारित्र्य सुधारले पाहिजे; त्यांची परस्परांकडे पाहण्याची दृष्टी राष्ट्रकुटुंबाची अर्थात् भ्रातृत्वाची व-आदराची असली पाहिजे. जी जी सुधारणा आपण देशांत करू चाहतो ती प्रथम लोकसेवा करणाऱ्या संस्थातून, धार्मिक संस्कार जेथून प्रगट केले जातात अशा रथातून व शाळाकॉलेजातून केली गेली पाहिजे. कारण लोक बनविण्याची किंवा बिघडविण्याची केंद्रे तीच असतात. विकृत किंवा सुसंस्कृत स्वरूप अशाच स्थानांतील शिक्षणावरून समाजाला प्राप्त होत असते, असे मी निश्चयाने सांगेन.

लोक गतानुगतिक[३] प्रवृत्तीचे आहेत. समाजातील धुरीण किंवा पुढारलेले लोक जेव्हा त्यागबुद्धीने व सच्चारित्र्याने वागतात तेव्हा, मजाल नाही की लोक कुणाच्याही वाईट वागण्याला महत्व देऊन त्याचा आदर करतील. पण जेव्हा

---

१. मानाचे स्थान २. भयाण ३. विभिन्न

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

समाजधुरीण लोक आपल्या निश्चयापासून ढळतात तेव्हा, इमारतीचा पाया एक तसूभर ढळला की इमारत फूटभर फाटून जावी त्याप्रमाणे, जगाचे रूप अतिशय विकृत झालेले दिसते; राष्ट्राची घडी बिघडून जाते. आज जी भारताची दशा झालेली आहे त्याला थोरामोठ्यांचे चारित्र्य व त्यांनी शिक्षण व संस्कारकेंद्रातून चालू दिलेला गोंधळ जबाबदार नाही असे म्हणता येईल का?

वर्णसंकर म्हणजे काय?

चारित्र्याचा मुद्दा मांडतांना मी आपणाला तथाकथित वर्णसंकराची भीति घालीत नाही. कारण वर्णसंकर म्हणजे एका जातीने दुसऱ्या जातीशी लग्न करणे, ही खुळी[१] समज मला मान्य नाही. माझ्या मते वर्णसंकर म्हणजे दोन विरुद्ध गुणस्वभावांच्या व्यक्तींचा संयोग. असभ्य वृत्तीने, बलात्कारी प्रवृत्तीने व थोरामोठ्यांसमोर परस्परांशी वचनबद्ध होण्याच्या संस्काराशिवाय जर कोणी मनसोक्त वर्तणुक केली तर त्याला मी व्यभिचार किंवा वर्णसंकर समजतो व त्यापासून जी कुसंकल्पजन्य दुनिया निर्माण होते ती राष्ट्राला अत्यंत घातक व आत्मनाश करणारी होणे संभवनीय असते. असे न घडावे म्हणून स्त्रीपुरुषांना सुसंस्कारी केले पाहिजे; तसेच सर्वांच्या सुखदुःखांचा समानतेच्या भूमिकेवरून विचार करून कोणाचीही कुचंबना न होईल असे नियम निर्माण केले पाहिजे. मानवी प्राण्यांना गुलाम बनवून त्यांचा उपभोग घेण्याची प्रवृत्ति सुधारण्याचा मार्ग समाजाने आखला पाहिजे आणि सर्वांनी सुबुद्ध करणारेच शिक्षण घरीदारी मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. घर व राष्ट्र दुरुस्त करण्याचा हाच मार्ग मी समजतो.

स्वतंत्रता म्हणजे असहकारिता

देशाला असे सुबुद्ध[२] स्वरूप देता आले तरच प्रत्येक जीव प्रत्येकाची कदर करील आणि कुणीही कुणाचा गुलाम होऊन राहणार नाही. गुलाम नसणे म्हणजे कुणाचे काम न करणे, असा अर्थ मात्र कृपा करून कोणी करू नये. सहकार्य आणि सेवाशुश्रूषा यासाठी गुलाम व्हावे लागत नाही. आपले कार्य समजून जिव्हाळ्याने व राष्ट्रकुटूंबक भावनेने एकमेकांचे काम करणे, हाच त्याचा अर्थ. ''हा मालक मला पगार देतो व मी याची दास आहे म्हणून मला हे काम केलेच पाहिजे'' या दृष्टीने नव्हे, तर ''आम्हा परस्परांना या कार्याशिवाय सुखाने जगता येणेच अशक्य आहे आणि गुणग्राहकता व परस्परपूरकता यांनी एकमेकांच्या उन्नतीस मदत करणे हेच मानवी जीवनाचे कार्य आहे'' या दृष्टीने सर्वांशी

---

१. खोटी २. चांगले, सुसंस्कृत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आदरपूर्वक सहकार्याने वागणे, हीच मनोवृत्ती देशाला तेजस्वी व अमर करणारी आहे.

मित्रा ! ऊठ; तुझ्या सभोवती जे लोक दबून बसले आहेत, गुलाम होऊन पडले आहेत, त्यांना मित्र समजून प्रार्थनेच्या एकासनावर आणून बसव आणि त्यांच्या सुखाचा व उन्नतीचा मार्ग त्यांना दाखव, कपट करू नकोस, सत्य तत्व लपवू नकोस आणि त्यांना मोठेपणा प्राप्त झाल्यास त्यांत आपले मरण आहे असे समजू नकोस, त्यांना आदराच्या दृष्टीने बघ व सर्वांशी बरोबरीच्या नात्याने वाग. असे झाले तर राष्ट्रांत दबून पडलेली केवढी तरी प्रचंड शक्ती जागी होऊन ती संसारात स्वर्गीयता निर्माण केल्याशिवाय खचित राहणार नाही, हे पक्के लक्षात असू दे.

(श्रीगुरुदेव, डिसेंबर १९५० पृ. क्र. ३-५) ✣ ✣ ✣

स्फुट लेखन- महापुरुष

मित्रांनो ! विरुद्ध परिस्थितीचे गुलाम बनून रडत राहणारे व येईल त्या स्थितीत समाधान मानून धैर्याने वागणारे असे दोन्ही प्रकारचे पुरुष जगांत पुष्कळ मिळतील; परंतु आपल्या सामर्थ्याने विरुद्ध परिस्थितीवर ताबा गाजवून वाट काढणारे, पाहिजे ती परिस्थिति निर्माण करून घेणारे महापुरुष क्वचितच जन्मत असतात.

एका विशिष्ट मर्यादेपर्यंत पंथ व संप्रदाय हे मनुष्याला उन्नत[१] करण्यासाठी उपयोगी पडतात पण पंथाचा अभिमान हा पुढे त्याच्या उन्नतीस बाधाच[२] आणतो; आणि म्हणूनच पंथ ही महापुरुष निर्माण करण्याची खदान होऊ शकत नाही. ज्ञानेश्वर महाराज वैष्णवपंथ निर्माण करतील, पण तो पंथ फिरून ज्ञानेश्वराला जन्म देईल असे म्हणतां येत नाही.

विंचू पोखरूनच दूसरा विंचू जन्मावा त्याप्रमाणे, विशिष्ट परिस्थितीचे कवच भेदूनच महापुरुष प्रगटतात. त्यांच्या प्रगट होण्यांतच पूर्वपरिस्थितींचा अंत होत असल्याने, पुढील परिस्थितीत त्यांच्या पूर्वमार्गाचे नुसते अंधानुकरण करून कोणी महापुरुष कसे होणार? बदललेले संसारचक्र लक्षांत घेऊन चालू परिस्थितीतून सत्य ध्येयाकडे नेणारी नवी वाट काढण्याचे ज्ञान व धैर्य आपल्यांत असेल तर मात्र अवश्य महापुरुष होता येईल; केवळ सांप्रदायिक स्थिरतेतून नव्हे!

– तुकड्यादास

---

१. विकसित २. अडथळा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१३. गांधी-भक्तांनो, क्रांतीचे पाय मागे खेचू नका !

(महात्मा गांधी यांच्या कर्तृत्वामुळे लोक त्यांची घराघरात पूजा करून लागले. वं. राष्ट्रसंतांना हे व्यक्तीपूजन मान्य नाही. त्यांना गांधी तत्वज्ञानाकडे जगाचे लक्ष वेधावयाचे होते. व्यक्तीचा गुणगौरव व नामघोष केल्याने आमचे प्रश्न सुटू शकत नाही तर त्यासाठी त्या तत्वज्ञानानुसार आदर्श जीवन बनविल्यानेच प्रश्न सुटतील असा हितोपदेश गांधी-भक्तांना वं. महाराजांनी केलेला आहे. - संपादक)

महापुरुष व त्यांचे संप्रदाय

माझ्या मित्रांनो ! भारतात जे जे महापुरुष होऊन गेले त्यांनी आपापल्या काळांत राष्ट्राच्या प्रगतीचे प्रश्न जीवापाड मेहनत करून आपल्या दृष्टीकोनांतून सोडविले होते. परंतु त्यांच्या पश्चात् त्यांच्या कार्याची दीक्षा घेणाऱ्यांनी कालमानाचा[१] विचार करून नवे प्रश्न हाताळण्याऐवजी त्या महापुरुषांची व्यक्तिपूजा वाढवून आपापला संप्रदाय निर्माण करून ठेवला व तो संप्रदाय नव्या कार्यकर्त्यांना सहाय्य देण्याऐवजी अडथळे करीत गेला; नवी दृष्टी स्वीकारण्याऐवजी त्या महापुरुषांचे नुसते नाव जागविण्यांत इतिकर्तव्यता समजत गेला आणि अशा रीतीने अनेक काळातील अनेक महापुरुषांच्या नावांवर चालू झालेले विविध संप्रदाय हे राष्ट्राच्या चुथडा, संघर्ष व गोंधळच निर्माण करण्यास कारणीभूत झाले. पूज्य महात्मा गांधीजीच्या नावावर देखील अशीच सांप्रदायिकता अलिकडे वाढून, नव्या काळचे नवे प्रश्न सोडवू इच्छिणाऱ्या नव्या कार्यकर्त्यांना पदोपदी अडथळे करू लागली आहे. गांधीजीची तात्त्विक जीवनदृष्टी आत्मसात् करून त्या दृष्टीने आजच्या काळाकडे पाहण्याची व आजचे प्रश्न सोडविण्यासाठी नवे उपाय शोधण्याची अशा सांप्रदायिकांना रूची नसून, त्या महाव्यक्तीच्या नावावर आरामशीरपणे जगण्याचीच त्यांची धडपड दिसून येत आहे. परंतु हे बरोबर आहे का?

बंधूंनो! पूज्य गांधीजीचेच नव्हे तर राम, कृष्ण इत्यादी अवतारी महापुरुषांचे देखील नुसते व्यक्तिपूजन काहीही उपयोगाचे ठरणार नाही. त्यांच्या उज्ज्वल चारित्र्याचा, पवित्र गुणस्वभावाचा नि उच्च सेवाकार्याचा आदर्श समोर ठेवून आजच्या काळाकडे त्यांच्या दृष्टिकोनांतून पाहण्यास आणि नवे प्रश्न सोडविण्यास जर आम्ही सज्ज[२] झालो नाही, तर आमची ही अंधभक्ती त्यांना

---

१. परिस्थितीचा, काळाचा, २. तयार

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

केव्हाही संतोष देणार नाही किंवा आमचीही उन्नती होऊ देणार नाही. यासाठीच अशा महात्म्यांच्या जीवनापासून आम्ही काय शिकावे, हे आधी लक्षात घेतले पाहिजे.

गांधीजींच्या जीवनापासून काय शिकावे?

मित्रांनो! पूज्य गांधीजींच्या हृदयात घुसलेल्या गोळ्यांहून अधिक त्यांच्या हृदयात नेहमीच खळबळत आलेल्या ज्वलंत भावनांकडे आमची दृष्टी वेधली गेली पाहिजे. ते काय चाहत होते, स्वराज्य-प्राप्तीनंतर भारताला कोणत्या स्वरूपात ते पाहू इच्छित होते, भारताला स्वावलंबी मार्गाने सुखीसमृद्ध करण्याची त्यांची कार्यदिशा काय होती, हे सर्व लक्षात घेऊन सद्यःस्थितीत त्याचा योग्य दिशेने उपयोग करण्यास आम्ही शिकूं; त्यांचे जीवनव्यापी सत्य व समता नि मानवता यांचे प्रतीक अहिंसा, बुद्धाप्रमाणे त्यांची निवरता व महात्मा येशूप्रमाणे क्षमाशीलता, ह्या गोष्टी जर आम्ही आत्मसात करू, तरच त्यांना खरी श्रद्धांजली दिल्यासारखे होईल. अन्याय, द्वेषभाव, उच्चनीच भावना, स्वार्थांधता इत्यादी गोष्टीशीच त्यांचे वैर होते, कोणत्याही पंथ-पक्ष वा देशधर्माशी नव्हे, ते स्वतःला जन्मभर विद्यार्थी समजत असत व नवनव्या प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहून नवे उपाय शोधू लागत. भारतीयांनी मरण्याची तयार करून अन्याय निवारण्यासाठी सज्ज असले पाहिजे, निर्भयपणाने व नीतिधैर्याने असत्याचा कडा विरोध केला पाहिजे. हा त्यांच्या बीजमंत्र[१] होता.

पूज्य महात्माजींच्या अहिंसेत व उपवासादी साधनांत जगाला जागविण्याची शक्ती होती, त्यांच्या हास्यांत मोठमोठ्या मुत्सद्यांचे चातुर्य बारगळुन जात होते, त्यांच्या आवाजांत शेकडो वर्षापासून लढत आलेल्या शेरांना[२] एकत्र खेळविण्याची ताकत होती आणि त्यांच्या नग्न दुबळ्या देहांत ॲटमबाम्बने सुसज्जित अशा महान साम्राज्याला थरारून टाकण्याचे सामर्थ्य होते. त्यांची दूरदृष्टी मोठमोठ्या नेत्यांना स्वतःच्या मतावर वळवू शकत होती, त्यांचे आकर्षण राजे-महाराजांना देखील भंग्यांच्या झोपडीत आणून बसवीत होते; आणि एका सामान्य हरिजन खेड्यापासून तो राजपुत्रासारख्या धनवंतापर्यंत सर्वांना देशसेवेच्या समभूमीवर आणून 'कुर्बान'[३] होण्यास शिकविण्याची कला त्यांनाच अवगत होती.

त्यांनी आपल्या जीवनाद्वारे सत्याची पूजा, मानवधर्माचा प्रचार व परतंत्र राष्ट्राची जास्तीत जास्त उन्नति केली व दलित समाजांना वर उठविले;

---

१. मूलतत्व २. शत्रूंना ३. जीवदान

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आणि त्यांच्या मृत्यूने देखील, जातीयतेचे जहर किती भयानक असते व आजही आपल्या राष्ट्रांत कोणत्या प्रमाणांत ते छपून बसले आहे हे दाखवून दिले. एक अध्यात्मपरायण पुरुष देशाच्या उद्धारासाठी काय करू शकतो, याचा देखील आदर्श महात्माजींच्या जीवनाने आपणासमोर ठेवला. हे सर्व काही खरे असले तरी, केवळ त्या व्यक्तीचा गुणगौरव व नामघोष करूनच आज आमचे प्रश्न सुटू शकतील ही कल्पना फोल[१] आहे. आम्ही जास्तीत जास्त प्रयत्नांनी त्यांच्यासारखे स्वत: आदर्श बनण्याचा व आजच्या राष्ट्रापुढील बिकट प्रश्न जागृत दृष्टीने सोडविण्याचा प्रयत्न करू तरच त्यांचे आम्ही खरे अनुयायी म्हटले जाऊं.

घोष पुरे करा व नवा मार्ग धरा !!

सज्जनांनो ! याचा अर्थ हाच नाही का, की-मागे होऊन गेलेल्या कार्यशाली पुरुषांहून पुढील कार्याची पाऊलवाट जर आज आम्ही चालू लागूं, अर्थात मागील माणसापेक्षा काळानुसार बदलणारी सर्व गोष्टीची मूल्ये लक्षांत घेऊन आज आम्ही पायंडा चमकवूं तरच जगांत आम्हाला काहीतरी जीवंत कार्य करता येईल. त्याशिवाय जग कुणालाही किंमत देईल असे मला वाटत नाही. मग थोरामोठ्यांच्या नावांचा उपयोग करून घेऊन आजच्या कार्यकर्त्यांनी तरी "बाप के नामपर लडका बडा" असे 'लेबल' आपल्या कपाळी कां लावून घ्यावे? बुद्धिवादी म्हणविणाऱ्या आजच्या सुबुद्ध लोकांनी सांप्रदायिकतेच्या आहारी जाऊन प्रगतीचा प्रवाह का खुंटवून टाकावा? स्वत: गांधीजीनाही जर ठराविक साच्याचा 'वाद' न बदलणारे आग्रही मत किंवा व्यक्तिपूजन सांप्रदायिकत्व पूर्ण अमान्य होते, तर त्यांच्याच नांवावर आम्ही ह्या गोष्टी दृढ करून राष्ट्राची पावले मागे कां ओढावी?

मित्रांनो! आपण सर्वच जण जाणतो आहोत की, जगाच्या सामाजिक व्यवस्थेचे चक्र आज क्षणाक्षणाला आकाश-पाताळाइतके अंतर कापीत चालले आहे आणि ते क्रांतीचा आवाज करीत सारखे वर वर जाऊ लागले आहे. काळाची ही गति लक्षात घेऊन कित्येक जागृत सज्जन कष्ट सोसून त्याला हातभार लावीत आहेत. असे असता, आमच्या इतर कार्यकर्त्यांनी निष्क्रियतेने त्यांना असे म्हणणे उचित आहे काय की- "अरे, काय होतयं तुमच्याकडनं? आमच्या गांधीजींची कमाई फार मोठी आहे!" मी म्हणतो-ठीक आहे ते, पण ही कमाई किती दिवस पुरणार बाबा? नुसत्या एखाद्या व्यक्तीच्या पुण्याईनेच आता सर्वांचा उद्धार[२] होईल की काय? प्रत्यक्ष गांधीजीनाही जिथे आपली

---

१. व्यर्थ, खोटी २. विकास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शक्ती वेळोवेळी जनसेवेच्या कसोटीवर उजळ करून घ्यावी लागली, तिथे मग इतर लोकांचं फक्त नांवानेच कसे भागणार? उगीच ''माझं ते सोनं व दुसऱ्यांच ते लोखंड'' असे म्हणण्यात काय अर्थ आहे?

सेवेने क्रांती करा वा वाटेतून बाजूस सरा !

बंधूंनो ! ही खरीखुरी समाज-क्रांतीची वेळ आहे. या काळात लोकप्रियता संपादन करण्यासाठी नुसता थोरामोठयांचा जयघोष, दिखाऊ कामकाज किंवा पाताळयंत्री कारवाया करण्याऐवजी, प्रामाणिक जनसेवा व सार्वत्रिक जागृती जर तुम्ही करणार नसाल तर तुमची सत्ता व तुमचा पुढारीपणा झर्रकन हवेच्या लाटेसारखा उडून जाईल आणि खाडकन् डोळे उघडतील. वाटेलं की-'' काय नि कसं झालं हे!'' पण मग काय उपयोग? यासाठी तुम्हांला आजच इमानेइतबारे[१] जनतेचे प्रश्न सोडविले पाहिजे; आणि आता नव्या काळाबरोबर पुढे जाण्यासाठी तुमची गात्रेच[२] जर ढिली झाली असतील तर मार्ग अडवून ठेवण्याचे तरी बंद केले पाहिजे. ''आमच्याशिवाय समाजाला कोण वाली आहे'' म्हणून स्वतःच फुशारकी मिरवून हे रस्ते तरी कां अडवून ठेवता? मागील शक्तीच्या वा व्यक्तीच्या भरंवशावर जगणाऱ्या सर्वच लोकांना असे माझे स्पष्ट सांगणे आहे, मग ते गांधीभक्त असोत की अन्य पंथवादी असोत.

महात्माजींच्या अनुयायांनाच नव्हे तर अनेक पंथांच्या, संप्रदायांच्या, जातीधर्माच्या व पक्षोपक्षांच्या लोकांना क्रांतिकालाकडे दृष्टी ठेवून लोकहितासाठी कार्य करण्याची मी ही जी विनंती करीत आहे, त्याचे कारण असे आहे की, आजचा समाज अनेक आपत्तीनी गांजला जात असूनही आमचे हे लोक आपल्याच तंद्रीत मग्न आहेत. लोकांना कॉलरा झाला तरी ते खोकल्याचेच औषध त्यांना पाजीत आहेत आणि आपले पुढारीपण टिकविण्यासाठी थोरामोठ्यांची नांवे उपयोगात आणीत आहेत.मी प्रत्यक्ष पाहतो की आज समाजांत अशांती, अनैतिकता, अविश्वास, अत्याचार व प्रलोभनासक्ती आदी गोष्टी अशा थराला जाऊन पोहोचल्या आहेत की ज्यामुळे दुनिया पाशवी शक्तीच्या हातून भस्मसात होऊन जाईल! एखादा महापुरुष आपल्या दैवी शक्तीने निःस्वार्थी प्रचारकांकरवी जनतेचा स्वभाव-पालट करू शकल्यास गोष्ट वेगळी. अशा स्थितीत आमचे सर्व नेते व भक्त जर आपल्यापुरतेच पाहतील आणि उन्नतीच्या कार्यात अडथळे आणतील तर जगाच्या नाशाचे पापभागी[३] तेच ठरणार नाहीत का?

---

१. प्रामाणिकपणे २. शरीर अवयव ३. पापाचे भागीदार

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धर्मप्राण भारताला 'लाल' होऊ देणार काय?

मित्रांनो ! आजचा मानवसमाज हा पाशवी व आसुरी जीवनाच्या सीमेपर्यंत पाहोचून सर्वांचा नाश करू पाहात आहे. त्याला आळा घालण्याची तयारी जर आमचे सूज्ञ व सहृदय लोक आणि नि:स्वार्थी सेवाभावी प्रचारक करू लागतील तरच हा आत्मघातकी अध:पात थांबणे शक्य आहे व आमच्या महापुरुषांच्या हृदयाला याच मार्गाने खरे समाधान लाभणार आहे. यासाठीच मी आपणा सर्वांशी एवढ्या सलगीने[१] बोलत आहे; कारण साधारण जनतेला आजच्या या बजबजपुरीत उभे राहून आपले स्पष्ट विचार मांडण्याची मनोधीरता, आस्था किंवा शक्यता सुद्धा उरलेली मला दिसत नाही. ते हवालदिल आणि निराश झाले आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्या हृदयात चीड घुमसू लागली आहे. रोग असाध्यतेपर्यंत पोहोचला नसला तरी त्या मार्गाला लागलेला आहे. यामधून जनक्रांती होणार हे निश्चित आहे; मग या क्रांतीत ज्या वृत्तीच्या लोकांचा जनतेला सक्रिय पाठिंबा लाभेल तिकडेच आमचा भारतदेश स्वाभाविकपणेच झुकेल. या भारताला तुम्ही आधार देणार नसला तर त्याला चुकीच्या मार्गावर जाऊ देण्याचे पाप सर्वस्वी तुमच्याच मस्तकी राहणार आहे.

बंधुंनो ! तुम्हाला जर सत्य धर्माचे, उज्ज्वल मानवतेचे, सत्य-अहिंसेचे व ईश्वरी मार्गाचे महत्व जनतेच्या हृदयावर वज्रलेप होऊन राहावे असे वाटत असेल तर आपल्या कर्तव्याने जनतेचे जीवन सुखी व उन्नत करणारी तशी कामगिरी सर्वांसमोर ठेवून मगच त्या पवित्र गोष्टीचा गौरव, मागील थोरामोठ्यांचे संदेश नि नामघोष लोकांसमोर मांडले पाहिजेत. अर्थात् आपल्या आजच्या प्रामाणिक सेवेनेच तुम्हांला आपल्या थोर पुरुषांचे विचार व अपेक्षा फलद्रूप करुन दाखविता आल्या पाहिजेत.

सन्मार्गाच्या शिलेदारांनो, संघटित व्हा !

मित्रांनो ! सत्कर्तव्य करणारांची वेगळी अशी जात किंवा पंथ, पक्ष व धर्म असत नाही. त्यांची उपज शीलसंवर्धनातून, अंत:करणाच्या ओलाव्यातून व राष्ट्रीयतेच्या-मानवतेच्या जिव्हाळ्यातूनच होत असते. याला कोणतेही नाव द्या, पण हीच मनोवृत्ती जगाला जीवन देणारी असते, सर्वांहून श्रेष्ठ ठरते. समाजाच्या आघाताकडे निराग्रही[२] दृष्टीने निरखून पाहण्यात व स्वतंत्र संस्कारातच या वृत्तीचा उगम असतो. या पवित्र सेवाधर्माला सत्य आचरणाची फार गरज लागते. हृदयाच्या पावित्र्याचा अभ्यास लागतो व सरळ सात्त्विक स्वभावाची जोड असावी लागते. खरे पाहता हेच सर्व धर्माचे इंगीत आहे, सर्व थोर लोकांचे उद्दिष्ट आहे,

१. अत्यंत आपुलकीने २. निर्मळ

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ईश्वरप्रसन्नतेची कसोटी[1] आहे व खऱ्या लोकप्रियतेचा राजमार्ग आहे ! म्हणूनच मी पुनःपुन्हा आपणाला सांगत आहे की, सन्मार्गाच्या शिलेदारांनो, पवित्र हृदयाच्या लोकांना, जनतेचे कल्याण व राष्ट्राचे हित करू इच्छिणाऱ्या सज्जनांनो या ! आपण भारताच्या खऱ्या नवनिर्मितीचा पाया घालू, संघटितपणे पूज्य गांधीजींची आवडती सामुदायिक प्रार्थना करून सर्वांच्या हृदयात ईश्वरी तेज जागवूं आणि आपली इतिकर्तव्यता ईशसेवेच्या व देशसेवेच्या प्रवाहात समरस करून टाकू !

(श्रीगुरुदेव, जानेवारी-फेब्रुवारी १९५१ पृ. क्र. ३-५) ✣ ✣ ✣

स्फुट लेखन- जसेच्या तसे राहिले टोळगोटे

(भुजंगप्रयात)

वरी राम बांधोनिया सेतू गेला।
सवे घेऊनी भक्तीने मारुतीला॥
महत्वे शिरी वाही पाषाण खोटे।
जसेच्या तसे राहिले टोळगोटे॥

प्रभू जाति तो बैसले पंकि खाली।
अजूनी तयां उंच ना बुद्धी आली॥
प्रसंगी जरी मानिले लोकी मोठे।
जसेच्या तसे राहिले टोळगोटे॥

तसेची प्रसंगी महामूर्ख तेही।
धरोनी वरी आणिती श्रेष्ठ पाही॥
परी वेळ गेल्या उरावे नरोटे।
जसेच्या तसे राहिले टोळगोटे॥

महा क्रांतीकर्त्या प्रभू कृष्णनाथे।
गबाळांसही थोर केले स्वहाते॥
तयामागुती यादवी घोर थाटे।
जसेच्या तसे राहिले टोळगोटे॥

सदा उच्च व्हावे असे ज्यास भावे।
तयाने स्वयें लोकसेवे झिजावे॥
स्वकष्टाविना प्रेम ना शक्ती साठे।
जसेच्या तसे राहिले टोळगोटे॥

स्वतःच्या परीने बघावे जगाला।
तरी लोकही मान देती तयाला॥
जरी गर्व अंगी, तरी द्रोह दाटे।
जतेच्या तसे राहिले टोळगोटे॥

उगाची कुणाच्या सवे राहुनीया।
महामूर्ख ते इच्छिती मान व्हाया॥
कधीही परी ना टिके, ओस वाटे॥
जसेच्या तसे राहिले टोळगोटे॥

म्हणोनी आम्ही सांगतो मानवाला।
कुणाचा उगाची भरोसा कशाला॥
म्हणे दास तुकड्या, धरा लक्ष्य मोठे॥
जसेच्या तसे राहिले टोळगोटे।

- तुकड्यादास

(श्रीगुरुदेव, ऑगस्ट १९५० पृ. क्र. १) ✣ ✣ ✣

---

१. परीक्षा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१४. ही संतसंमेलने राष्ट्रहितासाठी आहेत काय?

(साधुसंतांची संमेलन घेत असतांना देशाच्या भवितव्याचा विचार करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक साधुपुरुषाने काही खेडी दत्तक घेवून आदर्श करून दाखविली पाहिजेत, ती जिम्मेदारी स्वतः घेवून मानव्यतेचा उपदेश केला पाहिजे असे प्रस्तुत लेखात वं. राष्ट्रसंत साधुपुरुषांना सांगत आहेत –संपादक)

संतांच्या अनुयायांकडून जनतेची लूट

आमच्या देशाने संतांवर एक मोठी जिम्मेदारी[१] परंपरेने सोपवून ठेवली आहे. ती म्हणजे, जनलोक नीतितत्वाने वागवावे, परस्परात बंधुभावना वाढविण्याचा प्रयत्न करावा व देवाच्या नावांची साधना धरून देशाचे भवितव्य उज्ज्वल करीत राहावे; हेच त्यांचे काम. मागील संतांच्या जीवनावरून हेच स्पष्ट दिसते. ह्याकरिता त्यांनी भारताच्या चौफेर कोनाकोपऱ्यांत कुंभमेळे, तीर्थस्थाने, यात्रा, सप्ताह भरविण्याचा प्रयत्न केला. कदाचित् त्यापासून काही काळपर्यंत संतांना तसा लाभही मिळाला असेल; पण आज मात्र ती साधने व त्यांचे जगणे देशाला उज्ज्वल करणारे दिसत नाही, हे धर्मवान पण मेलेल्यां मनोवृत्तीचा नसेल असा कोणीही माणूस कबूल करू शकेल. त्यांची साधने सध्या माझ्यासारख्या काही मोजक्या माणसांना धष्टपृष्ट करणारी आहेत व त्याद्वारा मिळणारा पैसा त्यांच्या व्यक्तित्वाच्या बडेजावाकरिताच[२] खर्च होत आहे, हे लपवून चालणार नाही. यज्ञांची, सप्ताहांची, पुराणांची, नवीन देव निघाला त्या निमित्ताने वर्गणी मागण्याची व त्यातून प्रचंड देवळे उभारण्यासाठी मुबलक पैसा खर्च टाकण्याची प्रथा अजूनही बंद झालेली नाही. ती चाललेली आहे, मात्र त्याचा उपयोग आजच्या नवनिर्मितीच्या कार्याला होत नाही; संतपरंपरेला शोभत नाही.

बुवाशाही बंद करून ग्रामसेवक बना

तेव्हा, एक तर या साधुसंमेलनांना देशाच्या भवितव्यदुरुस्तीचे स्वरूप तरी देता आले पाहिजे, नाहीपेक्षा ही संमलने व विशेषतः साधूंच्या नावांची संमेलने तरी जनतेने बंद करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'जाऊं दे, आपणाला काय त्याचे' असे म्हणून भागणार नाहीं, देशांतील प्रत्येक माणूस आता देशोन्नतीला जबाबदार होणे आवश्यक आहे. संमेलने भरवून ज्या लोकांवर आपण जगतो त्यांचे कल्याणाचा व आज आपला देश ज्या मार्गांनी पुढे न्यावयाचा असेल त्या

१. जबाबदारी २. मोठेपणासाठी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मार्गाचाच विचार जनतेच्या व संमेलनाच्या भावनेत भरलेला असला पाहिजे; नाहीपेक्षा ही प्रथा यापुढे देशांत अधिक काळ टिकवली जाऊ नये हेच उत्तम !

धर्म ही काही वेडगळ वस्तु नव्हे की जी राष्ट्रभक्ती पासून दूर सारून माणसाला निष्क्रिय करीत राहील. असे असते तर आमच्या सर्व देव-देवतांनी देशाचा भारच[१] आजवर सांभाळला नसता. तेव्हा यापुढे तरी उत्सव, यज्ञ, संमेलन यांना तात्त्विक स्वरूप आलेच पाहिजे असे मला वाटते. मी तर म्हणेन की, आमच्या भारतांतील साधु, म्हणविणाऱ्या प्रत्येक साधकाने काही खेडी, गावे घेऊन ती आदर्श करून दाखविण्याची व तेथील जनतेत सहकारी वृत्तीने वागून त्यांच्यात राष्ट्र-धर्मभावना उज्ज्वल करावयाची जिम्मेदारी स्वत:घेतली पाहिजे व देशांतील अनेक भेद मिटवून त्यांना मानव्यतेचा व सर्व देवऐक्याचा उपदेश करून सारी जनता स्वावलंबी बनविली पाहिजे. हेच कार्य त्यांना आज तरी भूषणावह आहे असे मला वाटते.

राष्ट्रकारण व संत

मित्रांनो ! आपल्या देशांतील जनतेचा नैतिक दर्जा व त्यांच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग आजपर्यंत वेळोवेळी झालेल्या साधुसंतांनी व 'अवतारी' म्हणविल्या गेलेल्या परंपरेतील लोकांना आज चालू राजकारणाशी संबंध ठेवावयाचा नसला तरी, राष्ट्रीय जीवनातील महत्वाचा भाग बंधुप्रेम व राजकीय जीवनाच्या दुरुस्तीसाठी समाजाची हृदयशुद्धी उज्ज्वल लोकशिक्षण; ह्या गोष्टी मात्र संतांच्या कार्यक्षेत्रांतच येणाऱ्या आहेत. प्राचीन साधुसंतांच्या अभंगवाणीवरून आणि अवतारचरित्रांवरून देखील हे आढळून येते. परंतु दुर्दैवाने त्याच महापुरुषांच्या नावावर जगणाऱ्या आजच्या बुवालोकांच्या कार्यास मात्र पंथांच्या व व्यक्तिस्वार्थाच्या चढाओढीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पक्षोपक्षात व जातीजातीतही असे झाले आहे आणि अनेक संघटना एकवल्ली[२] बनल्या आहेत हे खरे; परंतु तेच विष साधुसंतानुयायात तरी पसरायला नको होते. उलट जनतेतील हा भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी एकमताने पुढे येणे जरूरीचे होते. अशा ऐक्यासाठी व लोकशिक्षणासाठीच पूर्वी संतमेळे व यज्ञयाग होत; जतनेचे दु:खी जीवन सुखी करण्यासाठी देवसभा व संत-संमेलने भरत. आज देखील त्यांना व्यक्तिगौरवाचे नि लाडूपुरी व दानदक्षिणेच्या शौकाचे स्वरूप येऊ नये, अशी माझी हार्दिक इच्छा आहे.

मठमंदिरांची मालमत्ता लोककार्यात लावा

आमचा भारतदेश अजूनही धर्मभोळा आहे. कीर्तन, भजन म्हटले की लोक आपल्या सुखदु:खांचे भान विसरून 'देवाच्या आशीर्वादाने सर्व काही ठीक

१. ओझे, जबाबदारी २. एकाच्याच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

होईल' म्हणून थंडीउन्हांत कुडकुडत बुवांच्या नादी लागलेले दिसतात. अशा प्रसंगी बुवाना त्यांच्या हिताचे मार्गदर्शन करता आले तर बरे, नाही तर 'ये रे माझ्या मागल्या' याप्रमाणेच व्हावयाचे ! हा प्रकार आजपर्यंत कितीतरी वर्षे आमच्या भारत देशाने सहन केलेला आहे. परंतु सूक्ष्म निरीक्षण करतांना दिसून येईल की, लोक तात्त्विकतेला आज आंचवले आहेत,[१] उन्नतीऐवजी त्यांचे जीवन गर्तेत गेले आहे आणि तशांत त्यांच्याजवळ मुलाबाळांच्या शिक्षणालाच नव्हे तर पोषणाकरिता देखील पैसा उरलेला नाही; अशा स्थितीत त्यांची अशीच दिशाभूल व पिळवणूक चालली तर आमच्या पूर्व संतपरंपरेला तो महान कलंकच नाही का लागणार? उलट, संतमहंतांना मागे जनतेने सद्भावाने व विश्वासाने दिलेल्या मठमंदिराच्या मालमत्तेशीच लोकशिक्षणाचे उपयुक्त मार्ग जर जोडले गेले तर त्या संपत्तीचा केवढा तरी उत्तम विनियोग झाल्यासारखा होईल, असे मला वाटते.

उद्या सरकारचे लक्ष या बाजूकडे जाऊन, कायदे करून देवळे, मंदिरे व मालमत्ता जबरीने संग्रहित केली जाण्यापेक्षा, आजच देशभावनेने प्रेरित होऊन या मालमत्तेला लोकशिक्षणाचे साधन बनवून जनता सुबुद्धतेच्या मार्गाला वळविल्यास केवढा तरी फायदा होऊं शकेल; खरा धर्म व कर्तव्याचा आदर्श लोकांपुढे राहील व जनता धर्मभावना सक्रियतेने पाळील.

याची जाणीव संतमहंतांना म्हणजे परंपरेने पंथ चालवणाऱ्यांना होवो व त्यांच्या उज्ज्वल प्रयत्नांनी देशाला सुबुद्धतेचे फळ लाभो, एवढीच माझी भगवंतास व साधुसंताना प्रार्थना आहे.

(श्रीगुरुदेव, मार्च १९५१ पृ. क्र. ४-५)

- सुविचार -

✤ साधुपुरुषांच्या अनेक रंगांनी भरलेल्या वाक्यांतून आपल्याच अधिकारानुरुप रंगाचे महत्वाचे बोल एकतान लक्षाने निवडून घेऊन त्यायोगे स्थिर होतात, तेच पुरुष सत्संगाधिकारी असतात.

✤ संतसंगाची महती व्यक्तित्वावर अधिष्ठित नसून ती सदाचार नि सद्वृत्तीवरच अवलंबून असते असे समजून साधुजनांवर प्रेम करणारे पुरुषच सत्संगाधिकारी असतात.

- तुकड्यादास

१. दूर गेले आहेत, विसरले आहेत.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१५. तो परमात्मा दशांगुले उरला !

(वं. राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज हे आध्यात्मिक क्षेत्रातील स्वयंप्रकाशित महात्मे होते. त्यांचा परमात्मा स्थावर जंगम व्यापुनही शिल्लकच उरलेला होता. त्या सर्वसाक्षी परमेश्वराचे स्वरूप कसे आहे याचे विवेचन खालील अध्यात्मचर्चेवरून दिसून येते. १९३६ साली अमरावतीपासून ७/८ मैलावर असलेल्या गणोजा या गावी पाटलाच्या वाड्यात काही शास्त्री व वैष्णव यांच्यात ही चर्चा झालेली होती. वं. महाराजांचे सद्‌भक्त व थोर साहित्यिक श्री सुदामजी सावरकर यांनी स्वतः लिपीबद्ध करून ही चर्चा श्रीगुरुदेव मासिकाच्या (एप्रिल १९५१) अंकात प्रकाशित केली होती. तोच लेख येथे देत आहोत. – संपादक)

शास्त्री-''अत्यतिष्ठदशांगुलम्''[१] किंवा ''भूवर तेज समीर स्व रविशशि काष्ठादिकी असे भरला। स्थावर जंगम व्यापुनि तो परमात्मा दशांगुले उरला'' याच वचनावर माझी शंका आहे. स्थावर-जंगम सर्व वस्तूंत, आकाशांत सुद्धा तो भरला हे म्हटल्यांवर,'उरला' तोहि 'दशांगुले'- हा काय घोटाळा आहे?

महाराज-हाँ, घोटाळा तर दिसतो खराच; परंतु मला वाटतं, त्याचा वरवर दिसतो तेवढा साधा अर्थ नसावा 'दशांगुले' हा शब्द मर्यादा दाखविणारा नसून अनंतत्व दाखविणारा आहे, असं मला वाटतं, परमात्मा जर परिपूर्णरूप आहे तर त्याला अंगुळांचं मोजमाप काय उपयोगाचं? आणि मापली जाणारी मर्यादित वस्तु ही उत्पत्ति-विनाशयुक्त अशी विकारीच असावयाची. शिवाय दृश्य[२] व जड वस्तूंचंच मोजमाप व्हावयाचं नि माप घेणारा हा त्याशिवाय वेगळा व चेतन असावयाचा. परंतु अस मानलं की ब्रह्माला उत्पत्तिविनाशयुक्त, दृश्य जड वगैरे म्हणावं लागेल व हे तर सर्वथैव[३] चुकीचं आहे.

चोपून-चोपून पांढरा फेटा बांधलेले सफेद वैष्णवसाधु म्हणाले- मग काय अर्थ करावा?

महाराज- अर्थ एवढाच की ' दशांगुले' हा शब्द सूचक आहे. त्याचा लक्ष्यार्थ 'अनंत' हाच आहे. म्हणजे एकंदरीत 'उरला' एवढंच त्या वचनाद्वारे त्यांना सांगावयाचं होतं. पंचमहाभूतं, तीन गुण व मूळ प्रकृति आणि पुरुष या दहांच्या

---

१. सहस्त्रशीर्षा पुरुषः सहस्त्राक्षः सहस्त्रपात्
स भूमिं विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठदशांगुलम्-ऋग्वेद २.दिसणारी ३. संपूर्णतः

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पलिकडे दाही दिशांनी उरलाच आहे, हाच त्याचा भावार्थ !

शास्त्री-वाह ! फार उत्तम !

दुसरा वैष्णव- पण महाराज ! परमात्मा परिपूर्ण असतांना तो भरला कसा अन् उरला कसा? यामुळं त्याला विकारी म्हणावं लागेल?

महाराज- भरणे व उरणं ही सर्व परोक्षभाषा आहे. पाणी एखाद्या भांड्यांत भरून उरणं, असा काही प्रकार इथं नाही. घट ज्या ठायी तयार केला तिथं आकाश आधीच होतं. फक्त घटाच्या उपाधीमुळं[१] घटात भरलेले हे घटाकाश व उरलेलं ते महदाकाश, असा उगीच कल्पित शब्दप्रयोग केला जातो. परमात्मा सर्वकाळ संपूर्णच आहे. त्यांत जग झालंसं, भासलं म्हणून भरला व उरला हा शब्दप्रयोग निर्माण झाला. वास्तविक जगाची उपाधि मुळांतच मिथ्या असल्यामुळं हा शब्दप्रयोगही ठरणार.

वृद्ध सत्पुरुष- बापजी! शास्त्रोंने तो कहा है कि 'सब कुछ परमात्माही है'-'सर्वे स्वस्विंद ब्रह्म'- तो 'सब' को मिथ्या कैसे कहा जाय? और यदि वही सबकुछ' है तो 'भरा-उरा' कौन और किसमें? प्रश्न मे गलती हो तो माफ कीजियेगा।

महाराज-हाँ, प्रश्न तो बहुत ठीक है और कुछ कुछ उत्तर भी पहलेही आ चुका है। अच्छा सुनिये। 'सब कुछ परमात्माही है' इसका मतलब 'सबभी है' और परमात्माभी है'- ऐसा तो नही है न? अगर वही सबकुछ है तो फिर 'सब, रहाही कहाँ? केवलमात्र 'वही' है, 'सब' का पताही नही। यह बात आपके ख्यालमें आगयी।

वृद्ध- हाँ जी !

महाराज- तो फिर 'सब' कहनेमे अगर कोई दूसरा है ही नही, तब तो 'सब' कहनाही छोड देना होगा। इसका सीधा अर्थ होगा-'एक परमात्माही परमात्मा है, सब का पताही नही।' और 'सब का अस्तित्व परमात्मा के अतिरिक्त वहाँ हैही नही, वहाँ फिर उसे 'मिथ्या' कहनेमें क्या आपत्ति है। 'सब' कहना वह केवल भ्रम है, अध्यासमात्र है। 'ब्रह्म सत्यं जग मिथ्या का वही तो भावार्थ है। इसी दृष्टिसे देखनेपर 'भरा और उरा' यह भाषाभी मिथ्या हो यही है। परंतु वैसे कहने का मतलब यह है कि यद्यपि 'सब कुछ' परमात्माही है लेकिन परमात्मा सिर्फ यह 'सब कुछ' ही नही है, उससे परे भी वही है, अनंत और अपार है। कहनाही हो तो ऐसा कहा जा सकता है कि'सब कुछ' यह परमात्मा का अंशमात्र

---

१. नावामुळे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

है। अर्थात सब कुछ मेंही परमात्मा को मर्यादित करना या समझना ठीक नही होगा। इसीलिये 'सबमें भरा और? उससे परे भी उरा' ऐसा शब्दप्रयोग मिथ्याचं करना संभव है।

परमात्मासे जुदा 'सब' नही है करके परमात्माही 'सब' और 'सब' से जुदा उसका अमर्याद रूप 'जरा' ऐसा कहा जाता है। वास्तव में वहाँ 'सब' यह भाषाही टूट गयी वहाँ भरा किसमें और उरा कहाँ? जहाँ द्वैत[१] का पता नही वहाँ तो एकभी शब्द लग नही रह सकता। ''क्या कहिये कहते न बने कछु जो कहिये कहतेही लजैये'' यह सुन्दरदासजी का कहनाही आखिर सत्य है!

वृद्ध-(हात जोडून सद्गदितपणे) धन्य है बापजी! धन्य है !! क्षणभर सर्वत्र नीरव शांतता पसरली. नंतर शास्त्री म्हणाले- महाराज! मग भरला अन् उरला म्हणणं हा केवळ शब्दवाद किंवा दृष्टिभेदच म्हणावा लागेल, नाही का?

महाराज- होय तर. वास्तविक परमात्मस्वरूपाच्या ठिकाणी या गोष्टीची काहीच जाणीव नाही. हा केवल अलिकडचा म्हणजे पाहणाराचाच नुसता भाव आहे. सूर्याच्या गावी रात्र अन् दिवस हा साक्षेप शब्दवाद अगदीच नाही. तसंच ब्रह्माच्या स्वरूप-साम्राज्यात जिथं दुसरी म्हणून काही उपाधीच नाही, तिथं भरला नि उरला हे म्हणणं व्यर्थच ठरणार! याचा स्पर्शही त्या रूपाला लागूं शकत नाही. पाणी बर्फात भरलं आहे आणि त्याशिवाय उरलं आहे, ही व्यावहारिक भाषा झाली. बर्फ म्हणून काही नाहीच, तर तेही पाणीच आहे; ही गोष्ट लक्षात आली म्हणजे 'भरलं नि उरलं' ही भाषा कशी राहणार? पण ही गोष्ट यथार्थ[२] दर्शनानंतरच कळू शकते.

एक साधु- प्रण स्वामीजी! ब्रह्मांच यथार्थ दर्शन कसं होणार ?

महाराज- ब्रह्मांच दर्शन म्हणजे त्याचा यथार्थ अनुभव. अनुभवानं समरस झाल्यावरच ब्रह्मस्थिती कळण्यासारखी आहे. पूर्ण वस्तूला सम्यक् पाहणं म्हणजे स्वतःच पूर्ण होणं होय. अर्थात् अनुभवानं मूळस्वरूपी विरल्यावर त्याला 'भरला नि उरला' हे तरी कुठून राहील?

''जब आशिकपर आशिक वह सनम होता है।
तब दोनोंका रुतवा एकी रकम होता है!।''
''नानक[३] लीन भयो गोबिंदसँग[४] ज्यों पानी में पानी।।''

-अशा अनुभवस्थितीत 'भरला-उरला' म्हणण्याइतका भेदच कुठं

१. अलग अलग भेदभाव २. सत्य ३. श्रीगुरुदेव नानक ४. श्रीगुरु गोविंदसिंह

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राहतो? वास्तविक 'दर्शन' हा शब्द जसा चुकीचा आहे तसाच 'अनुभव' हा शब्द सुद्धा अपुराच आहे. अनुभव म्हटला तरी तो त्रिपुटीमयच असणार, पण स्वरूपस्थितीत तर त्रिपुटीचा पत्ता नसतो.

दुसरा वैष्णव- मग त्या स्थितीत भरपूर आनंदच आनंद अनुभवाय येतो, नाही का?

शास्त्री- वाहवा! 'आनंद ब्रह्म'! अहो, आनंद तर लाभलाच पाहिजे त्याला. का महाराज?

महाराज- पण माझं मत काहीसं वेगळं आहे. "आनंद उसको भासता आनंदसे जो दूर है।" द्वैतपणांतच विशेष आनंद असतो. जिथं आनंद घेणारच आनंद होऊन बसतो, वेगळा उरतच नाही, तिथं वेगळा आनंद कसला नि तो कोणाच्या अनुभवास येणार? "आनंद के घर वह गया, आनंद का नहि भान है।" जो आनंदरूप झाला त्याला आनंद 'आनंदपणा' नं कसा राहील? अग्नीला उष्णता कशी जाणवेल? साखरेला गोडी कशी भासेल? अर्थात् जोपर्यंत आनंद प्रत्ययास येत आहे तोपर्यंत सूक्ष्म त्रिपुटी तिथं आहेच. मायेचा सूक्ष्म भास तिथं असतोच.

शास्त्री-महाराज! आनंद हे तर ब्रह्मांच स्वरूप लक्षण, तिथं माया कोठून असणार?

महाराज- आनंद हे ब्रह्मलक्षण असलं तरी ते अनुभवास येणं हे प्रकृतीच्या संबंधाशिवाय कसं शक्य आहे? तसं पाहिलं तर विषयानंद देखील ब्रह्मानंदाचाच अंश आहे, पण तो प्रकृतीद्वारेच प्रगटतो किंवा भोगला जातो की नाही? आनंदमय कोशही असू शकतो ना?

वैष्णव- पण निर्विषय निर्विकल्प आनंदाची प्रतीति तर इंद्रियादिकांशिवायच होते ना?

महाराज- हे खरं, पण इंद्रियसंघात म्हणजेच काही प्रकृती नव्हे; तिची अनेक रूपं आहेत. इंद्रियसंघात हा प्रकृतीचा विशेष जड भाग; म्हणून त्याद्वारे व्यक्त होणारा आनंद तितकाच खालच्या दर्जाचा समजला जातो. निर्विकल्प आनंद उच्च खरा, पण वृत्तीचा सूक्ष्म पडदा असल्याशिवाय तो सुद्धा चाखतां येणार नाही. साखर होऊन काही गोडी घेता येत नाही गोडी घेणारा हा वेगळा असलाच पाहिजे. अन् भेद आहे किंवा आनंदमय वृत्ती आहे, तर ती प्रकृतीच नव्हे तर काय?

तिसरा वृद्धवैष्णव अगदी पहिल्यानेच एकदम उद्गारला-बरोबर आहे! अर्जुन एकदम ब्रह्मरुप होऊन जाऊ नये तसं झाल्यास आपण कोणाशी गुजगोष्टी बोलाव्या असं वाटून आणि त्याला रुचि तर लागली पाहिजे या भावनेनं भगवान् श्रीकृष्णानं अर्जुनाला अनुभव देतांना 'सपातळ आडलावणे'[1] लावल्याचा उल्लेख ज्ञानेश्वरीत आला आहे. मला वाटतं, हीच ती स्थिती. नाही महाराज?

---

१. ज्ञानेश्वरी अ.६ ओवी ११४

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

महाराज-ठीक, बहुत ठीक! अर्थात् हा पडदा म्हणजे शुद्ध प्रकृतीच, ज्ञानमय-वृत्तिच असणार.

शास्त्री-'रसास्वाद' हाच ना महाराज.

महाराज- (हसत) शास्त्रांत काय नांव दिलं ते आपणच आम्हाला सांगितलं पाहिजे, नाही का? (शास्त्री हसतात) ठीक आहे. मला वाटतं की 'रसास्वाद' हाच असावा. कारण, आनंदाचा स्वादच तर इथं घेतला जातो.

वैष्णव-पण त्याला 'विघ्न' म्हटलं आहे समाधीच; अन् आपण देखील याला 'माया' म्हणता. अर्थात् ही माया आहे तर ती बाधणारच.

महाराज-समरसता किंवा तादात्म्यता म्हणजे अगदी पूर्णस्थिती या दृष्टीनं पाहिल्यास त्याला कदाचित् विघ्न म्हणता येईल. वास्तविक ते विघ्न नसून अपक्कता मात्र आहे. पुढं पक्कता झाली की पूर्णता झालीच! अधेमधेच थांबून बसेल त्यालाच ते विघ्न ठरेल. खरं म्हणजे ही माया असली तरी बाधायची नाही. कारण, इथं अज्ञान नसतं. मायेचं शुद्ध रूप-ज्ञानसंवेदन-हेच असतं नि ते स्वरूपस्थितीला बाधक नसून पोषक आहे. ''ती बुद्धि आत्मयाची प्रभा'' असं ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटलंच आहे. तो स्वानुभवाचाच विशेष भाव असतो-मुक्तीस्थितीचाच प्रकाश असतो.

एक ती शुद्ध स्फूर्ति असेपर्यंत ब्रह्माला ब्रह्मत्व असतं. ही प्रकृति तर तो पुरुष, हा आत्मा तर ती शुद्ध बुद्धि, अशी ही जोडी आहे. ती दीपप्रभेसारखी अगदी अभिन्न असल्यामुळं भेद नाही तर भयही नाही. उलट आपलाच आपण स्वाद घेणं, एवढाच त्याचा अर्थ. ती आनंद-ऊर्मि मावळली तर ब्रह्मत्व किंवा साक्षित्वही मावळणार नि मग केवळ पूर्णताच उरणार !

शास्त्री- आणि ती आहे तोवर ?

महाराज- तोवरही पूर्णताच आहे; पण त्या पूर्णतेचं भान नसणं म्हणजे अज्ञान नि भान होणं म्हणजे ज्ञान. हे ज्ञान आणि अज्ञान- दोन्ही मावळलेच पाहिजेत. भान असणं म्हणजे पूर्णतेत नाविन्यता, विशेषत्व दर्शविणं होय. ''आनंदही जब मिट गया तब हो गया मशहूर है।'' अर्थात् है भान विरायलाच पाहिजे.

वैष्णव-महाराज ! अमृतानुभवात अन् चांगदेवपासष्टीत[१] या स्फूर्तींच्या अभिन्नतेविषयी मोठा बहारीचा खुलासा आला आहे. अगदी आपण म्हणता तसंच पुरुष-प्रकृतीचं ऐक्य दाखवलं आहे त्यांत.

---

१. संत ज्ञानेश्वर लिखीत ग्रंथ

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वृद्ध-बापजी! मेरी थोडी बिनती है कि, वह आनन्द लेनेवाला कौन होता है।?

महाराज- अच्छा ! वास्तवमें वहाँ अज्ञान न होनेकी वजह 'अविद्योपाधि जीव आनन्द लेता' ऐसा तो कह नही सकते। अज्ञान नष्ट होनेपर जीव शिवरूप हो जाता है; अर्थात् 'शिव अपना आनन्द आपही लेता' कहना चाहिये। वास्तवमें वहाँ एक ब्रह्मरूपही रहता है, किन्तु जबतक ज्ञानस्फूर्ति क़ायम है तबतक उसेही शिव का साक्षि कहा जाता है। आनंद लेना ' साक्षि' का स्वभाव है। सारा वैष्णवसंप्रदाय इसी बातपर खडा है। अद्वैतानन्दरूप होकर भी विशेष आनन्द चखना, इसी चीजपर भक्तियोग की रचना है।

वैष्णव- बहोत अच्छा महाराज! तुकाराम महाराज देखील हेच म्हणतात- की 'अभेदू नि भेद राख़ियला अंगी' वाढवाया जगी प्रेम सखा।

वृद्ध - 'साक्षी' यानी क्या बापजी?

महाराज- जो कुछ बाकी, जिसने देखी, उसका आम साखी (साक्षी)- खयाल रखिये, अब हम पहलीही जगहपर वापिस आ रहे है। और आना भी तो है पहलीही जगहपर। अध्यात्म का मतलब आखिर दूसरा क्या है ? 'साक्षि यानी देखनेवाला, जो सबको देखता है और स्वयं अपनेको भी। वस्तुको देखनेवाला वस्तुसे निराला[1] होता है। दृश्य उसकी दृष्टिका विलासमात्र है और वह उसमें भरा हुआ होकर भी द्रष्टारूपसे निराला रहता है। यह निरालापण भी जब मिट जायगा तब तो पूर्णताही रहेगी। "द्रष्टा भी इसलिये कहिये, नही त्तो तू नित नंगा।" द्रष्टा-साक्षि यह नाम भी दृश्यकी अपेक्षासेही दिया जाता है। जहाँ इस दृश्यरूपसे मिथ्या है अर्थात् साक्षि मे पृथक उसका कोई स्वतंत्र अस्तित्व है ही नही, वहाँ फिर साक्षि कौन और किसका? बस, एकमेव पूर्णताही तो है। और वह पूर्णस्वरूप ही अभ्यास के कारण अधिष्ठान (ईश्वर) रुपसे भरा हुआ, अध्यस्त (विश्व) रुप से स्फुरा हुआ और साक्षि (ब्रह्म) रुपसे उरा हुआ प्रतीत होता है। इतना भेद पैदा करनेवाली एक वृत्ती ही है। वृत्तिही का चिदाभास कह सकते है। अध्यस्त और अधिष्ठान निवृत्त दिशामें शेष[2] नही रहते। और यह कि भेद किसी कालमें भी सत्य नहीं है। क्यों कि, जो हैं वह सब उसी एक स्वरूप है, जहाँ दूसरा हैही नही। तो भरा और उरा यह भाषा भी कहाँ लगेगी? क्यों शास्त्रीमहाराज !

शास्त्री- जी हाँ महाराज ! फारच उत्तम ! वाहवा! महाराज- मी तर म्हणतो की भरला आणि उरला ही भाषा वृत्तीच्या आडपडद्यामुळेच वापरली

---

१. वेगळा २. शिल्लक, बाकी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जाते. सारं जग म्हणजे वृत्तीचा विलास, वृत्तीत तोच भरला आहे आणि अधिष्ठानरूपानं तोच उरला आहे. अर्थात् भरलेला व उरलेला पाहायचा झाल्यास तो बाहेर धुंडून मिळायचा नाही. थोडक्यात म्हणजे तो सर्वांत भरला आहे आणि 'भरला आहे' म्हणणारातच उरला आहे. त्या उरलेल्याचा आपल्या ठिकाणी अनुभव घेतला की मग 'भरला व उरला' ही भाषाच मावळून केवळ परिपूर्णताच शिल्लक राहील अन् हेच म्हणावे लागेल की-

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्ण मुदच्यते।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।
अर्थात "पूरा यह पूरा वह, पूरेसे पूरा जचता है।
पूरेमेंसे पूरा लेलो, पूरा बाकी बचता है।।"

इतक्यात भोजनासाठी बोलवायला पाटील[१] आले. आतापर्यंत सर्वत्र पसरलेल्या गंभीर शांततेचा भंग झाला, पण तो अगदी योग्य वेळी. महाराज मंडळीसह उठले. शास्त्री अत्यानंदाने म्हणाले- "आज तर अगदी दिव्य, फारच गोड चर्चा झाली महाराज ! (वैष्णवाकडे पाहून) नाही बुवाजी?

वैष्णव-वाहवा! अध्यात्माचं शिखरच म्हटलं पाहिजे हे ! आज विषयच अगदी पूर्ण तत्वाचा होता.

महाराज- अन् तोही जवळ जवळ पूर्णच झाला. पण आता अपूर्ण असलेल्या पोटांत मात्र पूर्णाहुति दिलेली बरी. पोटात अन्न नसलं तर ब्रह्मचर्चा जागेवरच राहायची. लोकांच्या पोटोबाची सोय नसली तर विठोबाकडे त्यांची दृष्टी लागणार कशी?... आणि लोक-लोक म्हणजे तरी काय हो! या सर्वांच्या रूपानं परमात्माच व्यक्त झाला-सर्वत्र व्यापला आहे ना? तेव्हा या सर्वांची सेवा म्हणजे परमात्मरूपाचीच पूजा नव्हे काय? इतकेच की 'केवळ दृश्य हेच ईश्वराचे रूप' म्हणून मनुष्यानं आपली दृष्टी मर्यादित न होऊ देता, सर्वांपलिकडे 'उरलेलं' मूळ स्वरूप पाहण्याची तयारी ठेवली पाहिजे. तसं झाल्याशिवाय त्याच्या जीवनाची पूर्णता कधीच व्हायची नाही हा सिद्धांत आहे.

(श्रीगुरुदेव, एप्रिल १९५१ पृ. क्र. ३-७) ✣ ✣ ✣

सुविचार

✣ सृष्टीतील प्रत्येक वस्तूत, प्रत्येक कणात, सतत कार्यप्रवृत्ती खेळत आहे. जो निष्क्रीय (कार्यहीन) होऊन फिरेल तो देवाचा आणि समाजाचा गुन्हेगार ठरला जाईल, असा सृष्टीचा कायदा आहे. – तुकड्यादास

---

१. गणोजाचे पाटील

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१६. हे बघा आमच्या जीवन-विकासाचे प्रदर्शन !!

नागपूरच्या 'जीवनविकास-प्रदर्शनी' मध्ये लता मंगेशकर यांच्या कार्यक्रमासाठी एकत्र झालेल्या जनसमुदायांतील कित्येक सुशिक्षितांनी, तो कार्यक्रम वेळीच रहित झाल्याचे ऐकून जी दंगल माजविली, जे किळसवाणे आणि अत्याचारी स्वरूपाचे अमानुष[१] प्रकार केले, त्याबाबत बातमी ऐकून माझ्या हृदयात धडकीच भरली. आमच्या राष्ट्राच्या भावी आधारस्तंभांच्या ह्या अघोरी लीलांचे नि त्यांच्या भावी परिणामांचे जे भयानक दृश्य माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले, त्याचा विचार देखील माझ्याच्याने करवत नाही. गांधीवधानंतर नागपुरात झालेल्या निंद्य प्रकारावर देखील या सुशिक्षितांच्या अध:पतनाने कळस चढविला. कार्यक्रम रहित झाल्याने उत्सुक प्रेक्षकांचा आशाभंग होणे साहजिक होते; त्यामुळे चिडून जाऊन दिवे फोडणे, तारा तोडणे आणि खुर्च्या वगैरेची मोडतोड करणे हे उल्लुपणाचे असले तरी क्षणभर क्षम्य समजता आले असते; परंतु तेथे जमलेल्या शिक्षित महिला व कॉलेजकुमारिकांची अमानुष विटंबना करणे, त्यांचेवर पाकिस्तानी अत्याचार नि बलात्कार करणे, यांचे समर्थन कोणाला तरी करतां येईल काय? आमच्या भारताचा केवढा हा अध:पात !!

माझ्या मित्रांनो ! मूर्खांना शिकविण्यासाठी पंडितांची योजना केली जाते आणि असे पंडित, असे विद्वान राष्ट्रात बहुसंख्येने वाढावेत म्हणूनच शाळा-कॉलेजेस नि विद्यापीठे स्थापन केली जातात. परंतु त्यांतून बाहेर पडणारे हे पंडित जर, अडाणी समाजाकडूनही सहसा न केले जाणारे असले पाशवी प्रकार सामुदायिक रीतीने करण्याइतपत बिघडणार असतील तर, मग सामान्य जनतेला सुसंस्कृत करण्याचे काम कोण करणार? तसेच आज सुशिक्षित व समजुतदार अशा वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांकडून अशा सैतानी वृत्तीचाच जर प्रसार होऊ लागेल तर याला आळा तरी कोण घालणार? मोठमोठ्या शहारामध्ये मुलीबाळीभोवती घोळका जमवून अथवा त्यांच्या घोळक्यांत प्रवेश करून त्यांची निंद्यप्रकारे चेष्टा करण्याची ही वृत्ती जर सर्वत्र बोकाळली आणि या प्रकारांची खंडणा करण्याचे टाळून आम्ही जर खऱ्याखुऱ्या सामाजिक वृत्तीची अशा प्रकारे उपेक्षा केली-हानी होऊ दिली, तर राष्ट्राच्या पुढील जीवनावर केवढा आघात होईल याचा मला अंदाजच करता येत नाही.बाळपणापासून आमच्या विद्यार्थ्यांत जर याच विषारी[२] वृत्त्यांचा विकास होत गेला तर उद्याचे पुढारी, प्राध्यापक, राज्यकर्ते सर्व तेच बनतील; आणि मग आमचे सारे राष्ट्र त्यांचे भक्ष्य अध:पाताचे

---

१. अत्यंत वाईट २. नाशक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मूर्तिमंत आगर[१] बनविल्याशिवाय राहणार नाही. आणि असला हा सुशिक्षित गाढवांचा सावळागोंधळ पाहिल्यानंतर त्यांचे 'उच्च' शिक्षण घेण्याची तरी आमच्या समाजाला इच्छा कां व्हावी? सरकारला जर आमचा सामान्य समाज शिक्षण संपन्न व्हावा असे वाटत असेल तर, प्रथम या सुशिक्षितांच्या कुशिक्षित वृत्त्या नाहीशा करण्याकडे त्यांना लक्ष वेधायला नको का?

कित्येक लोक कम्युनिस्टांना नास्तिक व शिथिल नीतिबंधनाचे समजून शिव्या देत असतात. परंतु त्यांच्यात राष्ट्रासाठी मरण्याची धडाडी, गरीबांसाठी जिवंत तळमळ व स्त्रियांच्या इच्छेविरुद्ध त्यांचा विनयभंग न करण्याची तरी नैतिकता जागृत असते; पण आमच्या या आस्तिक व सभ्य म्हणवणारांत त्यांचा काही अंश तरी दिसण्यासारखा आहे का? अंधाराच्या मिषाने सैतान[२] हृदयात संचरल्यासारख्या ह्या क्रूर लीला करणाऱ्यांना मानव तरी कोणत्या तोंडाने म्हणावे? या भयंकर राष्ट्रद्रोही प्रवृत्तीचा बीमोड करणे हेच मानवतेच्या सेवेचे नि खऱ्या राष्ट्रोद्धाराचे कर्तव्य म्हणून सर्वांनी याकडे जागरूकतेने लक्ष पुरवायला नको का?

प्रत्येक राष्ट्राचे खरे जीवनमूल्य नैतिकता हेच असू शकते. ज्या राष्ट्राची नीति भंगली ते निसर्गतःच सर्वप्रकारे दुबळे बनत जाते; इतकेच नव्हे तर अशा राष्ट्राला लहानशी जंगली लोकांची टोळी देखील कब्जात घेऊ शकते. उलट श्रीराम,कृष्ण,वीरभरत,अभिमन्यु, शिवाजी, राणाप्रताप असे तेजस्वी तरुण ज्या देशात निर्माण होतात त्याकडे वाकड्या डोळ्यांनी पाहण्याची काळाची देखील छाती होत नाही. विलासवृत्ती वाढली, अमर्याद शौकिनीला ऊत आला की स्त्रियांना भोगवस्तु समजून नीतिनियम धाब्यावर बसवले गेले म्हणजे रोमसारखी[३] महान साम्राज्ये सुद्धा मातीत मिळून जातात, असे इतिहास ओरडून सांगतो. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की एके काळच्या या वीरपरंपरा निर्मिणाऱ्या भारतात आज तीच जहरी वृत्ती, तेच हीन आचार भरमसाट वाढले आहेत. राखीचा[४] मान जेथे मुसलमान राजांनी देखील एकेकाळी राखला; मानलेल्या भगिनीसाठीच नव्हे तर रस्त्यावर दिसलेल्या अपरिचित तरुणींना आपली शिरकमले वाहिली; त्यांना दुष्टांच्या हातून सोडवून सुरक्षितपणे घरी पोहचते केले, इतकेच नव्हे तर लुटीत मिळालेल्या सुंदर विधर्मी तरुणींचा सुद्धा भगिनी म्हणून सन्मान केला; त्याच भारतात आज प्रत्यक्ष आपल्या बहीणीवर असे अमानुष जुलूम करण्याचे धाडस नि अहमहमिका निर्माण व्हावी, यापेक्षा मानवतेला काळीमा आणणारी लज्जास्पद गोष्ट कोणती?

आजच्या तरुण-तरुणींत निर्मळ भगिनीप्रेम किंवा बंधुभाव आढळणे दुरापास्त झाले आहे. कितीतरी कथा-कादंबऱ्या, नाटके, सिनेमे व कलाप्रदर्शने

---

१. घर २. विकार ३. रोम शहर ४. रक्षाबंधन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

किंवा स्नेहसंमेलने यांतून शृंगारिक व भोगप्रवर्तक आचारविचारांचा फैलाव आज झपाट्याने होत असून, ते पाहून-वाचून नेमके तसेच भाव त्यांच्या दृष्टीत समावले आहेत आणि हेच सिनेमे प्रत्यक्ष जीवनांत उतरविण्याची त्यांच्यांत स्पर्धा सुरु आहे. अडाणी समाज चातुर्मास्यांतील रामविजय व पांडवप्रतापांतून जीवनष्टी[१] संस्कार व स्फूर्ति तरी घेतो; परंतु हे सुधरलेले कलाप्रेमी सुशिक्षित मात्र शृंगारिक कादंबऱ्या सिनेमे वगैरेनाच आपले स्फूर्तिस्थान बनवून दिवसेंदिवस त्यांत अधिक पुढे जात आहेत. वरील भीषण घटना ही आमच्या या सुशिक्षितांच्या हृदयात व डोक्यात रात्रंदिवस धुमसणाऱ्या त्याच कुसंस्कारांचा मौका मिळताच सर्वासमक्ष झालेल्या भयानक स्फोट आहे असे मी म्हणेन. राष्ट्राचा विनाश होऊं नये अशी ज्यांना कळकळ असेल त्यांचेसाठी ही घटना म्हणजे फार मोठे आव्हान आहे. आपले खिसे भरणे आणि मजा उडवणे हेच ध्येय ठरवून जे लेखक, अध्यापक, संपादक, दिग्दर्शक, अधिकारी वा सेन्सारबोर्ड आदी आमच्या तरुण-तरुणींत चारित्र्य व बंधुत्वासारख्या जीवनीय तत्त्वाऐवजी असल्या हीन प्रवृत्तीचा प्रचार करतात याचा प्रसार होऊ देतात, त्यांचेच हे महान पाप आहे जे भावी राष्ट्राच्या व त्यांतील यांच्याही पुत्रपौत्रांच्या भयंकर अध:पातास व नाशास कारण होणार आहे.

मी असे ऐकले आहे की कित्येक बड्या लोकांनी या विषयी[२] घटनेवर पांघरून घालण्याकडे आपल्या चातुर्याचा उपयोग केला आहे. तसे असेल तर हा त्यांचा त्याहूनही मोठा सामाजिक गुन्हा आहे. कार्यक्रमांना असे वळण देण्याचा व अशा तऱ्हेने त्यांचा शेवट होण्याचा, तसेच अशा पापकृत्यांची सारवासारव करण्याचा जर प्रघात सुरु झाला तर सज्जनांना दुनियेत जगण्यापेक्षा मरणेच श्रेयस्कर वाटेल. पण अशा वेळी असे नुसते मरणाला कवटाळणे योग्य होणार नाही. प्रांतांतील सर्व सज्जन लोकांचा वरील घटना म्हणजे महान अपमान आहे, त्यांच्या नैतिकतेला हे आव्हान आहे, असे मी समजतो. ते जर अशी उपेक्षेची वृत्ती ठेवून या बाबतीत प्रतिकारास काहीही चालना न देता चूप बसून राहिले तर ते आपल्या आयाबहिणींच्या प्रतिष्ठेची स्वतःच्या हाताने होळी पेटवणारे ठरतील. या करिता या प्रसंगी आपण सगळ्यांनी या प्रश्नावर एक होऊन पुढील शुद्धतेचा सन्मार्ग शोधून काढला पाहिजे; राष्ट्रातील शिक्षणसाधने कटाक्षाने सुसंस्कारी बनविण्यासाठी प्रचंड आवाज उठविला पाहिजे. योगीराज भन्साळीजींनी चार दिवसात निर्जल उपवास करून जनतेला शुद्धीकरणाकडे प्रवृत्त करण्याची प्रेरणा दिली असे मी ऐकले आहे. राष्ट्रांतील प्रत्येक सुबुद्ध पुरुषांचे हे आद्य कर्तव्य आहे की भावी भारताला अनैतिकतेच्या भीषण गर्तेपासून वाचविण्यासाठी आज या प्रवृत्तीच्या मुळावरच कुठाराघात केला पाहिजे. ईश्वराने 'सर्वांना या कार्याची प्रेरणा द्यावी हीच माझी प्रार्थना !'

(श्रीगुरुदेव, जून १९५१ पृ. क्र. २-४) ✣ ✣ ✣

---

१. जीवनासाठी उपयुक्त २. विषयासक्त

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१७. जगात क्रांती घडविण्याची गुरुकिल्ली-प्रचार !!!

(जगात जी काही परिवर्तन झाली ती सारी प्रचारानेच झाली. प्रचार ही क्रांतीची गुरुकिल्ली आहे. जनतेच्या अंगी सामर्थ्य आणावयाचे असेल तर प्रचारच करावा लागेल याची जाणीव वं. राष्ट्रसंत आम्हास पुढील लेखात करून देत आहे. – संपादक)

मित्रांनो ! प्रचार ही वस्तु जगात सर्वात अधिक सामर्थ्यशाली आहे. ती ज्याप्रमाणे अमृत निर्माण करू शकते. तशीच ती भयंकर हलाहल विष सुद्धा उत्पन्न करू शकते. ॲटमबॉंब पेक्षा सुद्धा प्रचाराची शक्ती अतिशय परिणामकारक आहे. नुसत्या प्रचाराने नसत्या युद्धाची लाट उत्पन्न करून जगात रक्ताचे पूर वाहविता येतात, तसेच केवळ प्रचाराच्या सामर्थ्याने सर्वत्र प्रेमाची निर्मळ गंगा वाहवून लोकांतील भयंकर भेदभावना व अमानुष युद्धप्रवृत्ती नाहीशी करता येते. प्रचाराच्या अभावी मोठमोठ्या कल्याणकारी योजना नुसत्या कागदांत पडून राहतात व थोर थोर तत्वज्ञांचे उच्चत्तम वादविचार हवेतल्या हवेत फिरून कुचकामी ठरतात. उलट नुसत्या प्रचाराच्या बळावर अखंड भारताचे तुकडे पाडता येतात; जगांत धर्मवेड पसरवून महान अनर्थ निर्माण करता येतात. याप्रमाणे प्रचार ही सर्वात बलवान शक्ती आहे. जगाला शापून[१] भस्म करण्याचे किंवा पेटलेल्या स्मशानांत हराभरा बाग फुलविण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी आहे.

आजपर्यंतचा जगाच्या आंदोलनांचा किंवा प्रत्येक वेळच्या घडामोडींचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यास आपणास ही गोष्ट प्रामुख्याने दिसून येईल की, त्या त्या वेळच्या महान परिवर्तनाच्या मागे एक अत्यंत प्रभावी शक्ती काम करीत होती आणि ती शक्ती विशिष्ट प्रकारच्या प्रचाराचीच होती. कारण, प्रचार हीच क्रांतीची गुरुकिल्ली आहे. प्रचाराच्या अभावी थोर थोर कार्यकर्ते बेकाम[२] ठरतील, मोठमोठ्या घटना कुचकामी होतील आणि क्रांतीचा उठाव देखील अपयशी बनेल यांत तिळमात्र संशय नाही. जनतेच्या अंगी असणारे सुप्त सामर्थ्य जागे करावयाचे असेल, राष्ट्राची नाव योग्य दिशेने वळवावयाची असेल आणि सध्याच्या 'छिन्नभिन्न' परिस्थितीतून जनतेचे जीवन उन्नत करण्यासाठी लोकशाही खऱ्या अर्थाने यशस्वी करून दाखवावयाची असेल तर, त्यासाठी योग्य प्रचार हाच रामबाण उपाय आहे. प्रचाराच्या अंगचे शाप व वर देण्याचे महान सामर्थ्य

---

१. शाप देवून   २. बेकार

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लक्षांत घेऊनच आज अनेक लोक प्रचाराचे हुकमी पत्ते आपल्या हाती ठेवण्यासाठी झटतांना दिसतात. कुणी एकेक पक्ष, एकेक संघटना आपल्या पाठीशी उभी ठेवतो तर कुणी वर्तमानपत्रे, रेडिओकेंद्रे नि प्रकाशने आपल्या हातात खेळवतो. अखिल भारतातच नव्हे तर साऱ्या जगात आज बऱ्यावाईट प्रवृत्तीचे सर्व बुद्धिमान लोक प्रचारसाधनांचा जास्तीत जास्त अवलंब करण्यात गढून गेलेले आणि याच बळावर आपापले आवाज बुलंद करून निवडणुकी जिंकीत राष्ट्राची सूत्रे आपल्या हातांत घेण्यासाठी हापापलेले दिसतात.

सज्जनांनो ! प्रचाराच्या या खऱ्या धडपडी लोकांवर छाप पाडून आपले उद्दिष्ट साधून देण्याच्या काही उपयोगी ठरतील यात शंका नाही. आपण पाहातच आहोत की पैसा आणि प्रचार हे आज जगात हवी ती लाट उत्पन्न करीत आहेत. परंतु त्याच्या पाठीशी जोवर जनतेच्या हिताची प्रामाणिक तळमळ आणि निःपक्षपाती मानवता राहणार नाही तोवर हा प्रचार जनतेच्या दृष्टीने महान शापच ठरणार आहे. आपण म्हणाल, ''मग जनता या खोट्या प्रचाराला बळी कां पडते?'' त्याचे कारण भोळ्या जनतेची अंधश्रद्धा, दूरदृष्टीचा अभाव, स्वतःचे तात्पुरते सुख पाहण्याचा आकुंचित दृष्टिकोण किंवा परिस्थितीने निर्माण केलेली मजबूरी यांतच आपणास शोधता येईल. या कारणाने जनता आज भलत्याच्याच आहारी जाऊन आपले नेहमीकरता नुकसान करून घेत आहे, असे जर आपणास दिसत असले तर, आपल्यापैकी प्रत्येक जाणत्या[१] पुरुषाचे हे कर्तव्य ठरते की वास्तविक सत्य गोष्टीचा सतत प्रचार करून आपण या दिशाभुलीतून जनतेला जागे केले पाहिजे, विनाशाच्या मार्गापासून वाचविले पाहिजे. चुकीच्या धर्मकल्पना, अनिष्ट रूढ्या, पोकळ आचार, सामाजिक असंघटितपणा, उच्चनीचतेच्या, सत्याऐवजी सत्ता व संपत्ती यांना मान तुकवण्याचा दुबळेपणा, नागरिकतेचा अभाव इत्यादी विषारी दोष जनतेतून नाहीसे करणारा प्रभावी प्रचार प्रत्येक सूज्ञ व्यक्तीने जिथे तिथे नेटाने करीत राहिले पाहिजे. हे कार्य आज जो जितक्या उत्तम रीतीने करील तितका तो अधिक श्रेष्ठ असा देशभक्त, धर्मभक्त व ईश्वरभक्त ठरेल.

मित्रांनो ! हे कार्य करण्यासाठीच सेवामंडळाचा प्रचारविभाग अनेक वर्षांपूर्वी उदयास आला असून एक तपापासून तो वेगवेगळ्या स्वरूपात हे प्रचारकार्य- आपली संपूर्ण शक्ती खर्चून व त्या कार्याला आवश्यक असे सेवाश्रम, मासिक व पाक्षिक, ग्रंथसंस्था, महिलामंडळ, भजन, आयुर्वेद, उद्योग व व्यायाम आदी विभाग मदतीला घेऊन त्या द्वारेही करीत आहे. खेड्यापाड्यातून

---

१. शहाण्या, सूज़

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

या कार्याचे कंकण बांधून पुढे आलेले आबालवृद्ध प्रचारक व प्रचारिका सुखदुःखांची पर्वा न बाळगता रात्रंदिवस रानावनांतून व खेड्यापाड्यातून भ्रमण करीत जनतेला खरी दृष्टी देत आहेत. प्रचारवर्ग, वेगवेगळे शिक्षणसप्ताह व चातुर्मास्य इत्यादी रूपाने प्रांतोप्रांती केला जाणारा हा प्रचार वृत्तपत्रांत गाजत नसला तरी बिनबोभाट होणारे हे लोकजागृतीचे कार्य कमी मोलाचे नाही. रेडिओ, वृत्तपत्रे, पुस्तके आणि विद्वान पुढाऱ्यांची पांडित्यप्रचूर[१] भाषेतील व्याख्याने यांच्याद्वारे होणारा प्रचार आजच्या भारतांत सुशिक्षितांच्या दृष्टीत एकदम भरेल; परंतु निरक्षर असलेले शेकडा ८० लोक आजही असे आहेत की ज्यांना त्यांतील एक शब्दही कळणार नाही. पारध्यांचा पडाव, लभाण्यांचे तांडे किंवा भिल्ल-कोरकूंच्या झोपड्या यांच्यापर्यंत तर त्यांचा शिरकाव होणेही शक्य नाही. या बहुसंख्य अडाणी समाजाच्या रूपाने पसरलेला हा विशाल भारतवर्ष हे आपल्या प्रचाराचे क्षेत्र आहे. भजन, कीर्तन, पोवाडे, प्रार्थना, रामधून, शंकासमाधान इत्यादी कार्यक्रमाच्या माध्यमांतून यांच्या भाषेतच त्यांना समजावून सांगितल्यास एवढ्या मोठ्या जनसागरात पाहिजे त्या विचारांच्या लाटा आपण निर्माण करू शकतो; ज्या गादलेल्या पडित शेतात सुशिक्षित पुढाऱ्यांची मेख गडणार नाही, अशा या अफाट भूमीला आपण आपल्या प्रचाराच्या नांगराने सुपीक बनवू शकतो; या विश्वासनेच प्रत्येक प्रचारक खेड्यापाड्यातून आपले कार्य यशस्वी करून दाखवित आहे, ज्याची कल्पना वृत्तपत्रीय प्रचारावर विसंबून असलेल्या विद्वानांना करता येणार नाही.

माझ्या प्रिय मित्रांनो ! प्रामाणिक प्रचारक हा नव्या जगाची मूर्ती घडविणारा महान कलाकार आहे ही गोष्ट लक्षात घेऊन, आपले हे प्रचारकार्य असेच नेटाने तुम्ही पुढे चालविले पाहिजे. परिषदा नि अधिवेशने या ऐवजी उत्सव नि यात्रामुळे या सहज साधनांतून लाखो लोकांना संदेश देत देत राष्ट्राच्या प्रत्येक घटकाला जागविले पाहिजे. त्यागाच्या तेजाने नि स्नेहाच्या ज्योतीने सतत तेवत राहून एकेका प्रचारकाने दिव्यावरून दिवा लावावा त्याप्रमाणे असंख्य प्रचारक निर्माण करून सारे राष्ट्र नव्या प्रकाशाने झगमगीत करून सोडले पाहिजे. हा संदेश दरवर्षी उजळून घेण्यासाठीच ''प्रचारकदिन'' चा हा उत्सव आषाढीपौर्णिमेला व्यासपूजेची आठवण लक्षांत घेऊन निश्चित करण्यांत आला आहे. साऱ्या जगाला राष्ट्रधर्माची व मानवधर्माची शिकवण देणाऱ्या व्यासमहर्षी[२] प्रमाणेच आपणांस या दिवसापासून अधिक जोमाने प्रचारकार्यास लागावयाचे आहे हे लक्षात असू द्या.

प्रचारकांनो ! तुमच्याकडून माझी हीच अपेक्षा आहे की, निःस्पृहपणाचा

---

१. पांडित्याने भरलेली २. महाभारताचे लेखक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बाणा न सोडता प्रत्येक खेडे सात्विक भावनेने भारून सेवामंडळाच्या तत्वप्रणालीकडे तुम्ही वळवले पाहिजे. चारित्र्याने शुद्ध व वृत्तीने मस्त राहून कोणत्याही गावांत गेल्यावर सेवामंडळाच्याच नव्हे तर सर्व संस्थांच्या, धर्मांच्या किंवा पक्षांच्या लोकांशी प्रेम संपादन केले पाहिजे आणि ज्याच्यांत दोष आढळतील त्यांना आपुलकीने जागृत केले पाहिजे. गावातील गैरभावना काढून रामराज्याला आवश्यक गुण ज्यात भरले पाहिजेत; प्रचारकाच्या वाणीच्या प्रेमळपणाने व लोकसंग्रही वागणुकीने लोक मुग्ध[१] झाले पाहिजेत. त्यासाठी तो जेवढा उत्तम बोलणारा तेवढाच सदाचरणी, नम्र, विनोदी, मुलाबाळांत खेळणारा, मान-अपमानाचा गंध नसलेला, अंगावर असतील ते कपडे स्वच्छ ठेवून टापटिपीने वागणारा, वेळप्रसंग ओळखणारा व धैर्यशील असा असला पाहिजे. तो जितका साधुप्रमाणे सात्त्विक व धार्मिक तितकाच त्यागी व अल्पसंतुष्ट असला पाहिजे. आधुनिक सभ्यतेच्या आहारी न जाता एखाद्या गरीब माणसाप्रमाणे सर्वकाळ राहणारा व कोणी शिव्या दिल्या तरी सहनशीलपणे योग्य तेच उत्तर त्याला देणारा, तसेच केवळ मंडळावरच विसंबून न राहता अखिल मानवसमाजावर निर्भर असलेला आणि केवळ मंडळानेच गुणवर्णन न करता, संस्थेऐवजी सत्याला प्राधान्य देऊन त्या दृष्टीने हर संस्थेतील चांगुलपणाचा गौरव करणारा असा तो असला पाहिजे. एखाद्या मुलाबाळाप्रमाणे निर्मळ मनोवृत्तीचा पण अनेक उपयुक्त कला अवगत करून घेणारा, तसेच जातीयता, प्रांतीयता इत्यादीपासून अलिप्त व अनेक भाषांचा अभ्यास करणारा असा प्रचारक जनतेचे हृदय जिंकून सत्तेच्या सहाय्याशिवायच एक नवी राजवट त्यांच्यांत निर्माण करू शकतो.

प्रचारकांनो ! इमारतीच्या पायांत भिंत एक इंच तेढी असली तर वरची सारी इमारत थोड्याच वेळांत भंगून जाते. ही गोष्ट लक्षात ठेवून तुम्हाला आपले जीवन अत्यंत पवित्र, शिस्तबद्ध सर्वांगसुंदर व सामर्थ्यशाली बनविले पाहिजे, तरच सगळे समाजमंदिर अत्यंत उत्तम व मजबूत बनविता येईल. कोणत्याही अहंकाराच्या किंवा प्रलोभनाच्या[२] आहारी न जाता लोकसेवा हेच ध्येय तुम्ही सतत दृष्टीपुढे ठेवायला पाहिजे. श्रीगुरुदेव ही व्यक्ती नसून ते सर्वश्रेष्ठ तत्व आहे, हे लक्षात ठेवून तुम्ही सर्वांना उन्नत व सुखी बनवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत आणि नंदादीपाप्रमाणे स्वत: जळून सर्वांना प्रकाश देत गेले पाहिजे; यांतच सेवामंडळाच्या तात्त्विकतेची सफलता आहे. श्रीगुरुदेव तुम्हाला तुमच्या या अपेक्षित कार्यात स्फुर्ती, शक्ती व यश देवो हीच माझी हार्दिक प्रार्थना आहे.

(श्रीगुरुदेव, जुलै १९५१ पृ. क्र. ३-५)

१. प्रभावित २. लोभाच्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१८. रामराज्य निर्माण करण्याचा सोपा मार्ग !

माझ्या प्रिय भारतपुत्रांनो ! प्रत्येक देशांत स्वातंत्र्यदिन मोठ्या आनंदाने पाळण्यात येतो, त्याप्रमाणेच आपला हा १५ ऑगस्टचा दिवस भारताची बेडी तुटून पडल्याची आठवण करून देणारा एक महान् आनंदाचा सण आहे. परंतु दुःखाची गोष्ट आहे की, हा उत्सव ज्या उत्साहाने सुरवातीस करण्यांत आला त्याचा थोडासा अंश देखील आज जनतेत दिसून येत नाही.कारणे पुष्कळ आहेत आणि ती बहुतेक पुढाऱ्यांच्या तोंडून ऐकून ऐकून सर्वांनाच पाठ झाली आहेत; इतकेच नव्हे तर आता ती कारणे ऐकण्याचा देखील लोकांना वीट[१] आला आहे. राज्यकर्त्यांना कितीही अडचणी असल्या तरी जनतेच्या अडचणी जनतेला त्याहून महत्त्वाच्या वाटणे साहजिक आहे. पण या गोष्टींचा कुठे तरी मेळ बसविलाच गेला पाहिजे, नाहीतर हे स्वातंत्र्य म्हणजे सर्वांना शापच होऊन बसेल असा रंग दिसत आहे.

हे मेळ बसवण्याचे कार्य अर्थात् राज्यकर्त्यांच्या उणीवा सहकार्याने दुरुस्ती करून जनतेलाही यथार्थ[२] दृष्टी देण्याचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. पण हे ज्यांनी करायला हवे, ते लोक आज वेगवेगळ्या पक्षसंस्थांच्या झगड्यांत पडून उलट जनतेत विष पेरीत आहेत, फूट पाडीत आहेत. आपसात लाथाळी[३] कशी होईल इतकेच ज्यांचे त्यांचे लक्ष आहे. इकडे कष्ट करून मरणारे मरतात बिचारे! कुणाला अन्न नाही तर कुणाला वस्त्र नाही, कुणाला राहायला घर देखील नाही; पण पुढाऱ्यांची व्याख्याने जोरात सुरूच आहेत. दुसरीकडे लाचखोरी, अत्याचार, शोषण, कुटील कारवाया यांना भरती आली आहे; पण त्याकडे देखील कोणी डोळे उघडून पाहायला तयार नाही. आपापले खिसे गरम करण्याकडेच[४] जो तो झुकला आहे. ज्याला त्याला पुढच्या 'इलेक्शन'ची धुंद लागलेला आहे. 'जनता अज्ञानी आहे' या समजुतीने आज हा गोंधळ चालू असला तरी, प्रत्येक पुढाऱ्याने आता हे पक्के लक्षांत ठेवले पाहिजे की यापुढे हा तमाशा फार वेळ टिकायचा नाही. लोक स्वतःचे सामर्थ्य असंघटितपणामुळे ओळखत नसले तरी लहानशा खेड्यांतला माणूस देखील तुमची ही सोंगे स्पष्टपणे ओळखत आहे व त्याच्या हृदयात चीड धुमसू लागली आहे. यापुढे तुमच्या निष्क्रिय व्याख्यानांना कवडीचीही किंमत राहणार नाही आणि व्यासपीठावरून कोण केव्हा खाली ओढून काढील याचा नेम नाही.

---

१. कंटाळा २. योग्य ३. तंटेबखेडे ४. लाच घेण्याकडे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मित्रांनो ! सर्व संस्थांच्या कार्यकर्त्याप्रमाणेच प्रजातंत्र राज्याची जबाबदारी ज्या लोकांकडे आहे त्यांनी देखील वेळीच सावध झाले पाहिजे. लग्नातील ज्या वऱ्हाड्यांकडे लग्नाच्या कामांची काही जिम्मेदारी सोपविली असेल ते लोक जर प्रामाणिकपणे काम करण्याऐवजी हजार निमित्ते पुढे करून पाहुण्यासारखे मजा उडविण्यांतच गर्क राहतील तर त्या लग्नांत व्यवस्थेऐवजी नासाडीच होणार नाही का? आणि त्यांचे दुष्परिणाम शेवटी त्यांनाही भोगावेच लागतील हे उघड आहे. तेव्हा आता नुसते वकिली पद्धतीने समर्थन करून आणि मोठमोठाल्या योजना सुचविणारे व्याख्यान ठोकून भागणार नाही. लोकांच्या प्राथमिक गरजांकडे इमानेइतबारें लक्ष पुरविण्यांत येईल तरच आमच्या स्वातंत्र्याला खरी किंमत मिळूं शकेल.

देशाला स्वातंत्र्य-सुखाने नटवणे हे जितके राज्यकर्त्यांवर निर्भर[१] आहे तितकेच देशांतील इतर संस्थांच्या व पक्षांच्या पुढाऱ्यांवर आणि कार्यकर्त्यांवर सुद्धा अवलंबून आहे. परंतु हे सर्वजण जर सामान्य जनतेच्या जीवनाची फिकीर न करतां मनमाने वागत असतील तर त्यांना सरळ करून खरे स्वातंत्र्य प्रत्यक्षांत आणणे हा अधिकार जनतेचा आहे. ''देश स्वतंत्र झाला पण अमुक पुढाऱ्यांनी काय केले?'' अशी चर्चा जो तो करतो. पण त्यांना मी असे विचारतो की- बाबारे ! तूं काय केलेस? अमुकाने अन्याय केला किंवा झाकला तर ओरड करण्याचा अधिकार तुला नाही का? अमुक अधिकारी अपात्र निघाला तर त्याला खाली काढण्याचा हक्क[२] तुला नाही का? कोणी कितीही लोभ दाखवला तरी त्याला 'मत' न देता उद्याचे अधिक उत्तम राज्ययंत्र निवडण्याची जबाबदारी तुझ्यावर नाही का? तू पदोपदी स्वतःचा देश रामराज्याप्रमाणे उत्तम बनविण्यास झटत आहेस का? असे नसेल तर कोणावरही टीका करण्याचा तुला अधिकार नाही आणि असल्या नुसत्या टीकेने काहीही लाभ व्हायचा नाही. प्रजेने आपला न्याय्य अधिकार चालवून राष्ट्रांत न्यायाची राजवट सहकार्याने उभारणे यांतच सर्वांचे कल्याण आहे.

बंधुनो ! हा देश पं. जवाहरलाल नेहरू किंवा बाबू राजेंद्रप्रसाद अथवा इतर कोणाही एकाचा नसून तो प्रजातंत्र देश आहे. त्यावर प्रत्येकाचा सारखा हक्क आहे. प्रत्येकाला असे वाटले पाहिजे की-''हा देश माझा आहे; मी त्याचा घटक आहे. माझ्या प्रत्येक कृतीने मी त्याचा उत्कर्ष करीन व प्रसंगी त्यासाठी प्राण सुद्धा पणास लावीन. त्यांत अन्याय चालू देणे हे माझ्या अधःपाताचे लक्षण समजले जाईल व देवाघरी तो गुन्हा ठरेल.'' या धारणेने वागणारी व्यक्तीच

१. अवलंबून २. अधिकार

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्वातंत्र्याला लायक आहे आणि असे झाले तर या संघर्षकाळांत चालू असलेला भयानक गोंधळ समाप्त व्हायला थोडा सुद्धा वेळ लागणार नाही. या साठी या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आज प्रत्येकाने असा दृढ संकल्प करणे परम आवश्यक आहे. ''श्रीगुरुदेव सेवामंडळ'' याच विचाराने प्रेरित होऊन जनतेत सात्त्विक संघटनेचे, सत्यनिष्ठ जीवनाचे व उज्ज्वल नागरिकतेचे पवित्र प्रचारकार्य करीत असून, या निःपक्ष राष्ट्रकार्यात स्वतःला सामील करून घेऊन सर्वांनी उद्याचे सर्वश्रेष्ठ रामराज्य आकारास आणावे अशी माझी विनंती आहे. परमेश्वराने आमच्या सर्व आंगोठाछाप प्रजेला, पुढाऱ्यांना व अधिकाऱ्यांना सद्बुद्धी देऊन राष्ट्रपिता महात्मा गांधीनी दिलेले हे स्वातंत्र्याचे मंगल दान टिकविण्यास समर्थ करावे, ही या शुभप्रसंगी माझी त्यास हार्दिक प्रार्थना आहे !

(श्रीगुरुदेव, ऑगस्ट १९५१ पृ. क्र. २-३) ✣ ✣ ✣

स्फुट लेखन-

'करणी कराल तर नराचे नारायण व्हाल'

''आजपर्यंत आपण गुलामगिरीत म्हणजेच अंधारात चाचपडत होतो. आज आपल्याला प्रकाश मिळाल्याचा आनंद होत आहे; तरी पण आपल्यावरील जबाबदाऱ्या आपणाला पार पाडावयाच्या आहेत. राष्ट्राची नवी घडी बसवावयाची आहे. मनुष्य प्रत्येक क्षेत्रांत स्वातंत्र्य उपभोगू लागला पाहिजे. विषमता[१] नष्ट झाली पाहिजे. राव आणि रंक हा भेद जेव्हा प्रत्येक खेड्यांखेड्यांतून नष्ट होईल तेव्हांच खरेखुरे स्वातंत्र्य पचनी पडेल. आपल्या समाजांतील विस्कळीतपणा प्रथम नाहींसा व्हावयाला पाहिजे.

कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्याचा खराखुरा अर्थ सामान्य जनतेला पटवून दिला पाहिजे व आपआपसांतील द्वेषमूलक भावनांचे प्रथम उच्चाटन केला पाहिजे. शाब्दिक पांडित्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीचीच आज आवश्यकता आहे. आपला जन्म केवळ राष्ट्राकरितांच आहे अशी प्रत्येकांची भावना झाली पाहिजे. राष्ट्रीयता व धार्मिकता ही आतापर्यंत भिन्न भिन्न समजली जाई पण आता ही वृत्ती नष्ट झाली पाहिजे. टाळ कुटण्यापेक्षा[२] कर्तव्य केव्हांही श्रेष्ठ ठरते. देवालाही कर्तव्य अधिक प्रिय आहे. आधिभौतिक शास्त्राबरोबरच आध्यात्मिक शक्ती पैदा होणे अत्यावश्यक आहे नि त्याचकरिता प्रार्थनेची योजना आहे. देशाला मिळालेले स्वातंत्र्य टिकणार असेल तर बुद्धी आणि शक्ती यांच्या कार्याने संघटन-शक्तीचीच कांस पाहिजे. आपण जनतेला त्या दृष्टीने जागृत केले पाहिजे अशी माझी सर्व कार्यकर्त्यांना नम्र सूचना आहे. - तुकड्यादास

---

१. गरीब-श्रीमंत हा भेद २. भजन क़रीत बसण्यापेक्षा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१९ स्नेहसंमेलन व सीमोल्लंघन हाच विजयाचा मार्ग

(दि. २६ ऑगस्ट रोजी नेहरू राष्ट्रीय आघाडी-नागपूर तर्फे विद्यार्थी व नागरिकांच्या प्रचंड सभेत झालेले राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज यांचे प्रभावी भाषण.-संपादक)

प्रिय मित्रांनो पं. जवाहरलाल नेहरू व राजर्षि पुरुषोत्तमदास टंडन या दोन मोठ्या व्यक्तीच्या नांवांवर आज राष्ट्रांतील जनतेचे तुकडे पडण्याचा व ते आपसांत झगडून नष्टभ्रष्ट होण्याचा हा प्रसंग दुर्दैवाने उत्पन्न झाला आहे. या प्रसंगी परस्परांबद्दल कोणत्याही पुढाऱ्यांनी टीकाटिप्पणी करून वातावरण दूषित करणे अत्यंत धातुक होणार आहे. जागतिक परिस्थिती नाजुक आहे व भारताची अंतर्गत वस्तुस्थिती नाजुक आहे व भारताची अंतर्गत वस्तुस्थिती देखील अत्यंत बिकट अशी आहे. अशा स्थितीत सर्व पुढाऱ्यांनी व्यक्तिगत हेवेदावे किंवा फायदे-तोटे बाजूस सारून अत्यंत जपून वागले पाहिजे; जबाबदारी ओळखून बोलले पाहिजे. जनतेने सुद्धा भावनावश होऊन भलताच मार्ग धरू नये; तर सावधपणे सर्वांच्या हिताचा मार्ग अंगीकारला पाहिजे.

पं. नेहरू किंवा टंडनजी यापैकी कुणाबद्दलही माझ्या मनात पक्षपात नाही किंवा अनादरही नाही. मानवधर्मी वृत्तीने विधायक दृष्टिकोनांत सेवाकार्य करणे एवढेच माझे काम आहे. मी कोणत्याच पक्षाचा नाही. तरी पण आज राष्ट्राची अंतर्बाह्य परिस्थिती लक्षात घेता मी असे स्पष्टपणे म्हणैन. की, आमच्या सर्व जनतेने या प्रसंगी पं. जवाहरलालजींचे नेतृत्व विजयी करायलाच पाहिजे आमच्या प्रांताची सर्व जनता पंडितजीच्या मागे आहे ही गोष्ट आज आम्हाला उघड करून दाखवायला पाहिजे. कारण, पंडित नेहरू जे बोलतील किंवा करतील ते आज राष्ट्रकल्याणाचेच राहील असा आमचा विश्वास आहे.

पं. नेहरूंचा विजय हा आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता आज भारताचा विजय आहे; तो एका काँग्रेस संस्थेचा किंवा तिच्या मधील एखाद्या पार्टीचा विजय नव्हे. पं. नेहरूंचा पराभव हा आज साऱ्या जगांत भारताची नामुष्की[१] करणारा ठरेल; त्याची शक्ती खच्ची करण्यास कारण होईल. म्हणूनच पंडितजीसारख्या लोकहितैषी नेत्यांचे पाय मागे खेचण्याचे कृत्य हे आज महान अनर्थकारी ठरणार आहे. पं. नेहरू यांना पाठिंबा देतांना, सध्याच्या राजवटीत

---

१. अपमान, नाचक्की

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जनतेच्या अपेक्षांची आजवर झालेली अवहेलना मी दृष्टिआड करतो. किंवा त्याबद्दल सरकारचे बाजूने समर्थन देतो असे मात्र चुकूनही कोणी समजूं नये. तो प्रश्न स्वतंत्र आहे; अंतर्गत स्वरूपाचा आहे.

मला हे माहीत नाही की पंडितजी व टंडन यांतील मतभेदामुळे मूळ कोठे आहे. पुढील अखिल भारतीय कॉं. कमेटीचे बैठकीत काय निर्णय व्हायचा तो होईलच; पण मला एकच इशारा सर्वांना द्यावयाचा आहे की मतभेद असले तरी देशाचे हिताची दृष्टी बाजूस ठेवून आपसांत लढू नका. समाजांत द्वेष व फूट पेरणी करूं नका.[१] तात्त्विकतेनेच आपसांत विचारविनिमय करा; माणुसकीनेच कार्यविश्लेषण करा आणि कुणाचा निषेध करावयाचा तर तो सुद्धा तारतम्याने व तात्त्विकतेनेच करा. एखाद्या रानांत मोठमोठे हत्ती जर मनसोक्त[२] झुंजत बसले तर त्या रानांतील जीवजंतूची नि झाडाझुडपांची काय दशा होईल याचा विचार आमच्या पुढाऱ्यांनी अवश्य केला पाहिजे.

ही गोष्ट सर्वांना पूर्णपणे लक्षात ठेवली पाहिजे की, सर्वांनी स्नेहभावाने आपल्या शक्तीचे एकीकरण केल्यासच राष्ट्राचा सर्वतोपरी विजय होणार आहे. त्यासाठी आपापले पूर्वीचे ग्रह बाजूस सारून व पंथपक्षांच्या सीमा ओलांडून सर्वांनी एका तात्त्वितकतेच्या व राष्ट्रीयतेच्या भूमिकेवर आरूढ झाले पाहिजे आणि या गोष्टीस बाध आणणारा तो राष्ट्राचा शत्रु समजला गेला पाहिजे. अशा प्रकारे आपण सर्वजण जर एक झालो तर जगात भारत सदैव विजयी होऊन राहील यांत मला तरी शंका वाटत नाही.

(श्रीगुरुदेव, ऑक्टोबर १९५१ पृ. क्र. २-३) ✤ ✤ ✤

सुविचार

✤ मनुष्याने कधीही उदासता, निद्राळूपणा नि आळस यांना आपल्या अंगाला शिवू देऊ नये. कारण, त्याने विजय प्राप्त करणारी बुद्धी मलीन होऊन दारिद्र्य घरबसल्या ताबा करीत असते.

✤ मनुष्याला लागलेली उत्तम सवय वेळोवेळी जागृत करीत असते.

✤ मनुष्यपण अंगात येण्याकरिता मर्यादेचे नियम पाळावे लागत असतात.

---

१. फूटीची मूळे रुजवू नका २. मनास वाटेल तसे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१९ स्नेहसंमेलन व सीमोल्लंघन हाच विजयाचा मार्ग

(दि. २६ ऑगस्ट रोजी नेहरू राष्ट्रीय आघाडी-नागपूर तर्फे विद्यार्थी व नागरिकांच्या प्रचंड सभेत झालेले राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज यांचे प्रभावी भाषण. -संपादक)

प्रिय मित्रांनो पं. जवाहरलाल नेहरू व राजर्षि पुरुषोत्तमदास टंडन या दोन मोठ्या व्यक्तीच्या नांवांवर आज राष्ट्रांतील जनतेचे तुकडे पडण्याचा व ते आपसांत झगडून नष्टभ्रष्ट होण्याचा हा प्रसंग दुर्दैवाने उत्पन्न झाला आहे. या प्रसंगी परस्परांबद्दल कोणत्याही पुढाऱ्यांनी टीकाटिप्पणी करून वातावरण दूषित करणे अत्यंत धातुक होणार आहे. जागतिक परिस्थिती नाजुक आहे व भारताची अंतर्गत वस्तुस्थिती नाजुक आहे व भारताची अंतर्गत वस्तुस्थिती देखील अत्यंत बिकट अशी आहे. अशा स्थितीत सर्व पुढाऱ्यांनी व्यक्तिगत हेवेदावे किंवा फायदे-तोटे बाजूस सारून अत्यंत जपून वागले पाहिजे; जबाबदारी ओळखून बोलले पाहिजे. जनतेने सुद्धा भावनावश होऊन भलताच मार्ग धरू नये; तर सावधपणे सर्वांच्या हिताचा मार्ग अंगीकारला पाहिजे.

पं. नेहरू किंवा टंडनजी यापैकी कुणाबद्दलही माझ्या मनात पक्षपात नाही किंवा अनादरही नाही. मानवधर्मी वृत्तीने विधायक दृष्टिकोनांत सेवाकार्य करणे एवढेच माझे काम आहे. मी कोणत्याच पक्षाचा नाही. तरी पण आज राष्ट्राची अंतर्बाह्य परिस्थिती लक्षात घेता मी असे स्पष्टपणे म्हणेन. की, आमच्या सर्व जनतेने या प्रसंगी पं. जवाहरलालजींचे नेतृत्व विजयी करायलाच पाहिजे आमच्या प्रांताची सर्व जनता पंडितजीच्या मागे आहे ही गोष्ट आज आम्हाला उघड करून दाखवायला पाहिजे. कारण, पंडित नेहरू जे बोलतील किंवा करतील ते आज राष्ट्रकल्याणाचेच राहील असा आमचा विश्वास आहे.

पं. नेहरूंचा विजय हा आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता आज भारताचा विजय आहे; तो एका कॉंग्रेस संस्थेचा किंवा तिच्या मधील एखाद्या पार्टीचा विजय नव्हे. पं. नेहरूंचा पराभव हा आज साऱ्या जगांत भारताची नामुष्की[१] करणारा ठरेल; त्याची शक्ती खच्ची करण्यास कारण होईल. म्हणूनच पंडितजीसारख्या लोकहितैषी नेत्यांचे पाय मागे खेचण्याचे कृत्य हे आज महान अनर्थकारी ठरणार आहे. पं. नेहरू यांना पाठिंबा देतांना, सध्याच्या राजवटीत

१. अपमान, नाचक्की

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जनतेच्या अपेक्षांची आजवर झालेली अवहेलना मी दृष्टिआड करतो. किंवा त्याबद्दल सरकारचे बाजूने समर्थन देतो असे मात्र चुकूनही कोणी समजूं नये. तो प्रश्न स्वतंत्र आहे; अंतर्गत स्वरूपाचा आहे.

मला हे माहीत नाही की पंडितजी व टंडन यांतील मतभेदामुळे मूळ कोठे आहे. पुढील अखिल भारतीय काँ. कमेटीचे बैठकीत काय निर्णय व्हायचा तो होईलच; पण मला एकच इशारा सर्वांना द्यावयाचा आहे की मतभेद असले तरी देशाचे हिताची दृष्टी बाजूस ठेवून आपसांत लढू नका. समाजांत द्वेष व फूट पेरणी करूं नका.[१] तात्त्विकतेनेच आपसांत विचारविनिमय करा; माणुसकीनेच कार्यविश्लेषण करा आणि कुणाचा निषेध करावयाचा तर तो सुद्धा तारतम्याने व तात्त्विकतेनेच करा. एखाद्या रानांत मोठमोठे हत्ती जर मनसोक्त[२] झुंजत बसले तर त्या रानांतील जीवजंतूची नि झाडाझुडपांची काय दशा होईल याचा विचार आमच्या पुढाऱ्यांनी अवश्य केला पाहिजे.

ही गोष्ट सर्वांना पूर्णपणे लक्षात ठेवली पाहिजे की, सर्वांनी स्नेहभावाने आपल्या शक्तीचे एकीकरण केल्यासच राष्ट्राचा सर्वतोपरी विजय होणार आहे. त्यासाठी आपापले पूर्वीचे ग्रह बाजूस सारून व पंथपक्षांच्या सीमा ओलांडून सर्वांनी एका तात्त्वितकतेच्या व राष्ट्रीयतेच्या भूमिकेवर आरूढ झाले पाहिजे आणि या गोष्टीस बाध आणणारा तो राष्ट्राचा शत्रु समजला गेला पाहिजे. अशा प्रकारे आपण सर्वजण जर एक झालो तर जगात भारत सदैव विजयी होऊन राहील यांत मला तरी शंका वाटत नाही.

(श्रीगुरुदेव, ऑक्टोबर १९५१ पृ. क्र. २-३)

सुविचार

मनुष्याने कधीही उदासता, निद्राळूपणा नि आळस यांना आपल्या अंगाला शिवू देऊ नये. कारण, त्याने विजय प्राप्त करणारी बुद्धी मलीन होऊन दारिद्र्य घरबसल्या ताबा करीत असते.

मनुष्याला लागलेली उत्तम सवय वेळोवेळी जागृत करीत असते.

मनुष्यपण अंगात येण्याकरिता मर्यादेचे नियम पाळावे लागत असतात.

---

१. फूटीची मूळे रुजवू नका २. मनास वाटेल तसे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

२०. समाधिमंदिराच्या गाभाऱ्यांत

तुका म्हणे खातो आनंदाचे लाडू। नका चरफडूं घ्यारे तुही ।।

(मनुष्य भाकरीशिवाय जगत नाही पण तो केवळ भाकरीवरच जगेल असेही नाही. आज 'पोटोबा' चा प्रश्न हा आमच्या जीवनाचा पाया असला तरी, 'विठोबा'च्या कळसावर दृष्टी ठेवून तो घातला तरच जीवनांत सुखशांती नांदू शकेल. मानवी हृदयातील आत्मेषणा ' अथा ते ब्रह्मजिज्ञासा' म्हणून घोष करीत उठल्यानंतर अध्यात्मज्ञानाशिवाय तिचे पूर्ण समाधान अर्थात् जीवितांचे साफल्य इतर कोणत्याही साधनांनी होऊ शकणार नाही. म्हणूनच सर्व विद्यांहून श्रेष्ठ अशा त्या अध्यात्मविद्येचे स्मरण सर्वांना वर्षारंभी व्हावे यासाठी वं. महाराजांनी श्री स.वा. गाजरे यांच्या आध्यात्मिक प्रश्नांस दिलेले पत्रोत्तर येथे देण्यात येत आहे. - संपादक

अनुभवाचे तीन प्रश्न

माझ्या आर्त मित्रा ! तुझ्या पत्रांतील प्रश्न पुढील प्रमाणे माझ्या दृष्टीपुढे आहेत- (१) योगवासिष्ठ सर्ग ७२ मध्ये-

दृश्यदर्शन संबंधे सुखसंविदनुत्तमा।
दृश्यसंवलितो बंधस्त्न्मुक्त्या मुक्तिरुच्यते ।।

या श्लोकाचा भावार्थ असा दिला आहे की, (१)'सम्यक् दर्शनाने दृश्यदर्शनभावरहित निर्विकल्प ज्ञानदृष्टीचा आश्रय करावा, त्याच स्थितीला मुक्तावस्था म्हणतात.' तेव्हा, यांतील 'दृश्यदर्शनभाव रहित' या शब्दाचा वास्तविक अर्थ काय?

(२) समरसता किंवा तादात्म्यता म्हणजे पूर्णस्थिति तेव्हा त्या स्थितीत अनुसंधान कायम असते की त्याशिवाय आत्मानुभव चालू असतो? (३)'आनंदके घर वह गया आनंद का नहि भान है' या 'बरखे'[१] च्या सूत्रांतील 'आनंदाचे भान नसणे' या शब्दसमूहाचा अर्थ काय? आनंदाचे भान नसूनही आनंदाचा आस्वाद चालू असतो काय? अशी स्थिती कायम असू शकते काय?

त्रिपुटीरहित म्हणजे काय ?

प्रिय मित्रा ! दृश्य दर्शन व द्रष्टा या त्रिपुटीचे भान नसण्याची अवस्था म्हणजेच आत्मस्थिती आत्मस्वरूप ! आपल्या नेहमीच्या व्यवहारांतही ही मूळ

---

१. लहरकी बरखा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अवस्था वृत्तीच्या संधिकालात कितीदा तरी अनुभवास येत असते, पण तिची जाणीव सर्व सामान्य जीवाला होत नाही. वास्तविक दृश्यदर्शनाचे भान म्हणजेच सृष्टि ! 'दृष्टी तोवर सृष्टी' याचा अर्थ तरी हाच! दृष्टीचा विलास वजा केला तर त्रिपुटीरहीत आत्मरुपच अनुभवाला येणार! पण त्या समस्थितीत आपली दृष्टी म्हणजे वृत्ती ही अनेक प्रकारच्या अवस्था स्वतःच उठवीत असते. ज्या प्रक्रियेवर जशी विचारयुक्त अवस्था बदलेल तशी त्या दृष्टीतून भावात्मक दृश्ये प्रगट होत असतात. बाह्य वस्तु दृश्यपणाने बघावयाची असल्यास जागृत व्यवहार व मायाविकल्पित ज्ञान होऊ लागते. भासमान वस्तु बघावयाची असेल तर जागृतावस्था लीन होऊन जीवाला याच दृष्टीने स्वप्नावस्था किंवा ध्यानावस्था अनुभवायला मिळते आणि त्यागात्मक विचाराचे स्फुरण होऊन वस्तुगम्यतेचा नाशच त्याला दृश्यरूपाने दिसत असतो. त्याचप्रमाणे वस्तू वा वस्तूचा भासही जेव्हा वृत्तिमधून मावळतो[१] तेव्हा त्याच्या याच दृष्टीमध्ये दृश्यरूपाने ताटस्थ्य प्रगट होते व मी काय बघतो याचे त्याला भानही असत नाही, इतकेच काय पण बघण्याची क्रियाही त्याला कळत नाही.

'ताटस्थ्याचे नाव समाधि ?'

हे ताटस्थ्य म्हणजेच समाधि, असे जर कोणी म्हणेल तर ती मोठी चूक होईल. सुषुप्ति म्हणजे गाढ निद्रा किवा वृत्तीची मूर्च्छा अथवा शून्य दशा असे स्वरूपही त्या अवस्थेचे असू शकेल; आणि प्रत्यक्ष व्यवहारांत उघड्या डोळयाने वावरूनही आंधळ्याप्रमाणे व्यवहार करणारा सुद्धा तो राहू शकेल. त्याच्या लक्षांत वस्तूचे सुखदुःख काहीच असणार नाही. पण तरीही संत एकनाथांनी म्हटल्याप्रमाणे-''ताटस्थ्या नाव समाधि। म्हणतां ज्ञात्याची ठकली[२] बुद्धि।।'' असे म्हणावे लागेल. कारण, या अवस्थेचे समाधीत रूपांतर हे आत्मज्ञानाशिवाय-साक्षीस्वरूपाच्या अनुभवाशिवाय होऊ शकत नाही. जेव्हा ही दृष्टी वस्तुत्यागाच्या व आत्माभ्यासाच्या जोराने वर चढत जाते तेव्हाच नेहमीच्या अवस्था दिव्य व आध्यात्मिक बनत जातात; वस्तूचा यथार्थ अनुभव येऊ शकतो.

वस्तूचे यथार्थ ज्ञान हेच आहे की, प्रत्येक वस्तूंचे बाह्य व आभासिक रूप हे आरोपित असले तरी तत्वतः वस्तूचे स्वरूप नाशमान नसून सत्य रूपात्मक आहे.

(श्रीगुरुदेव, ऑगस्ट १९५१ पृ. क्र. २-३)

---

१. कमी होतो २. भुलली

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

२१. श्रीगुरु आडकोजी महाराज व प्रार्थनदिन

कार्तिक पौर्णिमा म्हणजे श्रीगुरु नानकदेव व श्रीसमर्थ आडकोजी महाराज यांचा स्मृतिदिन! याच दिवशी परमहंस श्रीआडकोजी महाराज यांचा जन्म होऊन बरोबर शंभर वर्षांनी याच दिवशी त्यांनी वरखेड येथे समाधी घेतली. त्यांची वृत्ती ब्रह्मानंदी लीन झालेली होती. आम्ही त्यावेळी लहान होतो. त्यांचे जीवन, त्यांची राहणी व त्यांची मुद्रा हाच मूर्तिमंत ग्रंथ समजून मी दिवस-दिवसभर त्याचा अर्थ लावीत त्यांचे जवळ बसत असे. त्या महापुरुषाच्या व्यक्तिमत्वामुळेच आज या जागी विशाल मंदिर बनले असून दरसाल हजारो लोकांचा मेळा भरत आहे. श्रीसमर्थ आडकोजी महाराज म्हणजे एक महान 'पॉवर हाऊस'-'चैतन्यविद्युत्‌चे केंद्र' बनले होते. आजच्या विशाल सेवामंडळाचे स्फूर्तिकेंद्र तेच आहेत. त्यांचे सारे जीवन खऱ्या अर्थाने प्रार्थनामय झाले होते. गीतेतील[१] स्थितप्रज्ञाची लक्षणे त्यांच्या अंगी पूर्णपणे दिसून येत होती. म्हणून त्यांच्या या स्मृतिदिनीच सामुदायिक प्रार्थनेचा वार्षिक महोत्सव करण्याचे सेवामंडळाने कित्येक वर्षापासून आरंभिले आहे.

बुवामहाराजाचे गुरुमहाराज म्हणून अशा पुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथी साजरी करावयाची नसते. त्यांची दैवी शक्ती, त्याग, तपस्या लक्षात घेऊन आपणही उन्नत व्हावे; स्वतंत्र वृत्तीने व स्वालंबनाने वागून 'सर्वाभूती भगवंत' या भावनेने सर्वांची सेवा करावी आणि आपले जीवन उज्जल बनवावे; हाच या उत्सवाचा उद्देश असतो. अवतारवाद माजवून आपण दुबळे बनावे व थोरांच्या समाधीवर रूढींची फुले उधळीत बसावे, याला येथे वाव नाही. उदार तत्वज्ञानाच्या दृष्टीने मी गाय, कुत्रा यांना देखील ईश्वराचे अवतार समजतो किंवा दगडाला सुद्धा देव मानून नमस्कार करतो; परंतु त्यामुळे जर समाजात दुबळेपणा वाढत असेल तर मला कर्तव्यशील नास्तिकपणाही अधिक बरा वाटेल.

मित्रांनो, माझा असा विश्वास आहे की प्रार्थना ही दैवी शक्ती मिळण्याची महान किमया आहे; समाधानाची संजीवनी आहे; जीवाला रंगवून टाकणारी उत्कृष्ट नशा आहे. परंतु ही नशा जर कार्याकडे न योजली तर अफू बनल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच प्रार्थनेबरोबर सात दिवसांचे वेगवेगळे सात कार्यक्रम मी मंडळापुढे ठेवले आहेत. आमची दैवी शक्ती ही

---

१. भगवद्‌गीता अ.२ श्लोक ५४ ते ७२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सर्वांगीण विकासाची साधना बनावी, प्रार्थना ही जीवनाचे कोडे उलगडून नवे राष्ट्र आकारास आणणारी शक्ती ठरावी हाच माझा उद्देश आहे. आमची सारी राहणी प्रार्थनामय करावयाची तर गावागावांत स्वच्छता, रस्त्यांची दुरुस्ती, संडास-निर्मिती, शेतीची उन्नती इत्यादी कामेही आम्हाला केली पाहिजे; गावोगावी अन्यायाचे निवारण करता आले पाहिजे; तसेच श्रीमंत हा देवाचा सख्खा पुत्र नि गरीब हा सावत्र आईचा, असा कलंक आपल्या देवाधर्माला लागू द्यावयाचा नसेल तर समतेच्या जीवनाकडे क्रांत[१] दृष्टीने आम्हांला जाता आले पाहिजे.

भारताचा नकाशा एखादा लहानसा मुलगा सुद्धा बदलून टाकील; परंतु सध्याच्या भारतात योग्य परिवर्तन करून खरे रामराज्य आकारास आणणे हे काम सोपे नाही. त्यासाठी जनतेच्या हृदयात विचारांत नि जीवनांतही बदल घडवून आणावा लागेल. हे कार्य करण्याची जबाबदारी सर्व प्रार्थनाप्रेमी लोकांची आहे. तेव्हा त्यांनी या प्रार्थनादिनाचा उद्देश लक्षात घेऊन गावोगावी सेवाबुद्धीने निःपक्षपाती विधायक कार्यास लागावे व गुरुदेवांनी त्यांना तशी शक्ती व बुद्धी द्यावी हीच माझी प्रार्थना आहे.

(श्रीगुरुदेव, नोव्हेंबर १९५१ पृ. क्र. ४)

सुविचार

❖ सत्पुरुषावर चमत्काराकरिताच ज्यांची श्रद्धा असेल ते लोक सत्पुरुषांचे मार्गही जाणू शकत नाहीत, मग त्यांना ओळखणे तर दूरच! चमत्कारावरच सत्पुरुषत्व अवलंबून असते तर त्यांच्या काळी कोणी मेलाच नसता त्यांचे सर्व करणे-धरणे चमत्काररुपच झाले असते.

❖ संतांच्या चमत्कारात जर काही तत्व असेल तर, त्यांच्या शुद्ध अंतःकरणात उत्पन्न होणारे भाव दैवी सामर्थ्याने युक्त असल्यामुळे ते जगात लौकरच उमटतात; आणि त्यांची वाणी सत्याचे दिग्दर्शन करते, पण ती कल्पनारहितच असते.

\- तुकड्यादास

---

१. दूर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्फुट लेखन-

'घराघरांतुनि जागवुं ज्योति'

प्रिय बंधुनो ! भारताच्या सर्व रोगांचे मूळ प्रामुख्याने त्यांचे अज्ञान आहे. वर्षानुवर्षे त्याची बुद्धी मुर्दाड व भ्रमिष्ट बनविण्यांत आली आहे. धर्म, पंथ, जाति, वर्ण, संप्रदाय, रूढ्या, चमत्कार, अवतार, स्वर्ग, पुण्यमार्ग इत्यादी अनेक नावाखाली भलभलत्याच गोष्टीचे किटण[१] त्याच्या बुद्धीवर चढविले गेले असून खऱ्या तात्त्विकतेपासून त्याला दूर ठेवण्यांत आले आहे. उठणे, बसणे, बोलणे इत्यादी सामान्य व्यवहारांचे देखील यथार्थ स्वरूप बहुजनसमाजास कळेनासे झाले, इतका त्याचा अध:पात झाला आहे !

अशा अंधकारमय परिस्थितीत प्रकाशाची ज्योत घराघरांतून पेटविण्याचे कार्य प्रत्येक विचारी माणसाने आज केले पाहिजे; तरच जनतेचे अंतरंग बदलेल व तिला स्वातंत्र्याचा खरा उपभोग घेतां येईल. आपला हिताचा मार्ग व आपला खरा कल्याणकर्ता कोण, हे जोवर जनतेला स्वत:च्या दृष्टीने पारखता येणार नाही, तोवर तिला कोणतेही स्वातंत्र्य व काहीही अधिकार दिले तरी दुर्दशेच्या चक्रव्यूहांतून बाहेर पडतां येणे शक्य नाही. अशा स्थितीत ब्रह्मज्ञानाच्या जाड गोष्टी लोकांना शिकवीत बसावे हा शुद्ध वेडपणा असून, लोकांपासून जाणत्यांनी आपल्या बुद्धिमत्तेने स्वार्थ साधवा यापेक्षा दुसरे पतन[२] नाही!

– तुकड्यादास

संदेश-

देवीला बलिदान नको

''येत्या विजया-दशमीच्या अगोदर नवरात्रांत देवाच्यापुढे बली देण्याचा जो अनिष्ट प्रकार कांही गावांत सुरु आहे तो गावच्या पाटलांनी, कोतवालांनी व देवी-भक्तांनी अजिबात बंद करावा अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे. मी त्यांना असा विश्वास देऊ इच्छितो की, बलि देणे हा खरा धर्ममार्ग नाही; ही अमानुष भक्तीची अनिष्ट रूढी आहे. आपण तिला आपल्या देशांतून अजिबात काढून टाकली पाहिजे.''

– तुकड्यादास

---

१. मळ   २. अध:पात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राष्ट्रसंतांचा आर्त संदेश

(२० ऑगस्ट १९६८)

आता मला काही सांगावे असे वाटत नाही. अशा अवस्थेमध्ये आजही हे सर्व धन तुमच्या सर्वांच्या जवळ उपलब्ध आहे. साधारण सेवक असेल त्याच्याहीसाठी आहे; साहित्यिक असेल, आध्यात्मिक असेल त्याच्याहीसाठी आहे, राजकीय असेल त्याच्यासाठी आणि विश्वव्यापी भावनेचा असेल त्याच्याहीसाठी आहे. असे सर्वांच्या करिता मी माझ्या परीने सामान ठेवून दिलेले आहे.

आपल्या लोकांचे कर्तव्य आता हेच असू शकते की ह्या वाङ्मयाला करोडो मुखी कानी जाऊ द्यावे; हजारो भाविकांत ती भक्ती वाढवावी आणि त्या वाङ्मयाची जी किर्ती आहे ती स्वार्थपूर्तीसाठी न पसरविता ''परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्'' ह्या प्रवृतीने समजून घेतली पाहिजे, वाढविली पाहिजे.

आता एकच उरलेले तुमच्या लोकांचे काम आहे की तुम्ही अव्याहत आपले सेवाकार्य चालविणे, आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे ''भूता परस्पर जडो। मैत्र जीवांचे॥' हे साधन करणे व ''अवघाचि संसार, सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक'' असे कार्य इथे करणे! हेच आमचे महामंत्र आहेत! बरे असो जयगुरु!!

(बॉम्बे हॉस्पिटलमधील आपल्या रुग्णशय्येवरून वं. महाराजांनी २० ऑगस्ट १९६८ रोजी दिलेल्या आर्त संदेशातील काही अंश टेप रेकॉर्डिंग श्री जनार्दनजी बोथे, गुरुकुंज)

वं. राष्ट्रसंतांचे वाङ्मय मिळण्याचे प्रमुख केन्द्र

१. श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम.
२. श्रीगुरुदेव साहित्य भांडार, गुरुकुंज आश्रम
३. श्रीगुरुदेव मुद्रणालय, महाल, नागपूर
४. श्री सत्यपाल चिंचोळकर, स्टेशन रोड, अकोट
५. श्री महादेवराव पिसे, आदर्श कॉलनी, चिमूर
६. श्री बाळकृष्ण हांडे, स्टेट बँक कॉलनी, वर्धा.
७. श्री चामलवार बुकडेपो, गांधी चौक, आदिलाबाद
८. जयस्वाल बुकडेपो, गोंदिया.
९. श्रीमती उपाताई हजारे, समाधी वार्ड, चंद्रपूर.
१०. श्री मंगेश कडवे दांडेकर, पर्वतीचरण अपार्टमेंट ५ बिल्डींग, पुणे.

छायाचित्र-श्री सुधाकरराव यादव, गुरुकुंज.